

# जनमाध्यम

श्री राम आपल्या आयुष्यात आनंद, ऐश्वर्य आणि स्थिरता आणो ही प्रार्थना.

जय श्रीराम

एक प्रतिष्ठित सवय



राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा!  ■ अमरावती, गुरुवार २६ मार्च २०२६  ■ मूल्य ४.००  ■ पृष्ठ १०  Epaper www.janmadhyam.com


# अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

## ■ पुढील पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून ■ बहुमताच्या जोरावर सरकारने कामकाज रेटून नेल्याचा विरोधकांचा आरोप



**मुंबई/प्रतिनिधी : राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता आज झाली. पाशवी बहुमताच्या जोरावर सरकारने मनमानी पद्धतीने कामकाज रेटून नेले व जनतेच्या हाती काहीही लागले नाही, अशी टीका विरोधी पक्षांनी अधिवेशन समाप्तीनंतर पत्रकार परिषदेत केली. २२ फेब्रु वारी रोजी सुरू झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता आज झाली. जवळपास पाच आठवड्याच्या या अधिवेशनात २० दिवसच प्रत्यक्ष कामकाज झाले. सरासरी रोज दहा तास या प्रमाणे १९८ तास एकूण कामकाज झाले. याबद्दल विधानसभा अध्यक्षांनी समाधान व्यक्तकेले. परंतु विरोधी पक्ष नेत्यांनी मात्र सरकारने पाशवी बहुमताच्या जोरावर मनमानी पद्धतीने कामकाज रेटून नेल्याचा आरोप केला. विधेयके आणि विरोधी पक्षांनी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्याचे सरकारने टाळले. एका दिवशी जास्तीत जास्त तीन लक्षवेधी सूचनांवर चर्चा घेणे अपेक्षित असताना वीस वीस लक्षवेधी सूचना घेतल्याबद्दल नाराजी व्यक्तकरताना हे विधानभवन आहे की लक्षवेधी भवन असा सवाल विरोधी पक्ष नेत्यांनी केला.**

## सरकारमध्ये गँगवार, भोंदूगिरी, भ्रष्टाचाराच्या विळख्यात महाराष्ट्र -विजय वडेट्टीवार यांची टीका

**मुंबई /प्रतिनिधी-** महाराष्ट्रातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील वाढते अत्याचार, ड्रग्जचा विळखा आणि फोफावलेली भोंदूगिरी यावरू न काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्राची मान आज या सरकारमुळे खाली गेली असून राज्यात लोकशाहीची हत्या होत आहे अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू फुले आंबेडकरांच्या पुरोगामी राज्यात अशोक खरात सारखे भोंदू महिलांवर बलात्कार करत आहेत. खरातने नाशिक कुंभमेळा रिंगरोड प्रकल्पातील जागा आधीच विकत घेतली. याचा अर्थ त्याला अधिका-यांची साथ आहे. त्यांनी माहिती दिली म्हणून नेमकी जागा विकत घेतली. या प्रकरणात आयपीएस, आयएएस आणि महसूल खात्यातील अधिका-यांची चौकशी झाली पाहिजे. लोकांच्या भावनांचा गैरफायदा घेउन खरातने संपत्ती कमावली असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. जादूटोणा विरोधी कायदा होउन १२ वर्षे झाली, तरी अद्याप त्याची कडक नियमावली तयार झालेली नाही.ड?.



नरेंद्र दाभोलकर यांनी या कायद्यासाठी संघर्ष केला होता. राज्यात भोंदू बाबांकडून महिलांचे शोषण होत आहे. या कायद्याची कडक अंमलबजावणी झाली असती, वेळेत नियमावली झाली असती, तर हे भोंदू बाबा जन्माला आले नसते,असे वडेट्टीवार म्हणाले. खरात सापडला पण सहावीत शिकणा-या मुलीवर ॲसिड हल्ला करणारा आरोपी अजून सापडला नाही, पोलिस काय काम करतात? संगमनेर येथील १७ वर्षीय मुलीवर अत्याचार करणा-या कीर्तनकाराला त्यांनी कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.राज्यात पोलिसांवर दबाव टाकला जात असून गुन्हेगारांना राजकीय आश्रय मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला. सत्तेतील मंत्रीच जर आम्हाला पोलिसांनी मारले अस सांगत असतील तर राज्यात गँगव?र सुरू आहे. मंत्र्यांच्या क?लरला पोलिस हात घालत असतील तर सामान्य जनतेने कोणाकडे पाहायचे? स्वाभिमान आता तर मंर्त्यांनी राजीनामा दिला असता. अंतरवली सराटी मध्ये लाठीचार्ज करणारा आणि मर्त्यांना मारणारे पोलिस अधिकारी एकच आहे पण कारवाई होत नाही असा सवाल त्यांनी उपस्थित केला. साता-यातील यशवंतराव चव्हाणांच्या भूमीत झालेली गुंडगिरी निंदनीय असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. राज्यात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये २३Ꮖ वाढ झाली असून २०२५ मध्ये गुन्ह्यांचा आकडा १ लाख ८ हजारांवर पोहोचला आहे. ठाणे-पालघर भागात गरीब महिलांना आमिष दाखवून त्यांचे शोषण करणारे स्त्री-बीज रॅकेट सक्रिय असताना गृह विभाग काय करत होता? असा प्रश्न त्यांनी विचारला. पुणे, मुंबई आणि नागपूरसारखी शहरे ड्रग्जच्या विळख्यात आहेत.

## खरात आणि त्याला पाठिशी घालणा-यांना धडा शिकविणार



**मुंबई /प्रतिनिधी-**भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने महिलांवर केलेल्या अत्याचाराची संताप आणणारी माहिती विधानसभेत देताना, या प्रकरणातल्या कोणालाही सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. खरातच्या मोबाईलची फारेन्सिक तपासणी सुरू आहे. मुंबईतील फारेन्सिक लॅबमध्ये त्याच्या मोबाईलमधील डिलिट केलेला डेटाही काढण्यात येणार आहे. ज्या-ज्या व्यक्तीच्या विरोधात पुरावा मिळेल त्याची चौकशी करण्यात येईल. वरिष्ठ प्रशासकीय अधिका-यांचे त्याच्याशी संगनमत होते का याचीही चौकशी सुरू आहे. कोणालाही पाठिशी घालणार नाही. जर कोणी त्याला मदत केली असेल तर त्यालाही आपण धडा शिकवू असे स्पष्ट आश्वसन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन करताना भोंदूबाबा खरातच्या काळ्या कारनाम्यांची जंत्रीच वाचून दाखविली. खरातच्या शिर्डी, नाशिक, सिन्नर, पुणे, पनवेल आदी ठिकाणच्या डोळे दिपवणा-या प्रापर्टीचीही माहिती दिली. खरातवर आधीपासूनच पाश आवळायला सुरूवात केल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पहिल्यांदा त्याच्या विरोधात शिर्डीत तक्रार दाखल करण्यात आली. खरात देश सोडून पळून जाण्याची शक्यता होती म्हणून पोलिसांनी लूक आउट सर्क्युलर १० मार्च रोजीच जारी केला व त्याच्या परदेशगमनास बंदी घातली. १३ मार्च रोजी एसआयटीची स्थापना केली. एसआयटीचे प्रमुख एका महिला अधिका-याला केले, त्यांचा ट्रॅक रेकार्ड चांगला आहे. पहिल्यांदा महिला तक्रारीसाठी पुढे येत नव्हत्या. त्यांचे समुपदेशन करून तक्रार देण्यास तयार केले. सहा पीडित महिलांना निष्पन्न करून पाच महिलांवरून पाच व एक साक्षीदाराच्या पत्नीबाबत एक गुन्हा असे सहा गुन्हे धरून आजपावेतो आठ गुन्हे खरात विरोधात दाखल करण्यात आले आहेत. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचे संगनमत आहे का याचेही संगनमत असल्याचा सखोल तपास सुरू आहे.

## काळ्या जादुसाठी 38 आमदारांनी बोट कापले

**मुंबई/प्रतिनिधी :** देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदावरुन दूर करण्यासाठी राज्यातील काही आमदारांनी अघोरी पूजेचा घाट घातला होता. अशोक खरात यानेही या संबंधित नेत्यांना फडणवीसांना मुख्यमंत्रीपदावरुन दूर करु, असे आश्वासन दिल्याचा सनसनाटी दावा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला. ते बुधवारी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेवेळी बोलत होते. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी अशोक खरात आणि महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांबाबत अनेक स्फोटक दावे केले. अशोक खरात याला वाचवण्यासाठी २००७ साली पहिला बळी पत्रकार बाळू तुपे याचा देण्यात आला. त्यावेळी या प्रकरणाची नाशिकमध्ये प्रचंड चर्चा होती. वृत्तपत्रातही याबाबत लेख छापून आले होते. त्यामुळे अशोक खरात कोण हे पोलिसांना माहिती नव्हते, अशातला भाग नव्हता. या सगळ्या आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी किती पैसे घेतले ते फक्त देवेंद्र फडणवीस साहेबांना माहिती आहे. अनेक बडे अधिकारी खरातच्या समोर लोटांगण घ्यायचे, त्यांनी खरातला वाचवण्यासाठी बरेच पैसे घेतले, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला. जितेंद्र आव्हाड यांनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदावरु न दूर करण्यासाठी काळी जादू आणि अघोरी विद्येच्या



माध्यमातून प्रयत्न सुरु असल्याचा आरोपही केला. ते म्हणाले की, मी खात्रीने सांगतो, अशोक खरातच्या माध्यमातून मुख्यमंर्त्यांच्या खुर्चीला सुरुंग लावण्यासाठी काहीजण प्रयत्न करत होते. हे सर्वजण अशोक खरातकडे पूजा घालायला गेले होते. वेळ आल्यावर मी त्यांचे नाव उघड करेन. ही सगळी माहिती सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंर्त्यांना मिळाली होती. या नेत्यांच्या खरातसोबत बैठका झाल्या होत्या. तेव्हा अशोक खरात म्हणाला होता, मला थोडे दिवस द्या, मुख्यमंत्री घरी गेलेले असतील.

## देशात कोरोनासारखी परिस्थिती; आमदार निवासमधील गॅस संपला

आमदार निवासमधील गॅस संपला असून तिथल्या माणसांना कसा तरी डाळ-भात शिजवून देण्यात आला आहे. तर पुढच्या चार ते ५ दिवसांमध्ये गॅस आणि तेलाचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. परिवहन सेवेला याचा मोठा फटका बसणार आहे. सर्व व्यवहार थांबतील, कोरोनामध्ये जसा देश थांबला होता तसा देश पुन्हा थांबू शकतो. सरकारमुळे जनतेला या परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याची टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**खरातचे एन्काउंटर होउ शकते-** विजय वडेट्टीवार म्हणाले की, खरातची सेवा कोणी-कोणी केली आहे हे समोर आल्यावर सर्व भक्त उघडे पडतील. मी जबाबदारीने सांगतो जर ते पेन ड्राईव्ह समोर आले तर मंत्रिमंडळातील दोन-तीन लोकांची विकेट जाईल. पण ते समोर येणार नाही, प्रकरण दाबले जाईल. सोयीचे जे आहे तेच समोर आणले जाईल. मला वाटते उद्या खरातचे एन्काउंटर होउ शकते.

**राज्यात एलपीजी गॅस मिळत नाही-** देशाचे नेतृत्व चुका करत असेल त्याचा त्रास जनतेला होत आहे. इराणसोबत अनेक वर्षांचे चांगले संबंध सरकारने बिघडवले आणि त्यामुळे आम्हाला या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छोट्याशा मेडलसाठी इस्रायलला जायची काय गरज होती? त्यामुळे जनतेला वेठीस धरण्याची वेळ आली. आता सर्वपक्षीय बैठक घेण्याची वेळ आली आहे. ज्या वेळेस गरज असते तेव्हा विचारत नाहीत.

## देशभरात पेट्रोल-डिझेल अन् LPG चा पुरवठा सुरळीत

### सर्वपक्षीय बैठकीत सरकारची स्पष्टोक्ती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. सुमारे दीड तास चाललेल्या या बैठकीत सरकारने विरोधी पक्षांच्या विविध प्रश्नांना उत्तर देताना देशात पेट्रोल-डिझेलची कोणतीही कमतरता नसल्याचे स्पष्ट केले. तसेच स्ट्रेट ऑफ हर्मुजमधील परिस्थितीबाबतही महत्त्वाची माहिती देण्यात आली.

बैठकीत सरकारने सांगितले की, देशात सध्या पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीची कोणतीही कमतरता नाही, पुरवठाही पूर्णपणे सुरळीत सुरू आहे. काही ठिकाणी कमतरतेच्या बातम्या येत असल्या तरी त्याचे मुख्य कारण सप्लाय चेनमधील अडचणी आहेत. बैठकीत स्ट्रेट ऑफ हर्मुझ येथील परिस्थितीबाबत चर्चा झाली. सरकारने माहिती दिली की, आतापर्यंत भारताची ४ जहाजे सुरक्षितपणे त्या भागातून बाहेर पडली आहेत, आणखी काही जहाजे लवकरच बाहेर पडतील. अनेक देशांची जहाजे अजूनही त्या भागात अडकलेली आहेत, मात्र भारताची जहाजे सुरक्षित बाहेर येत आहेत. या घटनेला भारताच्या राजनैतिक आणि धोरणात्मक यश म्हणून पाहिले जात आहे.

## सर्व पक्षांचा सरकारला पाठिंबा

संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीतील चर्चेविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, या बैठकीला सर्वांनी उपस्थिती लावली आणि सक्रिय सहभाग नोंदवला. सर्व पक्षांच्या नेत्यांनी माहितीची देवाणघेवाण केली आणि आपापल्या पक्षांच्या वतीने आपल्या चिंता व्यक्तकेल्या. इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्षामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेल्या परिस्थितीचा भारतावर कसा परिणाम होईल आणि भारतीय जनतेसाठी सरकारने कोणती पावले उचलली आहेत, याविषयी विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अनेक प्रश्न विचारले. सरकारने या सर्व प्रश्नांना अत्यंत सविस्तर आणि सखोल उत्तरे दिली. मला हे सांगताना समाधान वाटते की, संपूर्ण विरोधी पक्षाने विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे सरकारने दिली आहेत. शेवटी, विरोधी पक्षातील सर्व सहका-यांनी असे म्हटले आहे की, या संकटाच्या काळात सरकारने जो काही निर्णय घेतला, किंवा सध्याच्या परिस्थितीनुसार जी काही पावले उचलली, त्या सर्वांना ते एकजुटीने पाठिंबा देतील. ➪(पान २ वर)











## ट्रान्स जेंडर बरोबर अन्न, औषध मंत्री नरहरी झिरवाळ यांचा अश्लील व्हिडिओ समोर





**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातून आतापर्यंतची सर्वात धक्कादायक आणि संतापजनक बातमी समोर येत आहे. राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांचा एका ट्रान्सवुमनसोबतचा अश्लील व्हिडिओ समोर आल्यानं संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. शासकीय निवासस्थानाचा वापर अशा अनैतिक कृत्यांसाठी केला जात असल्याचा गंभीर आरोप आता होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवन यादव नावाच्या ट्रान्सवुमनसोबत नरहरी झिरवळ यांचे हे आक्षेपार्ह चित्रण समोर आलं आहे. धक्कादायक बाब म्हणजे, खुद्द पवन यादवचा भाउ रवी यादव यानंच हे संपूर्ण प्रकरण समोर आणलं आहे. रवी यादवच्या आरोपानुसार, पवन हा ट्रान्सवुमन असून तो खंडणी गोळा करण्याचं काम करतो. इतकंच नव्हे तर, दमदाटी आणि खंडणी प्रकरणी पवन यादववर यापूर्वीच मुंबईतील कुरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. शासकीय बंगल्यावर मद्यपान आणि अश्लील चाळे सुरू असल्याच्या आरोपानं आता महाराष्ट्रात नक्की चाललंय तरी काय? असा संतप्त सवाल विचारला जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पवन यादवच्या संपर्कात केवळ झिरवळच नव्हे, तर इतरही काही बड्या मंर्त्यांची नावे असण्याची शक्यता आहे. या हनीट्रॅप किंवा खंडणीच्या जाळ्यात आणखी कोणकोणते बडे मासे अडकले आहेत, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलं आहे.

## पक्षावर ताबा मिळवण्यासाठी 'ब्लॅक मॅजिक'

### रोहित पवारांचे प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरेंवर गंभीर आरोप; दादांच्या अपघातामागे घातपात

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी विधिमंडळ परिसरात पत्रकार परिषद घेत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. पटेल आणि तटकरे यांना पक्षावर ताबा मिळवायचा होता, तसेच हा सगळा कट रचला गेला असल्याचा गंभीर आरोप आहे. विधिमंडळ परिसरात रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना ते म्हणाले, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे तसेच ब्रिजमोहन श्रीवास्तव आणि आणखी एका व्यक्तीच्या सह्या आहेत. या सह्या कशावर त्यांनी केल्या आहेत, एकतर त्यांनी खोटे सांगितले की त्यांचे कान्स्टिट्युशन जे आहे, प्रत्येक पक्षाचे एक कान्स्टिट्युशन असते. हे बदलण्यात आले आहे. त्यात जे कार्याध्यक्ष असतील त्यांना पक्षाचे पूर्ण अधिकार दिले जातील.

पुढे रोहित पवार म्हणाले, म्हणजे अजितदादांना जाउन फक्त १८ दिवस झाले होते आणि १६ फेब्रु वारी रोजी हे पत्र सुनेत्रा काकींना न सांगता, पार्थ पवारला न सांगता, बाकी आमदारांना विश्वासात न घेता इलेक्शन कमिशनला देण्यात आले. विशेषतः अजितदादांची ताकद आणि पक्षाचे पूर्ण अधिकार प्रफुल्ल पटेल यांना दिले गेले. जे सुनेत्रा काकींना कळले असणार आणि त्यांनी लगेच पत्रव्यवहार केला.

**अजितदादा जिवंत असताना घराबाहेर ब्लॅक मॅजिक-**आता यात बघा अजितदादा जिवंत असताना त्यांच्या घराबाहेर ब्लॅक मॅजिक केले जाते. कदाचित नाशिकचाच जो भोंदूबाबा आहे तिथे काळी जादू करण्याचा प्रयत्न होतो. याच्यामागे कारण म्हणजे पक्षावर ताबा मिळावा असे होते का? त्यानंतर २८ तारखेला अजितदादांचा अपघात झाला की घातपात झाला हे आम्ही शोधत आहोतच. त्यानंतर दुस-याच दिवशी म्हणजे दोन दिवसांत पीयूष गोयल यांचे स्टेटमेंट येते की, प्रफुल्ल पटेल हे अजितदादा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले आहेत. नंतर ते म्हणाले की मी चुकून बोललो. पण क्रमवारी बघितली तर असे दिसते की, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि काही इतर पक्षाच्या नेत्यांमध्ये या गोष्टी आधीच ठरल्या होत्या. हे आधीच ठरले होते की पक्षाचा कंट्रोल घ्यायचा आहे, तर मग जेव्हा



अजितदादांचे अन्त्यविधी होत होता तेव्हा सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल तिथे आले. काय हेतू घेउन तिथे आले होते? त्याच्यामागे २७ तारखेच्या बैठकीचा देखील काय हेतू होता? या सगळ्या गोष्टींचा तपास केला गेला पाहिजे, अशी मागणी रोहित पवारांनी केली.

**तटकरेंचा पलटवार-** अजित पवारांच्या अपघातानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्या विरोधात काय-काय कट कारस्थान रचले गेले याची संपूर्ण माहिती आपल्याकडे आहे, ते सगळे आपल्याला बोलावे लागेल, असा इशारा तटकरे यांनी दिला. अजित पवार हयात असताना त्यांच्या विरोधात कट कारस्थान केले गेले. आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार आणि आमच्या पक्षाच्या विरोधात आज तीच कट कारस्थाने सुरू आहेत. आम्ही सगळ्यांनी अजितदादांना सावली सारखी साथ दिली.

## देशाला मिळणार 100 नवीन विमानतळ

**नवी दिल्ली:** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज देशाच्या विमान वाहतूक, इमिग्रेशन आणि पर्यावरणाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये देशभरात १०० नवीन विमानतळ उभारण्यास मंजुरी, उडान २.० योजनेचा विस्तार, तसेच परदेशी नागरिकांच्या व्हिसा आणि ट्रॅकिंग प्रणालीची योजना २०३१ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारने देशभरात १०० नवीन विमानतळ उभारण्यास मंजुरी दिली आहे. प्रत्येक विमानतळासाठी सरासरी सुमारे १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पासाठी सरकारने १२,१५९ कोटी रुपयांचा बजेट निश्चित केला आहे. हे विमानतळ चॅलेंज मोडमध्ये उभारले जाणार आहेत. म्हणजेच, ज्या राज्य किंवा शहराकडून जमीन सुरक्षा व्यवस्था, आवश्यक सुविधा लवकर आणि चांगल्या पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जातील, त्या ठिकाणांना विमानतळासाठी प्राधान्य दिले जाईल. देशातील लहान शहरांना हवाई सेवेशी जोडण्यासाठी सुरू असलेली उडान योजना आता पुढील १० वर्षांसाठी (२०३६ पर्यंत) वाढवण्यात आली आहे. या ➪(पान २ वर)

## ईशान्येश्वर मंदिरासाठी 1.5 कोटी निधी मंजूर

**नाशिक :** बहुचर्चित भोंदूबाबा अशोक खरात उर्फ कॅप्टन याच्या ईशान्येश्वर मंदिर परिसरासंदर्भातील निर्णयांमुळे पुन्हा एकदा राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात दारणा धरणातून पाणी आरक्षण देण्याचा निर्णय वादात असतानाच, आता फडणवीस सरकारच्या काळातही या मंदिराच्या विकासासाठी पर्यटन विभागामार्फत तब्बल १ कोटी ५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांच्या कार्यकाळात हा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यामध्ये मंदिर परिसराचा विकास, सभामंडप बांधकाम तसेच इतर पायाभूत सुविधांची कामे प्रस्तावित आहेत. एकीकडे सर्वसामान्यांना मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत असताना, दुसरीकडे खरातच्या संस्थांना सातत्याने मुक्त हस्ते मदत मिळत असल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे या निर्णयांमागील निकष, पारदर्शकता आणि प्राधान्यक्रम याबाबत प्रश्न उपस्थित होउ लागले आहेत. या प्रकरणामुळे पुन्हा एकदा राजकीय हस्तक्षेप, निधी वाटपातील प्राधान्यक्रम आणि प्रशासनाच्या भूमिकेबाबत चर्चा रंगण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवर या विषयावर प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, येत्या काळात हा मुद्दा अधिकच गाजण्याची चिन्हे आहेत. सिन्नर तालुक्यातील ईशान्येश्वर मंदिराशी संबंधित संस्थांचे प्रमुख अशोक खरात याची विविध राजकीय नेत्यांशी जवळीक असल्याचे समोर आले आहे. या संबंधातून खरातने आपल्या संस्थांना शासकीय सवलती मिळवल्या. त्यामुळे हा विषय अधिकच चर्चेत आला आहे.



### भोंदूबाबा खरातवर फडणवीसांची कृपा?




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती महानगरपालिकेत IWMS प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कामकाजात सुधारणा



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने आज महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली IWMS (Integrated Work Management System) प्रणालीसंबंधी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रशिक्षण कार्यशाळा बिश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पार पडली.

कार्यक्रमात महानगरपालिकेचे उपायुक्त नरेंद्र वानखडे तसेच विविध विभागांचे अभियंते आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थितांना IWMS प्रणालीचे उद्दिष्ट, फायदे आणि कार्यान्वयनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

IWMS प्रणालीचा मुख्य उद्देश महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवणे आहे. यामुळे प्रकल्प व्यवस्थापन, देखभाल, संसाधन व्यवस्थापन, कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि तांत्रिक अहवाल तयार करणे यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठा बदल होणार आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, 'IWMS प्रणालीचा योग्य वापर करून नागरिकांना जलद, कार्यक्षम आणि पारदर्शक सेवा देऊ शकतो.'

कार्यशाळेत उपस्थित अभियंत्यांना प्रणालीचे तांत्रिक तपशील, डेटा एन्ट्री, मॉड्युल्सची कार्यपद्धती, अहवाल तयार करणे, तसेच प्रकल्प व्यवस्थापनाची नवीन पद्धत याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, उपस्थितांना कार्यशाळेतून प्रत्यक्ष ॲप्लिकेशनचा प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले, ज्यामुळे प्रणाली अधिक प्रभावी आणि सहज वापरण्यायोग्य ठरेल.

प्रशिक्षणादरम्यान उपस्थित अभियंत्यांनी प्रणालीबाबत विचारणा केली, अनुभव व अडचणी मांडल्या आणि त्यावर प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. या संवादात्मक सत्रामुळे प्रशिक्षण अधिक परिणामकारक ठरले आणि सहभागी अभियंत्यांना प्रणालीबाबत स्पष्टता मिळाली. उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनीही या चर्चेत सक्रिय सहभाग घेत, विविध अडचणी व सूचना नोंदवल्या.

महानगरपालिकेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे हे नागरिकांसाठी उत्कृष्ट सुविधा देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. IWMS प्रणालीद्वारे कामकाज अधिक जलद, सोयीस्कर आणि पारदर्शक होईल, तसेच विविध विभागांमधील समन्वय सुधारेल.

# ३ वर्षांपासून रखडलेल्या पांदण रस्त्याने घेतला मोकळा श्वास

## मंडळ अधिकारी संगिता धारणे यांच्या नेतृत्वात कार्य



**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** २०२३ मध्ये नायब तहसिदार नामदेव गंडलिंग यांच्या अधोरेखित आदेशित झालेला गंगाजळी विरूळ पांदण रस्ता तब्बल ३ वर्षानंतर आज दि. २५ मार्च २०२६ रोजी मोकळा करण्यात आला. जे काम पुरुष अधिकारी यांच्या नेतृत्वात झाले नाही ते संगिता धारणे महिला मंडळ अधिकाऱ्याच्या नेतृत्वात पूर्ण झाल्याने शेतकरी वर्गातून या महिला अधिकाऱ्याचे कौतुक होत आहे. यापूर्वी नायब तहसीलदार आशिष बीर, वसंत पखाले, नरेंद्र सयाम मंडळ अधिकारी विजय मसने, नरेंद्र उईके, असे एक ना अनेक अधिकारी पोलीस बंदोबस्तात गंगाजळी येथील शेत सर्वे न. १७५,१७६, १८०, १८१ या शेताला मिळालेला पांदण रस्ता मोकळा करण्यासाठी आले मात्र कोणत्या ना कोणत्या कारणास्तव आदेश होऊन सुद्धा रस्ता मोकळा करण्यात आला नव्हता. मात्र आज रोजी मंडळ अधिकारी संगिता धारणे यांच्या नेतृत्वात त्यांच्या कर्मचाऱ्याच्या अधिनस्त व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत आदेशित रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे. पालकमंत्री यांच्या सूचनेनुसार महाराजस्व अभियानामुळे पांदण रस्ते मोकळे करण्याला आला. छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान अंतर्गत १८ फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात तहसीलदार अभय घोरपडे यांच्याकडे रखडलेल्या रस्त्याबाबत विषय मांडण्यात आला. त्यावर त्यांनी लगेच नायब तहसीलदार रितुराज पिटुरकर यांना संबंधित रस्ता मोकळा करण्यासंदर्भात सूचना केला होत्या. त्या अनुषंगाने रस्ता मोकळा करण्यासाठी मंडळ अधिकारी संगिता धारणे यांना सूचित करण्यात आले होते. त्यामुळे आज सकाळी १० वाजता पासूनच मंडळ अधिकारी आपल्या चमूसह घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. सुरुवातील काही शेतकऱ्यांनी नेहमीसारखे आपले गाऱ्हाणे मांडले मात्र नकाशानुसार पांदण रस्ता मोकळा केल्यास चारही शेतकऱ्यांच्या शेताचे दोन भाग पडणार असे तटस्थपणे सांगितल्यानंर काही शेतकऱ्याने नमते घेत सामंजस्याने आपल्या धुऱ्यालगत ८ फूट रस्ता मोकळा करून घेतला. यामध्ये मंडळ अधिकाऱ्यांसह ग्राम महसूल अधिकारी तातेश्वर पाटील यांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली. दरम्यान गंगाजळी येथील शेत सर्वे न. १७५,१७६, १८०, १८१ शेताचा संपूर्ण रस्ता मोकळा करतेवेळी मंडळ अधिकारी संगिता धारणे, ग्राम महसूल अधिकारी पूजा बोटरे, तातेश्वर पाटील, गणेश उईके, राहुल पराते, कर्मचारी प्रदीप देशमुख, दिलीप वाळके सह शेतकरी उत्तम वानखडे, विनायक वानखडे, सतीश गावंडे, अंकुश वानखडे, श्रीधर गावंडे, दादाराव उईके उपस्थित होते.

# शेतात लेआउट टाकून प्लॉटची विक्री, शेतकऱ्याची केली फसवणुक

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या मौजे दुर्गवाडा शेतशिवारात एका शेतकऱ्याचे शेत खरेदी करत त्यामध्ये लेआउट टाकून प्लॉटची विक्री केली.

तसेच २५ लाख रुपयांनी शेतकऱ्यांना फसविले.

या प्रकरणात पोलिसांनी अनिल नामदेवराव सावदेकर (वय ६३, जीवन ज्योती कॉलनी ) यांच्या तक्रारीवरून आरोपी आनंद जयंतराव तायडे (५०) यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार अनिल सावदेकर यांचे मोर्शी तालुक्यात मौजा दुर्गवाडा येथे शेतशिवार आहे. शेत सर्वे नंबर ४२ मध्ये एक हेक्टर ३५ आर शेत खरेदी करत त्या मध्ये प्लॉट टाकून आरोपी आनंद तायडे यांनी प्लॉटची परस्पर विक्री केली आणि अनिल सावदेकर यांना २५ लाखांनी फसविले.

आपली फसवणूक झाली हे लक्षात आल्यावर सावदेकर यांनी याची तक्रार पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या कडे केली. पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार मोर्शी पोलिसांनी आनंद तायडे विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## देशभरात पेट्रोल-डिझेल

रिजिजू पुढे म्हणाले, सरकारच्या वतीने विरोधी पक्षांच्या ज्या काही शंका होत्या किंवा जो काही संभ्रम होता, त्या सर्वांचे सरकारने अत्यंत स्पष्टपणे निरसन केले. बैठकीच्या शेवटी विरोधी पक्षांनी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट नमूद केली; ती म्हणजे, ही सर्वपक्षीय बैठक आयोजित केल्याबद्दल त्यांनी सरकारचे आभार मानले. त्यांनी हे देखील ठामपणे सांगितले की, अशा कठीण आणि आव्हानात्मक परिस्थितीत आपण सर्वांनी एकजुटीने उभे राहिले पाहिजे. पंतप्रधान मोदींनी संसदेच्या माध्यमातून असे आवाहन केले आहे की, कोणत्याही आव्हानात्मक परिस्थितीत भारतीय संसदेने एकजुटीने उभे राहिले पाहिजे. मला असे वाटते की, बैठकीच्या शेवटी आपले मत व्यक्त करताना विरोधी पक्षाने एक प्रकारची परिपक्वता दर्शवली आहे; ती म्हणजे, कोणत्याही आव्हानात्मक परिस्थितीत सरकार उचलत असलेल्या पावलांच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहतील.

## देशाला मिळणार १०० नवीन

योजनेसाठी सरकार २८,८४० कोटी रु पये खर्च करणार आहे. यामुळे सामान्य नागरिकांसाठी हवाई प्रवास अधिक स्वस्त आणि सुलभ होण्याची अपेक्षा आहे. सरकार देशभरात २०० नवीन आधुनिक हेलीपॅड उभारणार आहे. विशेषत? डोंगराळ भाग, ईशान्य भारत आणि बेट क्षेत्र...जिथे रस्ते बांधणे कठीण आहे, तिथे हेलिक?प्टर हा मुख्य वाहतूक पर्याय बनवण्याचा सरकारचा उद्देश आहे. या प्रकल्पासाठी ३,६६१ कोटी रु पये खर्च करण्यात येणार आहेत. याशिवाय भारतात तयार होणा-या विमानांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन विमान खरेदीसाठी ४०० कोटी रु पयांचा निधी ठेवण्यात आला आहे. भारतामध्ये येणा-या परदेशी नागरिकांच्या व्हिसा, नोंदणी आणि ट्रॅकिंगशी संबंधित क्ष्ज्ऱ्ढच् योजना पुढील ५ वर्षांसाठी, म्हणजे १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेसाठी १,८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, भारताची इमिग्रेशन आणि व्हिसा प्रणाली अधिक आधुनिक आणि सुरक्षित बनवणे हा यामागील उद्देश आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२५ ते २०३५ या कालावधीसाठी भारताचे नवीन पर्यावरण लक्ष्य मंजूर केले आहेत. या निर्णयाचा उद्देश प्रदूषण कमी करणे, पर्यावरण संरक्षण, शा⃞ात विकास हा आहे.

## पोलीस कुटुंबाच्या आनंदावर काळाचा

त्यामुळे मोठा अपघात घडला. धडक एवढी जोरदार होती कि, त्यामध्ये पो. उप निरीक्षक राहुल वानखडे यांची कार चकणाचुर झाली असून त्यांची ८ वर्षीय मुलगी त्रिशा राहुल वानखडे हिचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर त्यांची पत्नी व ते स्वतः गंभीर जखमी असून त्यांच्यावर यवतमाळ येथे उपचार सुरु आहे. अँब्युलन्स मध्ये कोणताही रुग्ण नव्हता. चालक मध्यपान करून भरधाव वेगाने गाडी चालवीत असल्याची प्राथमिक माहिती आहे. सध्यस्थित चालक पोलिसांच्या ताब्यात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मृतक त्रिशा वानखडे ही धामणगाव रेल्वे येथी एसओएस येथे तिसऱ्या वर्गात शिकत होती. तिचा प्रथम क्रमांक आल्याने त्या आनंदात पोलीस उप निरीक्षक राहुल वानखडे हे आपल्या पत्नीसह शाळेत पेढे वाटण्याकरिता गेले होते. दरम्यान परत येत असताना देवगाव येथील पेट्रोलपंपवर पेट्रोल भरून परत तळेगाव द. येथे जात असतांना पोलीस कुटुंबाच्या आनंदावर काळाने घात केला. सदरच अपघाताचा संपूर्ण प्रकार चौफुलीवरून सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. अधिक तपास तळेगाव दशासर पोलीस करीत आहे.

## लक्ष्मी गॅस एजन्सीला कुलूप

जाब विचारला. जबरदस्त आक्रोश यावेळी नागरिकांनी व्यक्त केला. नागरिकांचा आक्रोश पाहून आणि प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अन्नधान्य वितरण अधिकारी प्रवीण राऊत आपल्या ताफ्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यावेळी ग्राहकांनी अधिकाऱ्यांसमोरच जोरदार घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त केला. अखेर वाढता तणाव पाहता, पोलीस बंदोबस्तात एजन्सीच्या बंद शटरचे कुलूप उघडण्यात आले. शहरात गॅस पुरवठा सुरळीत असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी कालच दिले होते. मात्र, एका एजन्सीने हजारो ग्राहकांना वेठीस धरल्याने प्रशासनाचा हा दावा फोल ठरला आहे. गॅस एजन्सीच्या या मुजोरीमुळे सामान्यांचे हाल होत असून, संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. इराण, इस्त्राईल, अमेरिकेमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अनेक अडचणी समोर येत आहे. अशात देशभरात गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. सिलेंडरसाठी मारामार होत आहे. ग्राहक इकडे तिकडे भटकत आहे. अशात एजन्सी संचालक आपला मनमानी कारभार चालवत आहेत. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

## थकीत मालमत्ता करांवर मनपाची

थकीत प्रकरणांवर करण्यात आलेल्या या कारवाईमुळे मनपाच्या वसुली मोहिमेला गती मिळाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, वॉर्ड क्रमांक 1 मधील मालमत्ता क्रमांक १६३६ या प्रकरणात मनपाने जप्तीनाम्याची कारवाई केली होती. या मालमत्तेवर रु. १,५७,०००/- इतका कर थकीत होता. जप्तीनामा देण्यात आल्यानंतर संबंधित मालमत्ताधारकाने तातडीने प्रतिसाद देत थकीत रकमेतून रु. ७०,०००/- इतकी रक्कम जमा केली. उर्वरित रक्कमही लवकरच भरण्याचे आश्वासन धारकाने दिल्याची माहिती मनपाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

या संपूर्ण कारवाईदरम्यान सहायक क्षेत्रीय अधिकारी अजय बनसेले, कर निरीक्षक संजय निकम, वसुली लिपिक इटणकर, सुरक्षा रक्षक विजू तर्हेकर, अमर सिर्वाणी, अमित घिमे, मोहतुरे तसेच इतर मनपा कर्मचारी उपस्थित होते. पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई पार पाडत कोणतीही अडचण न येऊ देता कार्यवाही यशस्वीरीत्या पूर्ण केली. मनपाच्या वतीने सांगण्यात आले की, शहरातील थकीत कर वसुलीसाठी पुढील काळातही अशाच प्रकारच्या कडक कारवाया सुरू राहणार आहेत. कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर सीलिंग, जप्ती यांसारखे उपाय अवलंबले जातील. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने थकीत कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

या कडक कारवाईमुळे थकीत कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या नागरिकांना मोठा इशारा मिळाला असून, आगामी काळात मनपाच्या वसुली मोहिमेला अधिक वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**विलासनगरातील दुकानावर जप्ती-** अमरावती महानगरपालिकेच्या झोन क्र. १ अंतर्गत रामपुरी कॅम्प प्रभागात थकित मालमत्ता कर वसुलीसाठी आज बुधवारी (दि. २५ मार्च २०२६) कारवाई करण्यात आली. सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या आदेशानुसार, वार्ड क्र. -१३ मधील मालमत्ता क्रमांक १६८० ही थकबाकीदार असल्याने विलासनगर परिसरातील संबंधित दुकानावर जप्तीची कारवाई करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्तेला सील करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिकेकडून वारंवार नोटीस देऊनही कर न भरल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या मोहिमेद्वारे थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरावा, असे आवाहनही महानगरपालिकेने केले आहे.

## गुन्हे शाखेत काम करण्यास पीआय

अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावतीची कायदा व सुवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सभागृहात महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. अमरावती शहरात अंमली पदार्थ विक्रीचे प्रमाण वाढत असल्याने अमरावती शहर हे एम.डी. तस्करीचे हब बनत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. या संदर्भात मागील आठवड्यात अधिवेशनात मुद्दा उपस्थित केल्या नंतर दोन दिवसांनी गुन्हे शाखेच्या वतीने धाडी टाकून कारवाई करण्यात आली. तो पर्यंत कोणतीही कारवाई झाली नसून आता सर्व कारवाया गुन्हे शाखेच्या वतीने करण्यात आल्या. ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एम. डी.ड्रग्स सारखे अंमली पदार्थ आढळून आले आहेत . तिथे गुन्हे शाखेच्या वतीने धाडी टाकून कारवाई केली. मात्र संबधित पोलीस स्टेशन चे अधिकारी व आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी याबाबत कारवाईला घेऊन हतबल असल्याबाबत आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले.

त्यांनी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या कामकाजावर देखील साशंका व्यक्त करून ते तात्पुरते पोलीस निरीक्षक असल्याचे सांगितले. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक म्हणून काम करण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या काही मार्गदर्शक सुचना आहेत, सर्वप्रथम सदर अधिकारी बी प्लस वर्गवारीतील असावा व किमान दोन पोलीस स्टेशन मध्ये त्यांनी पोलीस निरीक्षक म्हणून काम केल्याचा अनुभव महत्वाचा आहे. त्यांच्या विरोधात कुठलीही चौकशी चालू नसावी तसेच गुन्हा दाखल नसावा. अशी व्यक्ती गुन्हे शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून काम करण्यासाठी पात्र ठरत असते. मात्र अमरावती शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण हे या पात्रतेत बसत नसून त्यांना ६ महिने कैद झाली असून अँटी करप्शनच्या जाळयात सुद्धा ते अडकले होते. अशा वादग्रस्त व्यक्तीला अमरावती मध्ये पदोन्नतीवर गुन्हे शाखेत तात्पुरते पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. संदीप चव्हाण गुन्हे शाखेत पीआय म्हणून काम करण्यास अपात्र असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आ. संजय खोडके यांनी अधिवेशनातून केली आहे.

अधिवेशनात कायदा व सुव्यवस्था संदर्भात बोलत असतांना ते म्हणाले कि, गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्यात गुन्हेगारीचा आलेख कमी झाला आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात पोलिसांची कामगिरी अत्यंत चांगली असल्याने सायबर गुन्हे असो अथवा अंमली पदार्थ विरोधी कारवाई असो यात पोलिसांनी कामगिरी केली आहे. यात गृह विभागाच्या वतीने पोलिसांना मिळणारे पाठबळ सुद्धा तितकेच महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे अमरावती पोलीस विभागाला सुद्धा चांगले पाठबळ देण्याची गरज आहे. अमरावती शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता पोलीस स्टेशनची संख्या हि १० वरून अधिक वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी तपोवन , साई नगर व एमआयडीसी या तीन नवीन पोलीस स्टेशनचा सुद्धा शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, तो मान्य करावा , अशी विनंती सुद्धा आ. संजय खोडके यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत असतांना केली.

तसेच पोलीस कल्याणच्या दृष्टीने अमरावती शहरातील पोलीस वसाहत निर्माण करण्याचा प्रस्ताव व शहरात विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबतही लवकरात लवकर निर्णय घेण्याची गरज असल्याचे आ.संजय खोडके अधिवेशनात म्हणाले. तसेच वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या महत्वाची आहे. आज २०२४ पासून पाहिले तर महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटीवर गेली आहे. त्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्थेला घेऊन पोलिसांची संख्या ९८ हजार इतकी होती. म्हणजे त्यांचे प्रमाण १ लाख लोकसंख्येच्या मागे १७२ पोलीस हे प्रमाण आहे. त्यादृष्टीने आज पोलीस खात्यामध्ये पोलिसांची संख्या वाढविण्याची गरज असल्याचे सांगून आमदार संजय खोडके यांनी अनेक पोलीस स्टेशनमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांची असलेली उणीव भरून काढण्यासंदर्भात सुद्धा शासनाचे लक्ष वेधले.

## नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या

अशात तिने आपल्या खोलीमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच नागरिकांची बरीच गर्दी येथे जमा झाली. कुटुंबीयांनी तिला खाली उतरविले आणि पोलिसांना सूचित न करता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. पण तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी तिला मृत पाहून पोस्टमार्टमसाठी पाठवले. यानंतर गाडगे नगर पोलिसांना माहिती देण्यात आली.माहिती मिळताच पोलीस जिल्हा सामान्य रुग्णालयात पोहोचले. त्यांनी तरुणी बद्दल माहिती घेतली आणि घटनास्थळाचा पंचनामा केला. सलोनीने आत्महत्या का केली हे, अजून पर्यंत स्पष्ट झालेले नाही.

## किरण पातुरकर यांचे स्वयंरोजगार

टीम चे कौतुक केले, महिलांच्या सक्षमिकरणासाठी ही संस्था प्रत्यक्ष जमिनीवर राहून काम करते यातून महिला आर्थिक दृष्टया सक्षम होतील असेही त्या म्हणाल्या. प्रशासन व व्यक्तिशः त्या स्वतः उद्योजकता विकास अभियान सहकार्य करतील असे त्यांनी जाहिर केले.

धूपबत्ती आणि अगरबत्ती उत्पादन अमरावतीत गृह उद्योग च्या स्वरुपात घरोघरी सुरु करण्याचा स्वयंसिद्ध चा संकल्प असल्याचे किरण पातुरकर यांनी जाहिर केले. महिलांना स्वावलंबनाच्या दिशेने प्रेरित करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला स्वयंसिद्ध उद्योजकता विकास अभियान मल्टिपरपज फाऊंडेशन व MIDC असोसिएशनचा विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिलांचा मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे उद्घाटन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या हस्ते करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किरण पातूरकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून श्रुती आगलावे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. मोनिका उमक, नेत्रदीप चौधरी (MCED), उज्वला काळे (पर्यटन अधिकारी) यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमात नितिन पाटमासे यांनी धूपबत्ती निर्मितीचे प्रत्यक्ष मशीनवर प्रात्यक्षिक सादर केले, ज्यामुळे उपस्थित महिलांना उद्योगाची सखोल माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या प्रात्यक्षिकाला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्जसहाय्य, प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे, कच्चा माल पुरवठा तसेच तयार माल खरेदीची सुविधा देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे महिलांना उद्योग उभारणीसाठी संपूर्ण मदत मिळणार आहे. महिलांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा आणि स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन आयोजक किरण पातूरकर व प्रा. डॉ. मोनिका उमक यांनी यावेळी केले. हा कार्यक्रम महिलांच्या सशक्तीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला असून, भविष्यात अशा उपक्रमांची अधिक गरज असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा.मोनिका उमक तसेच आभार प्रदर्शन कीर्ती देशमुख यांनी केले. यावेळी स्वयंसिद्ध उद्योजकता विकास अभियानाच्या उद्योजिका जयश्री गुंबळे स्मिता,घाटोळ, मंगला चांदुरकर, रश्मी इंदूरकर, प्रतिभा तायडे, तसेच बंसल क्लासेसच्या संयोजिका श्रुती आगलावे उपस्थित होत्या. या कार्यक्रमात संपूर्ण पाचही जिल्ह्यातून मोठ्या संख्येने महिला उपस्थित झाल्या होत्या.

## चांदूर बाजारात शेतकरी

कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी झालेल्या आंदोलनांच्या आठवणींना उजाळा दिला. उपोषण, मोर्चे आणि विविध आंदोलनांच्या माध्यमातून शासनापर्यंत आपला आवाज पोहोचवण्यासाठी केलेला संघर्ष आठवत अनेक शेतकरी भावूक झाले. 'हा निर्णय आमच्या संघर्षाचा विजय आहे,' अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी बच्चू कडू म्हणाले की, 'हा लढा इथेच संपलेला नाही. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळाला पाहिजे ही आमच्या लढ्यातील प्रमुख मागणी आहे. तसेच आज २ लाखांपर्यंतची कर्जमाफी झाली असली तरी जे शेतकरी नियमितपणे कर्जाची परतफेड करतात, त्यांनाही २ लाखांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ मिळाला पाहिजे. यासाठी आम्ही पुढेही प्रयत्नरत राहणार आहोत.'

शेतकऱ्यांनी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या आंदोलनामुळेच शासनाला हा निर्णय घ्यावा लागला, असे सांगत त्यांचे आभारही मानले. तसेच, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पुढेही अशीच एकजूट कायम ठेवण्याचा निर्धार करण्यात आला.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. एकूणच, चांदूर बाजारात कर्जमाफीच्या निर्णयानंतर आनंद, समाधान आणि संघर्षाच्या यशाचा उत्सव अशा भावनांचा संगम पाहायला मिळाला.

## पतीच्या निधनानंतर पत्नीनेही

आणि येनूबाई हे दोघेही गेल्या काही दिवसांपासून आजारपणाशी झुंज देत होते. कुटुंबियांकडून त्यांची योग्य काळजी घेतली जात होती. मात्र, नियतीला काही वेगळेच मान्य होते. २३ मार्च रोजी प्रथम विश्वासराव गवई यांनी अखेरचा श्वास सोडला. त्यानंतर अवघ्या काही तासांतच पत्नी येनूबाई यांचीही प्राणज्योत मालवली. अर्ध्या शतकाचा सहवास असा एकाच वेळी संपल्याने कुटुंबासह संपूर्ण गावाला मोठा धक्का बसला.

दोघांची अंत्ययात्रा गावातून एकत्रच काढण्यात आली आणि त्यांच्यावर एकाच वेळी अंत्यसंस्कार करण्यात आले. सुख- ☞**(पान २ वर)**

दुःखाच्या प्रवासात आयुष्यभर एकमेकांना आधार देणाऱ्या या दांपत्याची एक्झिटही सोबतच झाल्याने ग्रामस्थ भावूक झाले होते. या दुःखद प्रसंगी अनुबाई आणि विश्वासराव गवई यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पांडुरंग गवई, दिलीप गवई, शेषराव गवई, प्रकाश गवई ,भारत गवई, प्रशांत गवई, स्वप्निल गवई, सुमित, संपूर्ण गावकरी आणि नातेवाईकांनी दुःख सावरत दोघांचे अंतिम संस्कार केले.

## मोबाईल हिसकावणारा फरार

१८, रा. बजरंग नगर) या के.एल. कॉलेजसमोरील रस्त्याने विलासनगरकडे जात असताना, अज्ञात आरोपीने इलेक्ट्रिक मोपेडवरून मागून येत त्यांच्या हातातील सुमारे ८ हजार रुपये किमतीचा व्हिओ कंपनीचा मोबाईल हिसकावून नेला होता. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात कलम ३९२ भादंवि अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान आरोपी म्हणून सोहेल शाह सलीम शाह (वय २५, रा. सुलतानपूर, ता. अचलपूर) याचे नाव समोर आले होते. मात्र तो गुन्ह्यानंतर फरार होता. दरम्यान, २४ मार्च २०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी सरमसपुरा परिसरातील ऑटोस्टँडवर असल्याचे समजताच डी.बी. पथकाने तातडीने हालचाल केली. तपास अधिकारी पोउपनि. गजानन अन्सापुरे यांच्या नेतृत्वात पथकाने सरमसपुरा व सुलतानपूर परिसरात शोधमोहीम राबवून आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला गुन्हा उघडकीस आला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गाडगेनगर डी.बी. पथक प्रमुख सपोनि. मनोजकुमार मानकर, पोउपनि. गजानन अन्सापुरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई केली.

## गोकुलम गौरक्षणमध्ये पशुचिकित्सा

तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिरात शिंगांचा कॅन्सर, हर्निया, डोळ्यांचा कॅन्सर ,शेपटीचा कॅन्सर, रिंगणी ऑपरेशन सर्व प्रकारच्या आजारांची पशुपक्षी ,प्राणी यांच्या इतर आजाराची सुद्धा तपासणी व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शिबिरात पशुसंवर्धन विभाग व सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी व तज्ञ डॉक्टर आपली सेवा देणार आहे. शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व पशूंच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बंधू , पशुपालक व गोशाला संचालकांनी सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचे आवाहन गोकुलम गौरक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९३७११९४३९१,९३२५१२४८९१,९६६५११३१११, ९४०३०६३३९७ वर संपर्क करून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये डॉ.हेमंत मुरके यांच्या सोबत डॉ.करुणा मुरके, डॉ. राधेश्याम बहादुरे, डॉ. चंद्रशेखर गिरी, विनय बोथरा, डॉ. अशोक किनगे, चेतन खडसे, अमित उमेकर ,विजय शर्मा, विष्णुदास गाढवे आदि उपस्थित होते.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २६ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com




# करा चेक, घोटाळे अनेक

## वाहाळा बु. मध्ये ग्रामसेवक सागर रोठे यांच्यावर गंभीर आरोप






**अकोला :** पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या वाहाळा बु. ग्रामपंचायतीत कथित भ्रष्टाचाराचे प्रकरण चिघळले असून ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामपंचायतीचे माजी सदस्य संघपाल संसारे यांनी १६ एप्रिलपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे.

### तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; १६ एप्रिलपासून आमरण उपोषणाचा इशारा

**ग्रामसेवकाला अभय कुणाचे?**

जुन्या विहिरींवर नवीन लाभ दाखवणे, अतिक्रमित जमिनीवर योजना राबवणे, सांडपाणी व्यवस्थापन व शौचालय प्रकल्प अपयशी ठरणे अशा अनेक बाबींचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने ग्रामसेवक सागर रोठे यांना कोणाचा आशीर्वाद आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे आणि सचिव सागर रोठे यांना तत्काळ निलंबित करावे, अन्यथा जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**प्रशासन मृत्यूची वाट बघणार का?**

विकासकामांतील अनियमिततेबाबत अनेकदा वृत्तपत्रांतून बातम्या प्रसिद्ध झाल्या, तरीही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. पैसे न दिल्याने पिंपळखुटा येथील युसुफ शाह या घरकुल लाभार्थ्याचा हप्ता रखडल्याची बाब समोर आली आहे. यामुळे संतप्त झालेल्या लाभार्थ्याने जिल्हा परिषद कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली. त्यामुळे प्रशासन तक्रारदारांच्या टोकाच्या पावलांची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे



**भ्रष्टाचाराला आळा घालणे गरजेचे**

सागर रोठे यांच्याकडे सध्या वाहाळा बु., पिंपळखुटा आणि राहेर या तीन गावांचा कार्यभार आहे. या सर्व गावांमध्ये प्रशासकीय कामकाजाबरोबरच राजकीय हस्तक्षेपात ते सक्रीय असल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्यांना कायमस्वरूपी पदावर नियुक्त करू नये, अन्यथा भ्रष्टाचाराला अधिक खतपाणी मिळेल, अशी मागणी नागरिकांकडून पुढे येत आहे.

सुमारे १२०० लोकसंख्या असलेल्या गावात २०२३ मध्ये रुजू झालेल्या ग्रामपंचायत सचिव सागर रोठे यांच्यावर विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. अनेक कामे कागदोपत्री दाखवून लाखो रुपयांचा निधी हडप केल्याचा आरोप संसारे यांनी निवेदनात केला आहे.

ग्रामसभा न घेणे, निकृष्ट दर्जाची कामे करणे, तसेच विविध योजनांमध्ये अनियमितता केल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

गावातील नागरिकांच्या मते, तक्रारींचा पाढा वाढत असतानाही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे संबंधितांवर कोणाचे तरी अभय असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये रंगू लागली आहे.

गावातील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही. संबंधित अधिकारी व सचिव यांना तत्काळ निलंबित करावे, अन्यथा आम्हाला आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

**संघपाल संसारे,**
माजी सदस्य, ग्रामपंचायत वाहाळा बु.

---

माझ्यावरील लावण्यात आलेले सर्व आरोप बिनबुडाचे असून यापूर्वी त्यांनी दिलेल्या तक्रारीत चौकशी झाली आहे. तसेच चौकशी अहवाल सुद्धा तक्रारदार संघपाल संसारे यांना दिला आहे. सोबतच मागील काही काळात करण्यात आलेल्या तक्रारीमुळे अब्रुनुकसानीचा दावा सुद्धा टाकला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.

**सागर रोठे,** ग्रामसेवक

# जैन साधुसंतांसाठी खेर्डा कारंजा येथे 'सेवेचा दीप'

■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

आजच्या स्वार्थप्रधान आणि धावपळीच्या युगात, जिथे एका इंच जागेसाठीही वाद निर्माण होतात, तिथे खेर्डा कारंजा येथील माजी सरपंच विनोद ठाकरे यांनी दिलेले दान हे समाजासाठी प्रेरणादायी आणि हृदयाला स्पर्श करणारे ठरले आहे. आपल्या वडिल स्व. मारोतीराव ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी कारंजा–नागपूर महामार्गालगत असलेल्या शेतातील सुमारे २,००० स्क्वेअर फूट मौल्यवान जागा जैन साधुसंतांच्या सेवेसाठी समर्पित करून निःस्वार्थ सेवेचा आदर्श घालून दिला आहे.


लाखो रुपयांची किंमत असलेली ही जागा कोणत्याही दिखाव्याशिवाय, अत्यंत नम्रतेने समाजाला अर्पण करत ठाकरे यांनी 'दान' या संकल्पनेला एक वेगळी उंची दिली आहे. जैन साधुसंत हे पायी विहार करणारे, अत्यंत कठोर जीवनशैली अंगीकारणारे असून ते दररोज १५ ते २० किलोमीटर अंतर चालत असतात. अशा परिस्थितीत त्यांच्या विश्रांतीसाठी योग्य जागेची अत्यंत गरज असते.

# कारंज्यात श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन

■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

श्रीराम नवमी उत्सवानिमित्त कारंजा शहरात धार्मिक उत्साहाला उधाण आले असून, विविध कार्यक्रमांमुळे संपूर्ण शहर सध्या भक्तिरसात रंगून गेले आहे. श्रीराम नवमी उत्सव समिती, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ फेब्रुवारीपासून शहरातील मोठे राम मंदिर येथे विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत शहरातील विविध भागांतील भजनी मंडळांनी सादर केलेल्या भजन-कीर्तनांमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः २४ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'खाटू श्याम संध्या' या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. अमरावती येथील श्री श्याम लखदातार परिवार यांच्या संकीर्तनाने कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. या वेळी महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली.



मोठ्या राम मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली असून, संपूर्ण परिसर सणासुदीच्या उत्साहाने उजळून निघाला आहे.

दरम्यान, येत्या २६ मार्च रोजी दुपारी १२ वाजता मोठे राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळा भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रा निघणार असून, ही शोभायात्रा मोठे राम मंदिर येथून प्रारंभ होऊन शिवाजी नगर, आंबेडकर चौक, जयस्तंभ चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि टिळक चौक मार्गे समारोप मोठे राममंदीर या ठीकाणी होणार आहे.

या भव्य शोभायात्रेत रामभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीराम नवमी उत्सव समिती तर्फे करण्यात आले आहे.

# दत्त याग, हवन व सतपात्री दानातून सुख-शांती व समाधान मिळवा

■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

श्री सद्गुरू चरण स्पर्श पादुका मठाच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भक्तांना मार्गदर्शन करताना प.पू. सद्गुरू प्रा. डॉ. श्री अनिलजी वडाळकर महाराज यांनी 'श्री दत्त याग, हवन आणि सतपात्री दान यांच्या माध्यमातून मानवाला सुख, शांती व समाधान प्राप्त होऊ शकते' असे प्रतिपादन केले. वाशिम जिल्ह्यातील पवित्र भूमी असलेल्या श्री क्षेत्र कारंजा (लाड) येथील वरूननगर, मानोरा रोडवरील सद्गुरू कृपा चरण पादुका मठात पहिल्या वर्धापन दिनानिमित्त हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी उपस्थित भक्तगणांना संबोधित करताना सद्गुरूंनी कलियुगातील वाढत्या दुःख, अशांती व नकारात्मक प्रवृत्तींचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, कलियुगात कलीचा प्रभाव अधिक तीव्र होत असून त्यामुळे समाजात दुःखी व पीडितांची संख्या वाढत आहे. अशा परिस्थितीत भगवद्गीतेप्रमाणे दैवी शक्ती मानवकल्याणासाठी अवतरतात.

# श्रीराम जन्मोत्सव मिरवणुकीत बहुसंख्येने सहभागी व्हा; अंकुश गुजरे यांचे आवाहन

**मालेगाव :** येथे येत्या २६ मार्च रोजी शहरात भव्य श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून त्यात बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीराम जन्मोत्सव मिरवणूक समिती चे अध्यक्ष अंकुश गुजरे यांनी आव्हान केले आहे. मालेगाव शहरात येत्या २६ मार्च रोजी श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे या शोभायात्रेची सुरुवात गांधीनगर येथील विर भगतसिंग चौक हनुमान मंदिरापासून होणार असून नवीन बस स्थानक मार्गे विर लहुजी स्मारक समोरून नगरपंचायत समोरून शिव चौक, श्रीराम मंदिर येथे येवून प्रभु श्रीराम यांची आरती करून शोभायात्रा चा समारोप करण्यात येईल.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे शेख रहेमतुल्ला मोहम्मद सखावत यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे - मीरा खुर्द, मालमत्ता क्रं. १०५, ता. चिखली आणि जिल्हा. बुलढाणा.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे शेख रहेमतुल्ला मोहम्मद सखावत यांना सदर मालमत्ता हि वारसाने वडिलोपार्जित मिळाली आहे. तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता Piramal Finance ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर नोटीस देत आहे.

आपला
**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५

# मिरवणूक मार्गावरील काही झाडावरील आग्या मोहळाचा धोका निर्माण होण्याची शक्यता



■ **प्रतिनिधी | मालेगाव** ■

शहरातील मेन रोड लगतच असलेल्या पिंपळाच्या झाडाला अनेक आग्या मोहळाची पोळ समुदायाने असून येथून विविध मिरवणूका गावात जातात. त्यामुळे काही अनर्थ झाला व ह्या मधमाश्या हल्ला चढवू शकतात.

मेन रोड वरील डॉक्टर चव्हाण यांच्या दवाखान्या समोर पिंपळाच्या झाडावर व मिरवणूक मार्गावरील काही झाडे मोठ्या प्रमाणात आग्या मोहोळ मधमाश्याची जवळपास आठते दहा पोळे समुदायाने असून येथून जाणाऱ्या विविध मिरवणूका मधील वाजंत्री व डिजे साऊंड सिस्टीम आवाजाने त्या खवळलेल्या तर त्यापासून धोका निर्माण होवू शकतो त्या मधमाश्यानी टोळक्याने हल्ला करण्याची दाट शक्यता आहे.

सध्याची आजूबाजूलाच्या त्या मधमाश्या दुकानात येत आहेत. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. तरी लवकरात लवकर नगरपंचायत प्रशासनाने काही तरी उपाययोजना करून त्याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी नागरिकांची मागणी आहे. पुढील काही दिवसातच प्रभु श्री रामनवमी, श्री १००८ भगवान महावीर जन्मकल्याणक, तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूका याच मार्गाने पूढे गावात जातात तरी याची वेळीच नगर पंचायत प्रशासनाने काळजीपूर्वक दक्षता घेवून ही समस्या सोडवण्यासाठी हालचाल करणे गरजेचे आहे .

# गॅस सिलेंडरसाठी ग्राहक रांगेत तासनतास ताटकळत

■ **प्रतिनिधी | मानोरा** ■

शहरातील गॅस सिलिंडरची वितरण व्यवस्था कोलमडली असुन तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक ८ दिवसापासून दिवसभर उन्हातान्हात रांगेत उभे राहूनही घरगुती गॅस सिलेंडर मिळत नसल्याने संतप्त गॅस धारक ग्राहकांनी दि. २३ मार्च रोजी तहसीलदार यांना तक्रार निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी केली आहे.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मानोरा तालुक्यातील ग्रामीण भागातील गॅस ग्राहक मोलमजुरी बुडवून मागील ८ दिवसापासून दररोज शहरात सिलेंडर मिळविण्यासाठी येत आहेत. वयोवृद्धासह ३०० ते ४०० गॅस ग्राहक उन्हातान्हात दिवसभर रांगेत उभे राहूनही गॅस एजन्सीच्या मनमानी कारभारामुळे सिलेंडर विना खाली हात घरी परतत आहेत.



### तहसीलदार यांना निवेदनाद्वारे तक्रार

एकीकडे शासन सिलेंडरचा तुटवडा नसल्याचे सांगत आहे. तर दुसरीकडे ग्रामीण खेडेगावात सिलेंडर मिळेनासे झाले आहे. जर खरोखरच सिलेंडरचा तुटवडा नसेल तर ग्राहकांना होम डिलिव्हरी देणे आवश्यक आहे. दिवसभर त्यामुळे ग्राहकांना सुरळीत सिलेंडरचा पुरवठा करण्याच्या मागणीचे निवेदन दिले आहे. निवेदनावर रविंद्र शेटे, बंडू कराळे, रामेश्वर पवार, संजय राठोड, प्रमिला राऊत, लक्ष्मी कालापाड, अजाबराव चिस्तळकर आदीसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जाहीर नोटीस

**विदयमान ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

एम. ए. नं. ६१/२०२६ — प्रोसेस नं.२१२९/२०२६

चौ.ता. २८/०४/२०२६ — दिनांक : २५/०३/२०२६

**सुमन व इतर विरूध्द निरंक**

१. श्रीमती सुमन मुरलीधर कव्हर वय अं. ६५ वर्षे, धंदा- घरकाम. २. परमानंद मुरलीधर कव्हर वय अं. ३६ वर्षे, धंदा - मजुरी. ३. संतोष मुरलीधर कव्हर वय अं. ३६ वर्षे, धंदा - मजुरी. ४. सौ. वच्छलाबाई केशव आखाडे वय अं. ५२ वर्षे, धंदा - घरकाम ५. सौ. रेखा संतोष कावरखे वय अं. ४२ वर्षे, धंदा- घरकाम. ६. सौ. शारदा केशव अंभोरे वय अं. ४० वर्षे, धंदा -घरकाम. ७. सौ. उषा संतोष अवघडे वय अं. ४६ वर्षे, धंदा - घरकाम. अर्जदार क्र. १, २ व ३ रा. सावरगाव बरडे ता. जि. वाशिम अर्जदार क. ४ रा. वार्ड नं. २, आखाडे गल्ली डोणगाव ता. मेहकर जि.बुलढाणा अर्जदार क्र. ५ रा. महाकाली नगर, हरीहर पेठ, डॉ. बार्डिया दवाखाण्या जवळ डापकी अकोला ता. जि. अकोला. अर्जदार क. ६ रा. चिखली कवठा ता. रिसोड जि. वाशिम अर्जदार क. ७ रा. एकांबा ता. मालेगाव जि. वाशिम

**गैरअर्जदार :** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वाना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क. १ ही मयत नामे मुरलीधर कुंडलिक कव्हर यांची पत्नी आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयत नामे मुरलीधर कुंडलिक कव्हर यांचे मुले आहेत. अर्जदार क. ४ ते ७ हया मयत नामे मुरलीधर कुंडलिक कव्हर यांच्या मुली आहेत. मयत नामे मुरलीधर कुंडलिक कव्हर हे दिनांक ०८ / ११ / २०२५ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII. १८२७ चे कलम २' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. २८/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), वाशिम

# ध्येय निश्चित केल्यास यश हमखास - आकाश वर्मा

■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

ग्रंथसंस्कृतीला चालना देत विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित ग्रंथोत्सव २०२५ च्या दुसऱ्या दिवशी परिसंवाद सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सत्रात कारंजाचे उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा (भा.प्र.से.) यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना यशस्वी वाटचालीसाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. ध्येय निश्चित केल्यास यश हमखास मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथ अधिकारी कार्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या या ग्रंथोत्सवातील परिसंवादाचा विषय स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना असा होता. आपल्या भाषणात आकाश वर्मा यांनी एमपीएससी व यूपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यशस्वी होण्याची पाच मूलभूत तत्त्वे अधोरेखित केली.



आपले ध्येय स्पष्ट आणि ठाम असेल, तर यश हमखास मिळते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उद्दिष्ट निर्धारणाचे महत्त्व पटवून दिले. अभ्यास करताना सातत्य राखणे, प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र वेळ देणे, सूक्ष्म नियोजन करणे आणि थकवा आल्यास विषय बदलून अभ्यास करणे या गोष्टींचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, स्पर्धा परीक्षेची तयारी करताना प्लॅन 'बी' तयार ठेवणे गरजेचे असून त्यामुळे अपयश आल्यासही मनोबल खचत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मानोरा येथील तहसीलदार तृप्ती खैरनार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, एमपीएससी आणि यूपीएससी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून आजच्या घडीला त्यामधील फरक कमी झाला आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणतीही दिशा निवडताना ती विचारपूर्वक आणि ध्येय निश्चित ठेवून निवडावी, असे त्यांनी आवर्जून सांगितले. पदवी शिक्षणासोबतच राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास या विषयांवर अधिक भर देण्याचे त्यांनी सुचविले. सोशल मीडियाचा अतिरेक टाळून अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

परिसंवादात जिल्हा कोषागार अधिकारी विजय जवंजाळ तसेच स्पर्धा परीक्षा वार्ता चे संपादक दिगंबर इंगळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या अनुभवातून उपयुक्त सूचना दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन वाघ यांनी प्रभावीपणे केले. या परिसंवादानंतर जिल्हा परिषद शाळा, मोहजा रोड येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेली 'शिदोरी' ही नाटिका विशेष आकर्षण ठरली.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११८ ■ गुरुवार, २६ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# ८९ लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यावर १७९८.७८ कोटी रुपयांचे वितरण

## शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या आठव्या हप्त्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते वितरण

### वर्धेला मिळाले २५,६० कोटी

**मुंबई जनमाध्यम :** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत आठव्या हप्त्यापोटी एकूण ८९,७५,२९८ शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकूण १७९८.७८ कोटी रुपये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट लाभ हस्तांतरण द्वारे वितरित करण्यात आले.

विधान भवन, मुंबई येथे 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेचा आठवा हप्ता वितरण समारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री / ॲड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आठव्या हप्त्यात जिल्हानिहाय रक्कम वितरित करण्यात आली असून, अहिल्यानगर रू१०८.३० कोटी, अकोला रू ३६.७६ कोटी, अमरावती ५३.३४ कोटी, बीड रू७२.७० कोटी, भंडारा रू४१.६५ कोटी, बुलढाणा रू६६.७४ कोटी, चंद्रपूर रू४७.९५ कोटी, छत्रपती संभाजीनगर रू६८.१८ कोटी, धाराशिव रू४६.८५ कोटी, धुळे रू३०.६३ कोटी, गडचिरोली रू२८.५० कोटी, गोंदिया रू४२.४५ कोटी, हिंगोली रू ३५.०० कोटी, जळगाव रू ७७.४० कोटी, जालना रू ५८.८२ कोटी, कोल्हापूर रू९२.३३ कोटी, लातूर रू५३.८७ कोटी, नागपूर रू३३.८८ कोटी, नांदेड रू७६.५० कोटी, नंदुरबार रू२०.४७ कोटी, नाशिक रू८३.८६ कोटी, पालघर रू१९.९५ कोटी, परभणी रू४९.७९ कोटी, पुणे रू८५.२४ कोटी, रायगड रू२२.७९ कोटी, रत्नागिरी रू ३१.२१ कोटी, सांगली रू७५.४९ कोटी, सातारा रू८७.०७ कोटी, सिंधुदुर्ग रू२३.५३ कोटी, सोलापूर रू९७.५२ कोटी, ठाणे रू१४.१८ कोटी, वर्धा रू२५.६० कोटी, वाशिम रू३३.०५ कोटी आणि यवतमाळला रू५७.१८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेंतर्गत २४ मार्च २०२६ अखेर एक ते सात हप्त्यांमध्ये एकूण १३०१७.३० कोटी रुपये ९३.०८ लाख शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा करण्यात आले आहेत.

### व्हीआयपीपणाला ठेंगा...भक्तीत रंगला खासदार

# रांगेत उभे राहून घेतले कृष्णाजी महाराजांचे दर्शन; साधेपणाने जिंकली भाविकांची मने

**वर्धा । जनमाध्यम :** सत्तेच्या उंच शिखरावर पोहोचले की माणूस सामान्यांपासून दूर जातो, असा अनुभव अनेकदा येतो. पण वर्धा लोकसभा क्षेत्राचे खासदार अमर काळे यांनी गुढीपाडव्याच्या पावन दिवशी हा समज अक्षरशः खोटा ठरवला. भक्तीपुढे पद-प्रतिष्ठा लहान असते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे जवळील सावंगा विठोबा येथे कृष्णाजी महाराज यांचे भव्य मंदिर आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी येथे हजारो किलो कापूर प्रज्वलित करून भव्य धार्मिक सोहळा पार पडतो. या दिवशी महाराजांविषयी असलेली अपार श्रद्धा आणि भक्तिभाव यामुळे हजारो भाविकांची गर्दी उसळलेली असते. वातावरणात कापूराच्या सुगंधासोबत भक्तीचा दरवळ पसरलेला असतो.



याच दिवशी खासदार अमर काळे महाराजांच्या दर्शनासाठी मंदिरात दाखल झाले. मंदिर परिसरात भक्तांची लांबलचक रांग लागलेली पाहून त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता थेट त्या रांगेत स्थान घेतले. कोणताही व्हीआयपी दर्जा न दाखवता, सुरक्षा व्यवस्थेचा आडोसा न घेता, सर्वसामान्य भक्तांप्रमाणेच त्यांनी शांतपणे रांगेत उभे राहून दर्शन घेतले.

हा प्रसंग पाहून अनेकांच्या डोळ्यात आश्चर्य आणि अभिमान दाटून आला. खासदार असूनही आमच्यासारखेच रांगेत उभे राहून दर्शन घेणे, ही खरी भक्ती आणि मोठेपणाची निशाणी आहे, अशा भावना भाविकांनी व्यक्त केल्या.

सत्तेचा गर्व बाजूला ठेवून भक्तीत रममाण होणाऱ्या या लोकप्रतिनिधीच्या कृतीने एक वेगळाच आदर्श समाजासमोर उभा केला आहे. अशा साध्या, भावनिक आणि जनतेशी नाळ जपणाऱ्या नेतृत्वाचीच आज खरी गरज असल्याचे चित्र या घटनेतून स्पष्ट झाले.

# खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा उघड; दोन आरोपी जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** पुलगाव पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने वेगवान तपास करत उलगडा केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

२१ मार्च रोजी सायंकाळी राजेंद्रप्रसाद बुध्दीप्रसाद कुरमवंशी (वय ७१, रा. मुंदडा कॉलनी, पुलगाव) हे शेतातून घरी परतत असताना दोन अज्ञात इसमांनी मोटारसायकलवरून येत त्यांच्या कुशीवर चाकूने वार करून गंभीर जखमी केले होते. याप्रकरणी त्यांच्या मुलाने दिलेल्या तक्रारीवरून पुलगाव पोलीस स्टेशनमध्ये खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढला. तारफैल परिसरातील रेल्वे पटरीजवळ सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत मयुर दिनेश चंडाले (वय १८) व सुजल अमर सारसर (वय १९) यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पूर्वी झालेल्या किरकोळ अपघातातून झालेल्या वादातून राग मनात धरून हा हल्ला केल्याचे तपासात उघड झाले. गुन्ह्यानंतर मोटारसायकलची ओळख लपविण्यासाठी तिची तोडफोड केल्याचेही समोर आले आहे.

आरोपींना पुढील कारवाईसाठी पुलगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### आज रंगणार रामजन्मोत्सव

# वर्धा सज्ज 'जय श्रीराम'च्या जयघोषासाठी

**वर्धा जनमाध्यम :** चैत्रातील पवित्र रामनवमीच्या निमित्ताने आज संपूर्ण वर्धा जिल्हा भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. प्रभू भगवान श्रीराम यांच्या जन्मोत्सवाचा मंगल सोहळा आज विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा होणार असून, शहरासह ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गोलबाजारातील श्रीराम मंदिरात दुपारी बारा वाजता रामजन्माचा पवित्र क्षण साजरा केला जाणार आहे. या वेळी मंदिरात पूजा-अर्चा, मंत्रोच्चार आणि भजनांच्या सुरांनी वातावरण भारून जाणार आहे. सायंकाळी पाच वाजता भव्य शोभायात्रेला सुरुवात होणार असून, शहरातील प्रमुख मार्गांवरून ही यात्रा भक्तिभावाने मार्गक्रमण करणार आहे.

ढोल-ताशांचा गजर, भगव्या पताका, आकर्षक झांक्या आणि रामनामाचा अखंड घोष यामुळे प्रत्येक रस्ता भक्तीने दुमदुमणार आहे. खाटू श्यामजींची झांकी, इस्कॉन भजन मंडळ, आदिवासी नृत्य, रथयात्रा तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणे ही यंदाची प्रमुख आकर्षणे ठरणार आहेत. नागपूर येथील गायिका स्मिता गणूवाला आणि श्याम पांडे यांच्या भजनांनी भक्तिरसाची उधळण होणार आहे.

शहरात ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या भगव्या स्वागत कमानी आणि रोषणाईमुळे वातावरण अधिकच मंगलमय झाले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रामनामाचा गजर करत उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शेती साहित्य चोरणारी टोळी जेरबंद; ७ आरोपी गजाआड, दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**सेलू जनमाध्यम :** सेलू परिसरात शेतकऱ्यांच्या घामाच्या कष्टांवर डल्ला मारणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला अखेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांच्या धडाकेबाज कारवाईत शेती साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून तब्बल ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून १ लाख ५० हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



सेलू पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेहकी आणि गोंदापूर शिवारात काही दिवसांपासून शेती साहित्य चोरीच्या घटना वाढल्या होत्या. रेहकी येथील अक्षय सुरेश झाडे आणि पवनार येथील घनश्याम मानिकराव बोरकर यांच्या शेतातील बंडा व फार्महाऊसचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी साहित्य लंपास केले होते. या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते.

या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे वर्ध्यातील वडर झोपडपट्टी व सावजी नगर परिसरात सापळा रचला. संशयितांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. चोरी केलेले साहित्य ऑटो रिक्षाच्या सहाय्याने म्हसाळा येथील भंगार विक्रेत्याला विकल्याचेही तपासात उघड झाले.या कारवाईत लोखंडी वखराचे फासे, पितळी स्प्रिंकलर नोझल, लोखंडी रिंगा, पात्याचे विळे, एक हिरो मेस्ट्रो मोपेड आणि एक तीन चाकी ऑटो रिक्षा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. पुढील तपासासाठी आरोपींना सेलू पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, या कारवाईमुळे परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# नांदगाव डंपिंग यार्डला भीषण आग; धुराने आकाश काळवंडले, पालिकेवर नागरिकांचा रोष

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील नांदगाव परिसरातील नगरपालिकेच्या डंपिंग यार्डमध्ये बुधवारी दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांतून उसळलेल्या ज्वाळा आणि आकाशाला भिडणारा काळा धूर यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.



आगीची माहिती मिळताच हिंगणघाट नगरपालिकेचे तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अग्निशमन बंबांच्या साहाय्याने पाण्याचा मारा करत अथक प्रयत्न केले आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याचे मानले जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, डंपिंग यार्डमध्ये साचलेल्या कचऱ्यातील ज्वलनशील घटकांमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, डंपिंग यार्डमधील अव्यवस्थित व्यवस्थापन आणि पालिकेच्या दुर्लक्षामुळेच ही घटना घडल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त करत डंपिंग यार्डच्या सुरक्षेबाबत आणि व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# वर्धा नगर परिषदेत वाद पेटला : कर्मचारी रस्त्यावर, समझोत्याने निवळला तणाव

**वर्धा जनमाध्यम :** शहराच्या प्रशासनात बुधवारी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. वर्धा नगरपालिकेत एका नगरसेवक आणि कर्मचाऱ्यांमध्ये झालेल्या वादातून थेट कामबंद आंदोलनाची ठिणगी पडली, मात्र दुपारनंतर झालेल्या चर्चेतून समझोता झाल्याने परिस्थिती पुन्हा सुरळीत झाली.



माहितीनुसार, नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत भाजपच्या एका नगरसेवकाने काही मुद्दे मांडले होते. हे मुद्दे मिळकत विभागातील पर्यवेक्षकांकडून पुढे न नेल्याने गैरसमज निर्माण झाला. याच कारणावरून संबंधित नगरसेवक आणि पर्यवेक्षक यांच्यात वाद झाला. या वेळी अपशब्द वापरल्याचा आरोप करण्यात आल्याने वातावरण अधिकच तापले.

घटनेच्या निषेधार्थ नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी एकत्र येत कामबंद आंदोलन पुकारले. कार्यालय परिसरात ठिय्या देत कर्मचाऱ्यांनी आपला संताप व्यक्त केला. अचानक कामकाज ठप्प झाल्याने नागरिकांचीही गैरसोय झाली.

दरम्यान, काही नगरसेवकांनी मध्यस्थी करत दोन्ही बाजूंमध्ये चर्चा घडवून आणली. चर्चेनंतर गैरसमज दूर झाल्याने दोन्ही पक्षांमध्ये समझोता झाला. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेत कामकाज पुन्हा सुरू केले. या प्रकारामुळे नगरपालिकेतील अंतर्गत समन्वयाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# 'जादा परतावा'चे आमिष ठरले महाग; ९ लाखांचा ऑनलाईन गंडा

**वर्धा जनमाध्यम :** घरबसल्या कमाई आणि जास्त परतावा या आकर्षक आमिषाला बळी पडून धोत्रा कासार येथील एका तरुणाची तब्बल ९ लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा सायबर गुन्ह्यांचा धोका अधोरेखित झाला आहे.

खुशाल गुरनुले (वय ३२) यांना 'मायरा २१५' या क्रमांकावरून आलेल्या फोनवरून प्रेस्टशॉप कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे सांगण्यात आले. कंपनीच्या उत्पादनांना रेटिंग देण्याचे काम करून चांगला मोबदला मिळेल, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानुसार खुशाल यांनी संबंधित संकेतस्थळावर नोंदणी करून आपली वैयक्तिक माहिती व बँक तपशील भरले.

सुरुवातीला विश्वास बसावा म्हणून त्यांना बोनस देत ३४ हजार ९२७ रुपये परतावाही देण्यात आला. त्यामुळे काम खरेच आहे, असा समज निर्माण झाला. मात्र, यानंतर वेगवेगळ्या कारणांनी पुन्हा पुन्हा पैसे भरण्यास भाग पाडण्यात आले. अखेर ९ लाख १२९ रुपये विविध बँक खात्यांमध्ये जमा करून घेत भामट्यांनी हातोहात गंडा घातला.

पुन्हा पैसे भरण्याची मागणी होताच फसवणूक झाल्याचे लक्षात येताच खुशाल गुरनुले यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

दरम्यान, जास्त परतावा किंवा जलद नफा या आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले असून, अशा ऑनलाईन व्यवहारांबाबत नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# रामनगर पोलिसांची कारवाई; दुचाकी चोरटा जेरबंद

## गुन्हे शोध पथकाची धडाकेबाज कामगिरी; चोरीची पल्सर हस्तगत

**वर्धा जनमाध्यम :** शहरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी रामनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने झटपट कारवाई करत एका तरुण चोरट्याला जेरबंद केले. या कारवाईत चोरीस गेलेली बजाज कंपनीची पल्सर १५० मोटारसायकलही जप्त करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे आर्वी नाका परिसरातील मस्जिदजवळ भाड्याच्या घरात वास्तव्यास आहेत. त्यांनी १५ मार्च रोजी रात्री आपली मोटारसायकल घरासमोर नेहमीप्रमाणे उभी केली होती. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर जाण्यासाठी बाहेर पडल्यावर त्यांना गाडी दिसली नाही. आजूबाजूला शोध घेतल्यानंतरही ती मिळून न आल्याने २५ मार्च रोजी रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



दरम्यान, गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पिपरी (मेघे) ते आर्वी नाका मार्गावर संशयित इसम गाडी ढकलत असल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून साहिल वाघ्या सातपुते (वय १९, रा. वडर झोपडपट्टी, आर्वी नाका) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने १६ मार्चच्या मध्यरात्री ही मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपीकडून चोरीची मोटारसायकल जप्त करून त्याला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजय भुसारी यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# कार्डची अदलाबदल करून लुटले पैसे; आर्वीत धक्कादायक प्रकार

**आर्वी जनमाध्यम :** एटीएम कक्षात मदत करण्याच्या बहाण्याने दोन अज्ञातांनी वृद्धाची फसवणूक करून २५ हजार २०० रुपये लंपास केल्याची घटना आर्वी शहरात घडली आहे. या प्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

हिवरा तांडा येथील नामदेव शेरसिंग राठोड (वय ८४) हे आर्वी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यांना एटीएमचा वापर करताना अडचण येत असल्याने त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या दोन अनोळखी इसमांकडे मदत मागितली.

या संधीचा फायदा घेत आरोपींनी मोठ्या चलाखीने राठोड यांचा एटीएम पिन जाणून घेतला व त्यांच्या कार्डची अदलाबदल केली. त्यानंतर आरोपींनी त्या पिनचा वापर करून त्यांच्या बँक खात्यातून २५ हजार २०० रुपये काढून घेतले.

# घरात एकटी असताना मुलीचे अपहरण; वर्ध्यात खळबळ

## -दहावीचा पेपर संपताच मुलगी गायब; अज्ञातावर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** शहरात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाची धक्कादायक घटना उघडकीस आली असून अज्ञात व्यक्तीने फुस लावून तिला पळवून नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी शिक्षणासाठी काकाकडे राहत होती. दहावीची परीक्षा संपल्यानंतर ती काही दिवसांपूर्वी आपल्या आई-वडिलांकडे परत आली होती. दरम्यान, घटनेच्या दिवशी तिचे आई-वडील कामानिमित्त बाहेर गेले होते, तर लहान भाऊ शाळेत गेला होता. घरात एकटी असलेल्या मुलीला अज्ञात व्यक्तीने फुस लावून सोबत नेल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सायंकाळी कुटुंबीय घरी परतल्यानंतर मुलगी बेपत्ता असल्याचे लक्षात आले. परिसरात शोधाशोध करूनही काहीच माहिती मिळाली नाही. अखेर मुलीच्या आईने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, मुलगी घरातून निघताना सुमारे ५ हजार रुपये रोख, सोन्याचा गोफ व कानातले सोबत घेऊन गेल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून शोधमोहीम सुरू केली असून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



## विधान भवनातून

### सायबर फसवणुकीविरोधात जनजागृती व कारवाईवर भर राज्यमंत्री पंकज भोयर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात वाढत्या सायबर फसवणुकीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने जनजागृती आणि कडक कारवाई या दुहेरी धोरणावर भर दिला आहे. नागरिकांना सतर्क करण्यासाठी विविध माध्यमांतून व्यापक मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले, राज्यात २०२५ मध्ये मुंबई, पुणे आणि नागपूर येथे बनावट ई-चलन लिंकद्वारे फसवणुकीचे ४० गुन्हे दाखल झाले असून १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच संशयास्पद लिंक व एपीके फाईल्सद्वारे फसवणुकीचे १९३ गुन्हे नोंद असून ३६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सायबर गुन्ह्यांवर नियंत्रणासाठी महापे (नवी मुंबई) येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय कार्यरत असून, राज्यभर ५० जिल्हा सायबर लॅब्स सुरू करण्यात आल्या आहेत. तांत्रिक तपासासाठी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे. जनतेमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी www.cybercrime.gov.in ही वेबसाईट आणि १९३० हेल्पलाइनचा प्रचार सोशल मीडियाद्वारे तसेच रेल्वे स्थानकांवरील एलईडी स्क्रीनद्वारे करण्यात येत आहे. परिवहन विभागाकडूनही बनावट वेबसाईट्स व ई-चलन लिंकपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रणासाठी महाआयटी आणि सायबर विभागाच्या समन्वयातून, माहिती-तंत्रज्ञान मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच बैठक घेण्यात येईल असे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी यावेळी सांगितले.

### भुसावळ येथील गोळीबार घटना; चौथा आरोपी अटकेत-गृह राज्यमंत्री

**मुंबई-** जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथे १७ डिसेंबर २०२५ रोजी घडलेल्या गोळीबार घटनेतील चौथ्या आरोपीस अटक करण्यात आली असून या घटनेचा पुढील तपास सुरू असल्याचे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य शशिकांत शिंदे यांनी याविषयी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. गृह राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले, भुसावळ येथील जळगाव नाका परिसरात युवकांना धमकावून पैसे व दागिने मागण्याच्या प्रकारातून गोळीबार झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर तातडीने कारवाई करत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली होती. अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी अल्पवयीन असल्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना बालसुधारगृहात पाठविण्यात आले होते. त्यानंतर बाल न्याय मंडळ, जळगाव यांनी त्यांना मुक्त केले. या घटनेतील चौथा आरोपी फरार होता. मात्र त्यालाही अटक करण्यात आली असून सध्या तो पोलिसांच्या ताब्यात आहे.

### वीज ग्राहकांना दिलासा देणा-या योजनांबाबत शासन सकारात्मक

**मुंबई :** राज्यातील वीज ग्राहकांना दिलासा देणा-या योजनांबाबत शासन सकारात्मक असून, १०० युनिटपर्यंत वीज वापरणा-या ग्राहकांना सवलत देण्याच्या धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांना फायदा होत असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत स्पष्ट केले.सदस्य किशोर पाटील यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्य शासनाच्या वीज धोरणानुसार १०० युनिटपर्यंत वीज वापरणा-या ग्राहकांना मोफत किंवा कमी दरात वीज देण्याचा प्रयत्न आहे. याशिवाय काही प्रकरणांमध्ये आर्थिक सवलतींचाही लाभ देण्यात येत आहे. राज्यातील सुमारे ७० टक्के ग्राहक हे १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणारे आहेत, त्यामुळे या योजनेचा थेट फायदा बहुसंख्य नागरिकांना होत आहे. उर्वरित ३० टक्के ग्राहकांमध्ये २०० ते १००० युनिटपर्यंत वीज वापरणारे निवासी व व्यावसायिक ग्राहकांचा समावेश असून, त्यांच्यासाठीही सवलतींचा विचार सुरू आहे. १० किलोवॅट पर्यंतच्या वीज वापरासाठी सवलती देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, केंद्राच्या पीएम सूर्यघर योजनेंतर्गत सौरउर्जेचा वापर वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांनी स्वतः तयार केलेली वीज स्वतः वापरणे, तसेच अतिरिक्त वीज साठवण्यासाठी बॅटरी स्टोरेज प्रणाली विकसित करण्यावर शासनाचे लक्ष आहे. आगामी काळात कमी खर्चात आणि अधिक कार्यक्षम बॅटरी तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. पुढील एक-दोन वर्षांत या क्षेत्रात मोठी प्रगती होईल, ज्यामुळे दिवसभर साठवलेली वीज रात्री वापरणे शक्य होईल.

### दिव्यांग सक्षमीकरण विभागासाठी लवकरच नियमित भरती प्रक्रिया

**मुंबई :** राज्यातील दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. नियमित भरती प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.याबाबत सदस्य शशिकांत शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य प्रविण दरेकर, संजय केनेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केले.मंत्री अतुल सावे म्हणाले, विभागाचे सेवाप्रवेश नियम अंतिम टप्प्यात आहेत. नियम तयार झाल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियमित पदभरती प्रक्रिया राबविण्यात येईल. सध्या विभागासाठी एकूण २१०५ पदांना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये मंत्रालयीन स्तरावर ६७ पदे, तर आयुक्तालय व जिल्हास्तरावर १४०२ नियमित आणि ६३६ बाह्यस्त्रोतावरील पदांचा समावेश आहे.१० जानेवारी २०२५ रोजी पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची कार्यवाही करण्यात आली. मात्र पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने गट-ब व गट-क अधिका-यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आणि १ मे २०२५ पासून १३ जिल्ह्यांत कार्यालये सुरू करण्यात आली. त्यानंतर २५ ऑगस्ट २०२५ च्या निर्णयानुसार गट-अ व गट-ब अधिका-यांकडे जबाबदारी देण्यात येउन १ सप्टेंबर २०२५ पासून सर्व ३६ जिल्ह्यांत कार्यालये कार्यान्वित झाली असून, मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज सुरू असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी यावेळी स्पष्ट केले.

### न्यायालयाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणी व संवर्धनाची प्रक्रिया सुरू

**मुंबई :** राज्यातील जुन्या न्यायालयीन इमारतींच्या स्थितीबाबत शासनाने गंभीर दखल घेत पुनर्बांधणी, दुरुस्ती आणि संवर्धनाची प्रक्रिया सुरू केली असल्याची माहिती राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रश्न उपस्थित केला. राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, संबंधित १८ इमारतींपैकी अनेक इमारती अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने काही इमारती पाडून त्याच ठिकाणी नव्याने बांधण्यात आल्या आहेत. सध्या काही इमारती वापरात असून काहींच्या पुनर्बांधणीसाठी कार्यवाही सुरू आहे. दापोली, जुन्नर आणि हिंगोली येथील काही इमारती वापरात नसून, संबंधित न्यायालये नव्या इमारतींमध्ये स्थलांतरित करण्यात आली आहेत.या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही केली जात आहे. कोल्हापूर, दापोली, जुन्नर, मुंबईतील लघुवाद न्यायालय तसेच गिरगाव व बॅलार्ड पियर येथील काही इमारतींना हेरिटेज दर्जा देण्यात आला असून त्यांचे संवर्धन व दुरुस्ती करण्यावर भर दिला जात आहे.वापरात असलेल्या तसेच वापरात नसलेल्या इमारतींचे जतन करत, आवश्यक तेथे नवीन इमारती उभारून न्यायव्यवस्थेस सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे असे राज्यमंत्री जयस्वाल यांनी स्पष्ट केले.

### यवतमाळ आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी संस्थेला कारणे दाखवा नोटीस

**मुंबई :** यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील जीवनदीप अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी संबंधित आश्रमशाळेच्या संस्थेला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री ड?. अशोक वुईके यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे दिली. आदिवासी विकास मंत्री ड?. अशोक वुईके म्हणाले,. १३ ऑगस्ट २०२५ रोजी कु. दिपाली कोमटी या विद्यार्थिनीचा जिल्हा सामान्य रुग्णालय, यवतमाळ येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या प्रकरणी अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. समितीच्या अहवालात विद्यार्थिनीच्या उपचाराबाबत शाळेकडून निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पीडित विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना शासनाकडून २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

# राज्यात इंधनसाठा मुबलक; पेट्रोल, डिझेल व एलपीजी पुरवठा सुरळीत

**● अफवांपासून दूर राहण्याचे अन्न नागरी पुरवठा विभागाचे आवाहन ● इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील इंधनपुरवठ्याबाबत कोणतीही टंचाई नसून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि इंडियन ऑइल (आयओसीएल) - यांच्या माध्यमातून राज्यभर इंधनाचे वितरण नियमित आणि सुरळीतपणे सुरू असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

**राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक-**तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ रोजी राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक असून, पेट्रोलचा साठा २,०५,२३२ किलोलीटर, डिझेलचा साठा ४,६७,६०३ किलोलीटर तर एलपीजीचा साठा ३०,७६७ मेट्रिक टन इतका उपलब्ध आहे. हा साठा राज्याच्या गरजा पूर्ण करण्यास पुरेसा आहे.

**तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्पादनात वाढ-**तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्पादनात वाढ करण्यात आली असून सर्व उत्पादक कंपन्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे तेल विपणन कंपन्यांना नियमितपणे पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा होत आहे आणि पुरवठा साखळीमध्ये कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही.

**इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत-**राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा



पुरेसा व नियमित साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून संबंधित विभागांकडून सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. याशिवाय, खासगी क्षेत्रातील कंपन्यांकडे देखील पेट्रोलियम पदार्थांचा साठा उपलब्ध असल्याने एकूण पुरवठा अधिक सक्षम झाला आहे.

**नागरिकांना आवाहन-**नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये. भीतीपोटी इंधनाचा साठा करण्याचा प्रयत्न करू नये किंवा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करू नये. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, ज्यामुळे वाहतूक कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

तसेच, इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व संबंधित कंपन्यांकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून यावर नागरिकांनी विश्वास ठेवावा. कोणतीही शंका किंवा माहिती जाणून घेण्यासाठी केवळ अधिकृत शासकीय माध्यमांवरच अवलंबून राहण्याचे आवाहन अन्न नागरी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

**शासनाचे इंधन पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण-** सद्यस्थितीत केंद्र व राज्य शासन इंधन पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण ठेवून परिस्थिती प्रभावीपणे हाताळत आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता शांतता व संयम राखून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## 2035 पर्यंत एसटी महामंडळातील सर्व बसेस इलेक्ट्रिक होतील-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील एसटी महामंडळात सर्व २०३५ बसेस इलेक्ट्रिक बसेस असतील. एकही डिझेल बस शिल्लक राहणार नाही, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत दिली. विधानसभेत नियम २९३ अंतर्गत प्रस्तावाच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, २०२६ मध्ये घेतल्या जाणा-या ८,३०० बसेस या एसटी महामंडळातील शेवटच्या डिझेल बसेस असतील. त्यानंतर दरवर्षी किमान २,००० इलेक्ट्रिक बसेस खरेदी करून संपूर्ण ताफा टप्प्याटप्प्याने ईव्हीमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे. तसेच विद्यमान डिझेल बसेसचेही कालांतराने इलेक्ट्रिकमध्ये रूपांतर केले जाईल.

राज्यात नुकत्याच तीन हजार राजमाता जिजाउ बसेसचे लोकार्पण झाले. पुढील ४ ते ५ महिन्यांत आणखी पाच हजार बसेस ताफ्यात दाखल होणार असून, या सर्व बसेस राज्यात टप्प्याटप्प्याने वितरित केल्या जाणार आहेत. ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये सेवा पोहोचवण्यासाठी १०० मिडी (लहान) बसेस घेण्यात आल्या आहेत. मोठ्या बसेस पोहोचू शकत नाहीत अशा दुर्गम भागांमध्ये या बसेसद्वारे सेवा दिली जाणार असून, नफा-तोट्याचा विचार न करता सर्वसामान्य नागरिकांना सुविधा देण्यावर भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी एसटी महामंडळ २०० व्होल्वो बसेस घेणार असून, त्यामध्ये १७० सिटिंग आणि ३० स्लीपर कोचचा समावेश असेल. प्रवाशांना अधिक आरामदायी सेवा देण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. राज्यात इलेक्ट्रिक वाहनांना चालना देण्यासाठी चार्जिंग स्टेशनची



उभारणीही मोठ्या प्रमाणावर केली जाणार आहे. एमएसआरडीसी, एमएमआरडीए आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुलाखालील जागांवर एसटी महामंडळामार्फत चार्जिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सुविधेचा लाभ सर्वसामान्य नागरिकांनाही माफक दरात मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, सौरउर्जेच्या माध्यमातून वीज निर्मिती करून ईव्ही चार्जिंगसाठी आवश्यक उर्जा उपलब्ध करण्याची योजना आखण्यात आली आहे. पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासोबतच एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याचा उद्देश असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. राज्यातील प्रत्येक नागरिकाला सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक प्रवास सुविधा देण्यासाठी परिवहन विभाग कटिबद्ध असून, सदस्यांच्या मागण्यांनुसार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न पुढेही सुरू राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा शासनाचा विचार

**मुंबई/प्रतिनिधी :** विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा विचार असून, स्थानिक पातळीवरून मागणी आल्यास त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. वाघांचे संरक्षण आणि मानवांचे रक्षण या दोन्ही गोष्टी समान महत्त्वाच्या आहेत असे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत सांगितले.याबाबत सदस्य नानाभाउ पटोले यांनी प्रश्न उपस्थित केला होता.वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, चंद्रपूर वन विभागाचे क्षेत्र सुमारे २७५१ चौ.कि.मी. असून मध्य चांदा व ब्रम्हपुरी परिसरात मोठ्या प्रमाणावर वाघांचे अस्तित्व आहे. मात्र गेल्या पाच ते सात वर्षांत वाघांची संख्या १०० वरून ४५० पर्यंत वाढली आहे. विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा विचार असून, स्थानिक पातळीवरून मागणी आल्यास त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. मात्र शहरी व अत्याधुनिक भागात असे प्रकल्प उभारणे शक्य नाही. वाघाच्या हल्ल्यात मृत्यू होत



असलेल्या अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वनविभाग सतर्क असून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या माध्यमातून संयुक्त वनव्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, चंद्रपूर व राज्यातील वाढता मानव-वन्यजीव संघर्ष हा केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रासाठीचा विषय आहे. वाघ व बिबटे या वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना उपचारासाठी विशेष केंद्रे उभारण्यात आली असून, तिथे तज्ज्ञ डाक्टरांकडून उपचार केले जात आहेत. संयुक्त वन व्यवस्थापनाद्वारे स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.भविष्यात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि खान्देश या भागांमध्येही व्याघ्र प्रकल्प व सफारी सुरू करण्याचा मानस व्यक्त करताना, वनविभागाचा सविस्तर आराखडा (डीपीआर) लवकरच सभागृहासमोर मांडण्यात येईल असे त्यांनी सांगितले. या चर्चेत सदस्य नानाभाउ पटोले, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, राजेश पाडवी, सुलभा खोडके, रामदास मसराम, सरोज अहिरे यांनी सहभाग घेत विविध मुद्दे उपस्थित केले.

## 89 लाखापेक्षा अधिक शेतक-यांच्या खात्यावर 1798.78 कोटी रुपयांचे वितरण

**मुंबई/प्रतिनिधी :** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत आठव्या हप्त्यापोटी एकूण ८९,७५,२९८ शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकूण १७९८.७८ कोटी रुपये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट लाभ हस्तांतरण द्वारे वितरित करण्यात आले. विधान भवन, मुंबई येथे नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा आठवा हप्ता वितरण समारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डा. उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या आठव्या हप्त्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आठव्या हप्त्यात जिल्हानिहाय रक्कम वितरित करण्यात आली असून, अहिल्यानगर -१०८.३० कोटी, अकोला -३६.७६ कोटी, अमरावती -५३.३४ कोटी, बीड -७२.७० कोटी, भंडारा -४१.६५ कोटी, बुलढाणा -६६.७४ कोटी, चंद्रपूर -४७.९५ कोटी, छत्रपती संभाजीनगर -६८.१८ कोटी, धाराशिव -४६.८५ कोटी, धुळे -३०.६३ कोटी, गडचिरोली -२८.५० कोटी, गोंदिया -४२.४५ कोटी, हिंगोली -३५.०० कोटी, जळगाव -७७.४० कोटी, जालना -५८.८२ कोटी, कोल्हापूर -९२.३३ कोटी, लातूर -५३.८७ कोटी, नागपूर -३३.८८ कोटी, नांदेड -७६.५० कोटी, नंदुरबार -२०.४७ कोटी, नाशिक -८३.८६ कोटी, पालघर -१९.९५ कोटी, परभणी -४९.७९ कोटी, पुणे -८५.२४ कोटी, रायगड -२२.७९ कोटी, रत्नागिरी -३१.२१ कोटी, सांगली-७५.४९ कोटी, सातारा -८७.०७ कोटी, सिंधुदुर्ग -२३.५३ कोटी, सोलापूर -९७.५२ कोटी, ठाणे -१४.१८ कोटी, वर्धा -२५.६० कोटी, वाशिम -३३.०५ कोटी आणि यवतमाळला -५७.१८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत २४ मार्च २०२६ अखेर एक ते सात हप्त्यांमध्ये एकूण १३०१७.३० कोटी रुपये ९३.०८ लाख शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा करण्यात आले आहेत.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी योजनांचे एकत्रीकरण करून व्यवसायासाठी कर्ज सुविधेची जोडण्याबाबत शासन सकारात्मक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणा-या योजनांना कर्ज सुविधेशी जोडण्याबाबत शासन सकारात्मक आहे. राज्यातील विविध महामंडळांच्या योजनांचे एकत्रीकरण करून त्या लाडकी बहिण सारख्या योजनांशी जोडण्यासंदर्भात मुख्य सचिवांना निर्देश दिले जातील. महिलांना क्रेडिट आधारित मदत देउन स्वावलंबी बनविण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितले. सदस्य अभिजित वंजारी यांनी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळावर थेटकर्ज योजना सुरू करण्याबाबत विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य प्रवीण दरेकर, भाई जगताप, राजेश राठोड यांनी उपप्रश्न विचारात सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य शासनामार्फत महिलांना देण्यात येत असलेल्या १,५०० रुपयांच्या आर्थिक सहाय्याचा उपयोग केवळ खर्चापुरता न राहता, त्यातून महिलांना व्यवसाय उभारण्यासाठी क्रेडिट सुविधा उपलब्ध करून देण्यावर राज्य शासनाचा भर आहे. यासंदर्भात आमदार प्रवीण दरेकर यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या पुढाकारातून सुमारे १,२०० महिलांना कर्ज उपलब्ध करून दिले



असून या महिलांनी स्वतःचे लघुउद्योग सुरू केले आहेत. या महिलांकडून कर्जफेडही नियमितपणे सुरू असून, अल्प आर्थिक सहाय्यातून मोठे व्यवसाय उभे राहण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे श्री.फडणवीस यांनी सांगितले. बंजारा समाजासंदर्भातील प्रलंबित प्रश्नांबाबत उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांसाठी सध्या असलेले २०० कोटींचे भागभांडवल वाढवून एक हजार कोटी करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला आहे.


## आगीमुळे बाधित पिकांना भरपाई देण्यासाठी लवकरच धोरणात्मक निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यात घडलेल्या आग प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर शेतक-यांच्या नुकसानीची शासनाने गांभीर्याने दखल घेतली असून आगीमुळे नुकसान झालेल्या पिकांना भरपाई देण्यासाठी लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली.या अनुषंगाने सदस्य श्याम खोडे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली.

राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल म्हणाले की, विद्यमान धोरणानुसार उभ्या पिकाच्या नुकसानीस भरपाई दिली जाते, मात्र कापलेल्या पिकाला भरपाईची तरतूद नाही. शासन या बाबीशी सहमत असून कापलेल्या पिकालाही भरपाई मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्ती यादीत तसेच राज्याच्या आपत्ती व्यवस्थापनात आकस्मिक आगीचा समावेश असला तरी त्याची स्पष्ट व्याख्या नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. यासंदर्भात केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असून त्यावर लवकरच निर्णय होण्याची अपेक्षा आहे. केंद्राकडून मदत मिळाली नाही तरी राज्यस्तरावर आपत्ती घोषित करून मंत्रिमंडळाच्या माध्यमातून शेतक-यांना मदत देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असेही राज्यमंत्री अड. जयस्वाल यांनी नमूद केले.

## गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी नवे प्राधिकरण स्थापन करणार

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी व्यापक पावले उचलली जात असून युनेस्को मानांकन मिळालेल्या गडकिल्ल्यांच्या व्यवस्थापनासाठी तसेच असंरक्षित किल्ल्यांच्या जतनासाठी स्वतंत्र किल्ले संवर्धन प्राधिकरण स्थापन करणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री अँड. आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली.विधानसभा नियम २९३ अन्वये सांस्कृतिक कार्य विभागासंदर्भात झालेल्या चर्चेला उत्तर देताना सांस्कृतिक कार्यमंत्री अड. आशिष शेलार म्हणाले, मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना युनेस्कोचे



जागतिक मानांकन मिळाले आहे. या किल्ल्यांसाठी स्थळ व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येत असून माहिती फलक, जनसुविधा केंद्र, माहिती केंद्र आणि पर्यटन सुविधा उभारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. इतिहास जतन करण्याच्या दृष्टीने नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक रघुजी भोसले प्रथम यांची ऐतिहासिक तलवार लिलावातून खरेदी करण्यात आली असून ती नागरिकांच्या दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या ही तलवार नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात आली असून पुढे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातही प्रदर्शित केली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.सार्वजनिक गणेशोत्सवाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, तो युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रस्ताव सादर केला जाणार असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. राज्यातील किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत बोलताना मंत्री शेलार म्हणाले, केंद्र सरकारच्या अखत्यारीत ५४ किल्ले, तर राज्य सरकारकडे ६२ किल्ले संरक्षित आहेत. याशिवाय अनेक असंरक्षित किल्ल्यांची जिल्हानिहाय नोंदणी करण्याचे काम सुरू असून वनविभागातील २५ किल्ल्यांची नोंद पूर्ण झाली आहे. असंरक्षित किल्ल्यांच्या संवर्धनासाठी फोर्ट कंझर्वेशन प्राधिकरण स्थापन करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, या संदर्भात सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. या माध्यमातून खासगी गुंतवणूक, सीएसआर आणि महावारसासारख्या उपक्रमांतून निधी उभारण्यावर भर दिला जाईल.सदस्यांनी मांडलेल्या स्थानिक प्रश्नांवरही त्यांनी उत्तर दिले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## संघर्षाचे फळ

**लोकशाही ही केवळ राज्यकारभाराची चौकट नाही, ती विचारांचे मुक्त आकाश आहे. येथे प्रत्येक आवाजाला स्थान असते. सहमती आणि असहमती या दोन्हींचा समतोल राखला, तरच लोकशाही जिवंत राहते. अन्यथा, ती केवळ कागदावर उरते. मतभेद हे संघर्षाचे कारण नसतात. ते प्रगतीचे साधन असतात. संवाद हा त्या मतभेदांना जोडणारा सेतू असतो. हा सेतू तुटला, की अविश्वास वाढतो. उदाहरणार्थ, विविध अहवालांनुसार दुर्गम प्रदेशांतील धोरणे लोकांच्या सहभागाशिवाय राबवली गेली, तर त्यांचा विरोध तीव्र होतो. लडाखच्या संदर्भातही अशीच स्थिती दिसून येते. त्यामुळे लोकशाहीची खरी परीक्षा निवडणुकांमध्ये नसते. ती निर्णयप्रक्रियेत दिसते. लडाखमधील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या अलिकडेच झालेल्या सुटकेमुळे लडाखचा प्रश्न भारतीय लोकशाहीच्या परिपक्वतेची आणि मूल्यांची खरी कसोटी ठरला. हिमालयाच्या कुशीत वसलेला लडाख हा निसर्ग आणि संस्कृतीचा अनोखा संगम आहे. तिथे पर्यावरण अत्यंत नाजूक असते. तापमानातील लहान बदलही मोठे परिणाम घडवतात. संशोधनातून दिसते की हिमालयीन प्रदेशांमध्ये हवामानबदलाचा परिणाम अधिक वेगाने जाणवतो. त्यामुळे विकासाची दिशा ठरवताना विशेष काळजी घ्यावी लागते. येथील लोकांनी निसर्गाशी सुसंवाद साधत जीवन उभारले आहे. त्यांच्या परंपरा आणि जीवनशैली या पर्यावरणपूरक आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुभवाला महत्त्व देणे आवश्यक आहे. त्यांच्या भावनांकडे दुर्लक्ष झाले, तर असंतोष वाढतो. हा असंतोष हळूहळू आंदोलनात परिवर्तित होतो. म्हणूनच स्थानिक सहभाग अनिवार्य आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही मोठी जबाबदारी आहे. या प्रक्रियेत संवाद आणि विश्वास हे दोन आधारस्तंभ ठरतात. लडाखचा अनुभव हे स्पष्टपणे दाखवतो. याच पार्श्वभूमीवर पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यांनी लडाखचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर नेले. त्यांनी तरुणांना जागृत केले. त्यांच्या कार्यात सातत्य आणि प्रामाणिकता दिसते. ते केवळ आंदोलन करत नाहीत, तर पर्यायी उपायही सुचवतात. उदाहरणार्थ, शाश्वत विकासाच्या संकल्पनेवर त्यांनी अनेक प्रयोग केले आहेत. त्यामुळे त्यांची प्रतिमा एका विचारवंत कार्यकर्त्याची आहे. त्यांच्या अटकेनंतर समाजात अस्वस्थता निर्माण झाली. ही अस्वस्थता केवळ भावनिक नव्हती. ती लोकशाहीतील स्वातंत्र्याबाबतची चिंता होती.अर्थात येथे एक प्रतिवादही मांडला जातो. काहींच्या मते कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कठोर पावले आवश्यक असतात. आंदोलनांमुळे सार्वजनिक जीवन विस्कळीत होते. त्यामुळे प्रशासनाने कारवाई करणे अपरिहार्य ठरते. हा दृष्टिकोनही दुर्लक्षित करता येत नाही. परंतु या दोन्ही भूमिकांमध्ये संतुलन राखणे हीच खरी कसोटी ठरते. संवाद हा त्यासाठी सर्वात प्रभावी मार्ग ठरतो. लडाखमधील आंदोलनांच्या मागण्या या अत्यंत मूलभूत स्वरूपाच्या आहेत. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याची मागणी ही स्थानिक स्वायत्ततेच्या भावनेतून उभी राहिली आहे. तसेच संविधानातील सहाव्या अनुसूचीत लडाखचा समावेश व्हावा, ही अपेक्षा स्थानिक संसाधनांच्या संरक्षणाशी संबंधित आहे. अभ्यासकांच्या मते, सहाव्या अनुसूचीत समावेश झाल्यास आदिवासी आणि स्थानिक समुदायांना अधिक संरक्षण मिळते. केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाल्यानंतर निर्माण झालेली अस्वस्थता या मागण्यांना अधिक धार देते. त्यामुळे आंदोलन, पदयात्रा आणि उपोषण यांचा मार्ग स्वीकारण्यात आला. दिल्लीपर्यंत काढलेली पदयात्रा ही लोकशाहीकडे केलेली थेट मागणी होती. या प्रक्रियेत स्थानिक लोकांचा सहभाग वाढला. ही एकजूट लोकशाहीच्या सशक्ततेचे प्रतीक आहे. या मागण्या समजून घेताना भावनिक आणि तर्कसंगत दोन्ही बाजूंनी विचार करणे आवश्यक आहे. सुमारे १७० दिवसांचा तुरुंगवास हा केवळ आकडा नाही. तो संघर्षाची तीव्रता दर्शवतो. या काळात त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त झाली. कुटुंबीयांनी संघर्ष सुरू ठेवला. हा प्रसंग मानवी संवेदनांचा वेध घेतो. एकीकडे कायद्याचे पालन दिसते. दुसरीकडे मानवी हक्कांचा प्रश्न उभा राहतो. या दोन्ही बाबींमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रियेतही काही प्रकरणांमध्ये आरोप फेटाळले गेल्याची उदाहरणे दिसतात. त्यामुळे कायद्याचा वापरावर चर्चा होते. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित होते. अशा घटनांमुळे लोकशाहीतील विश्वास डळमळीत होऊ शकतो. त्यामुळे शासनाने अधिक संवेदनशीलता दाखवणे गरजेचे आहे. लडाखमधील परिस्थितीचा परिणाम स्थानिक जीवनावर स्पष्टपणे दिसून आला. पर्यटनावर परिणाम झाला. व्यापार मंदावला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे आले. या सर्व गोष्टींमुळे असंतोष वाढला. त्याचे परिणाम राजकीय पातळीवरही दिसले. काही तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारचा असंतोष इतर संवेदनशील प्रदेशांवरही परिणाम करू शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ स्थानिक राहत नाही. तो राष्ट्रीय स्वरूप धारण करतो. लोकशाही सर्वसमावेशक असते. ती प्रत्येक नागरिकाच्या भावनांचा आदर करते. त्यामुळे अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. संवाद आणि समन्वय यांच्याद्वारेच समाधानाचा मार्ग सापडतो. संवाद आणि समन्वय यांच्याद्वारेच दीर्घकालीन उपाय मिळतात. लडाखचा प्रश्न हा केवळ एका व्यक्तीचा नाही. तो संपूर्ण प्रदेशाच्या भविष्याशी निगडित आहे. पर्यावरण, विकास आणि स्थानिक हक्क यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. शासनाने संवेदनशील भूमिका घेतली, तरच विश्वास दृढ होतो. मतभिन्नतेचा आदर राखला, तर लोकशाही अधिक सक्षम बनते. अखेर, लडाखचा तडाखा हा इशारा नाही, तर तो एक दीपस्तंभ आहे. तो आपल्याला दिशा दाखवतो. जशी नदी खडकांना धडक देत आपला मार्ग तयार करते, तशीच असहमती लोकशाहीला नवा प्रवाह देते. संवाद हा त्या प्रवाहाला दिशा देतो. हा संवाद जपला, तर लोकशाही अधिक परिपक्व होईल. अन्यथा, ती केवळ संरचना राहील. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आणि शासनाने एकच मंत्र लक्षात ठेवावा मतभेद हे अडथळे नाहीत तेच लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत.**

# तेल मुत्सद्देगिरीत भारताचे यश

**भारतीय मुत्सद्देगिरीचा हा विजय जागतिक महासत्तांच्या दबावापुढे न झुकता आपल्या स्वायत्त परराष्ट्र धोरणाचे रक्षण करण्याचे ऐतिहासिक उदाहरण ठरला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील या संकटकाळात भारताने ज्या प्रकारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाचा दबाव झुगारून लावला, ते पाहता जागतिक राजकारणात भारताचे स्थान किती प्रबळ झाले आहे, याची प्रचिती येते.**

आखातातील इस्रायल-इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे होर्मुझची सामुद्रधुनी सध्या जागतिक राजकारणाचे आणि चिंतेचे केंद्र बनली आहे. या भागात निर्माण झालेल्या कोंडीमुळे भारतासह जगातील बहुतांश देशांची ऊर्जा सुरक्षा धोक्यात आली आहे. इराणने या मार्गावरून होणारी तेलवाहू जहाजांची वाहतूक पूर्णपणे बंद केल्यामुळे जागतिक तेलबाजारात हाहाकार उडाला आहे. एकट्या भारताची या सामुद्रधुनीमध्ये २२ जहाजे अडकून पडलेली असून यात सहा एलपीजी जहाजे, एक एलएनजी टँकर, कच्चे तेल असलेली चार जहाजे, रसायने आणि उत्पादने असलेले एक जहाज, तीन कंटेनर जहाजे आणि दोन बल्क कॅरिअर्स यांचा समावेश आहे. यामध्ये १६.७ लाख टन कच्चे तेल, ३.२ लाख टन एलपीजी आणि सुमारे २ लाख टन एलएनजीचा समावेश आहे. भारताचा सुमारे १७ लाख टनांहून अधिक माल या अरुंद जलपट्ट्यात अडकून पडला आहे. अमेरिका-इस्रायलच्या आक्रमक भूमिकांमुळे आणि इराणकडून देण्यात येणाऱ्या तडाखेबंद प्रत्युत्तरामुळे हा युद्धसंघर्ष शमण्याचे नाव घेत नाही. परिणामी, भारतासारख्या अनेक देशांना प्रचंड मोठा आर्थिक फटका सोसावा लागत आहे. अशा बिकट काळात राष्ट्रीय नेतृत्वाच्या चातुर्याचा, मुत्सद्देगिरीचा खऱ्या अर्थाने कस लागत असतो. कारण, एकीकडे राष्ट्रीय हित जपण्याची जबाबदारी असते, तर दुसरीकडे आंतरराष्ट्रीय संबंधांमधील गुंतागुंतीच्या राजकारणामध्ये दूरदर्शी विचार करून कोणत्याही स्थितीत आपले हितसंबंध अबाधित राखायचे असतात. अशा काळात अलिप्ततावादी भूमिका घेणे सोपे आणि सोयीचे असले, तरी त्यातून राष्ट्रीय हित साधले जात नाही. याउलट कोणा एकाच्या बाजूने झुकण्याची भूमिका घेणेही जोखमीचे ठरू शकते.

गेल्या दहा वर्षांमध्ये भारताला जाणीवपूर्वक अशा प्रकारच्या कोंडीजन्य स्थितीत अडकवण्याचा प्रयत्न महासत्तांकडून करण्यात आला; पण केंद्र सरकारने संयमी आणि कणखर भूमिका घेत ही कोंडी फोडल्याचे दिसून आले. चार वर्षांपूर्वी रशिया-युक्रेन युद्धाचा भडका उडाला तेव्हा अमेरिकेने रशियाकडून तेल आयात बंद करण्यासाठी अनेक राष्ट्रांवर दबाव आणला. भारताचाही यामध्ये समावेश होता; पण रशियाने ३० टक्के सवलतीच्या दरात तेलाचा पुरवठा करण्याचे आश्वासन दिल्यामुळे भारताने अमेरिकेची दादागिरी झुगारून लावत आपल्या या पारंपरिक मित्र देशाकडून अब्जावधी लिटर तेलाची आयात केली. रशिया भारताचा सर्वांत मोठा तेलपुरवठादार देश बनला. या तेल व्यवहारातून भारताने हजारो कोटी रुपयांची बचतही केली. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर या तेल आयातीवरून प्रचंड आकांडतांडव करण्यात आले आणि भारतातून अमेरिकेला केल्या जाणाऱ्या निर्यातीवर ५० टक्के दंडात्मक शुल्क लावण्याचा निर्णयही घेण्यात आला; पण भारत झुकला नाही. यथावकाश ट्रम्प यांना स्वतःलाच हे दंडात्मक शुल्क आणि टॅरिफ कमी करत असल्याची घोषणा करावी लागली. इराण युद्धादरम्यान होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यानंतर तर अमेरिकेने रशियाकडून तेल आयात करण्यासाठी खुली सवलत दिली. हा भारतीय राजनयाचा विजय होता. कारण, केवळ अमेरिकाच नव्हे, तर भारतासोबत मुक्त व्यापार करारासाठी उतावळेपणा दाखवणाऱ्या युरोपियन देशांनीही त्यावेळी रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेल आयातीवरून भारताला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला होता. इराणविरुद्धचा संघर्ष पेटल्यानंतरही ट्रम्प प्रशासनाने इराणवर कडक निर्बंध लादताना भारतासह आपल्या मित्रराष्ट्रांना इराणकडून होणारी इंधन खरेदी पूर्णपणे बंद करण्याचे आणि त्यांच्या विरोधात कडक भूमिका घेण्याचे आवाहन केले होते; परंतु भारताने आपले कूटनीतीतील चातुर्य वापरत होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जहाजांचा मार्ग सुकर केला आहे.

ट्रम्प यांनी इराणला पूर्णपणे एकाकी पाडण्याचे प्रयत्न केले असताना भारताने इराणच्या राजदूतांशी नवी दिल्लीत ५ फेऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा केली. या चर्चेचा परिणाम असा झाला की, जिथे अनेक पाश्चात्त्य जहाजे इराणच्या नौदलाने ताब्यात घेतली होती, तिथे भारताच्या जहाजांना कोणत्याही अडथळ्याशिवाय वाट करून देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी केलेल्या थेट चर्चेनंतर परिस्थिती निवळण्यास सुरुवात झाली आणि इराणनेही भारताला आपला मित्र मानत भारतीय जहाजांना सुरक्षित प्रवासाची ग्वाही दिली आहे. यादरम्यान परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इराणी अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा सुरू ठेवली. या प्रयत्नांचे सकारात्मक फलित म्हणजे इराणने भारतीय ध्वज असलेल्या तीन गॅस टँकर्सना मार्ग मोकळा करून दिला. नुकतेच 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या दोन भारतीय ध्वजधारक जहाजांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून यशस्वीरीत्या प्रवास पूर्ण केला असून ९२,७०० मेट्रिक टन एलपीजी घेऊन ही जहाजे भारतात पोहोचली आहेत. विशेष म्हणजे, या मोहिमेदरम्यान काही जहाजांनी आपली ओळख लपवण्यासाठी 'डार्क मोड'चा अवलंब केला होता. यामध्ये उपग्रहांद्वारे होणारे ट्रॅकिंग टाळण्यासाठी आपली यंत्रणा तात्पुरती बंद ठेवली जाते. याशिवाय, संयुक्त अरब अमिरातीमधील फुजैराह बंदरावर झालेल्या हल्ल्यातून 'जग लाडकी' हे भारतीय जहाज भारतीय नौदलाच्या युद्धनौकेच्या संरक्षणाखाली सुखरूप बाहेर पडले असून ते ८०,८०० टन कच्चे तेल घेऊन भारताकडे येत आहे. भारतासाठी हे यश अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, भारत हा जगात एलएनजीचा चौथा आणि एलपीजीचा दुसरा मोठा खरेदीदार देश असून सुमारे २० टक्के कच्च्या तेलाचा पुरवठा याच मार्गाने होतो.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी स्पष्ट केले आहे की, इराणसोबत भारतीय जहाजांच्या सुरक्षिततेबाबत कोणताही सरसकट करार झालेला नसून प्रत्येक जहाजाचा प्रवास हा स्वतंत्रपणे हाताळला जात आहे. सध्या उर्वरित जहाजे सुखरूपणाने बाहेर काढण्यासाठी भारताचे राजनैतिक प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. जागतिक स्तरावर ऊर्जेच्या किमती आणि पुरवठा साखळीवर या युद्धाचा मोठा परिणाम होत असताना भारताने आपल्या सामरिक संबंधांचा वापर करून ऊर्जा सुरक्षा राखण्यासाठी दाखवलेले कौशल्य जगासाठी विशेषतः आशियातील देशांसाठी आदर्श ठरले आहे. भारतीय मुत्सद्देगिरीचा हा विजय जागतिक महासत्तांच्या दबावापुढे न झुकता आपल्या स्वायत्त परराष्ट्र धोरणाचे रक्षण करण्याचे ऐतिहासिक उदाहरण ठरला आहे. होर्मूझच्या सामुद्रधुनीतील या संकटकाळात भारताने ज्या प्रकारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाचा दबाव झुगारून लावला, ते पाहता जागतिक राजकारणात भारताचे स्थान किती प्रबळ झाले आहे, याची प्रचिती येते.

अमेरिकेने इराणच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतलेला असतानाही भारताने इराणसोबत समांतर संवाद सुरू ठेवला आणि



केवळ आपल्या जहाजांसाठी सुरक्षित मार्गच मिळवला नाही, तर 'चाबहार'सारख्या धोरणात्मक प्रकल्पांनाही या वादाच्या आगीपासून दूर ठेवण्यात यश मिळवले. भारताने ट्रम्प प्रशासनाला हे पटवून दिले की, भारत कोणाचाही कनिष्ठ भागीदार नसून तो स्वतःच्या हिताचे निर्णय घेण्यास सक्षम असलेला स्वतंत्र देश आहे. जेव्हा अमेरिकेने होर्मुझमध्ये लष्करी हस्तक्षेप करण्याचे संकेत दिले होते, तेव्हा भारताने स्वतःच्या नौदलाच्या युद्धनौका तैनात करून 'ऑपरेशन संकल्प'अंतर्गत स्वतःच्या जहाजांचे संरक्षण करण्याची भूमिका घेतली. यामुळे भारताने कोणत्याही पाश्चात्त्य युतीचा भाग न बनता आपले उद्दिष्ट साध्य केले. ही रणनीती देशांतर्गत राजकारणात विरोधी पक्षांना चोख प्रत्युत्तर देणारीही ठरली आहे. याचे कारण, विरोधी पक्षांकडून भारताचे परराष्ट्र धोरण हे अमेरिकेच्या प्रभावाखाली असल्याचा आरोप केला जात होता; परंतु या ताज्या प्रसंगानंतर अशा टीकाकारांची तोंडे बंद झाली आहेत. विरोधकांनी संसदेत सातत्याने सरकारला या संघर्षात भारताची भूमिका काय असेल आणि देशाच्या ऊर्जा सुरक्षेचे काय होईल, असे प्रश्न विचारले होते. सरकारने या प्रश्नांची उत्तरे भाषणांतून देण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून दिली आहेत.

राजनयाचा कौशल्यपूर्ण वापर केल्यामुळे दररोज सुमारे ७,५०,००० बॅरल कच्च्या तेलाचा पुरवठा विनाअडथळा सुरू राहिला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी इतकी संवेदनशील आहे की, तेथे केवळ एका दिवसाची कोंडी झाली असती, तरी जागतिक बाजारात तेलाच्या किमतीत १० ते १५ टक्क्यांची वाढ झाली असती. भारताचा ७० टक्क्यांहून अधिक एलपीजी पुरवठा याच मार्गाने येतो. तो खंडित झाला असता, तर देशातील ३०० दशलक्ष कुटुंबांच्या स्वयंपाकाच्या गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असता. हे लक्षात घेऊन भारताने या संकटाच्या काळात इराणकडून तेल खरेदीसाठी १२,००० कोटी रुपयांच्या व्यवहारांसाठी पर्यायी यंत्रणा वापरून आपली आर्थिक शक्तीही सिद्ध केली आहे. एका बाजूला इराणसोबतचे जुने आणि ऐतिहासिक संबंध टिकवून ठेवताना दुसरीकडे अमेरिकेसोबतचे धोरणात्मक आणि व्यापारी हितसंबंध अबाधित राखणेही आवश्यक होते. या दुहेरी भूमिकेमागे ऊर्जा सुरक्षेबरोबरच आखाती देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या सुमारे एक कोटी भारतीय नागरिकांच्या जीविताची आणि रोजगाराची चिंताही होती. कोणत्याही टोकाच्या किंवा एकांगी भूमिकेमुळे या भारतीयांच्या सुरक्षेला बाधा पोहोचू शकली असती, याची जाणीव ठेवून केंद्र सरकारने ही परिस्थिती हाताळली.

इराणने भारतीय टँकर्सना जाण्याची परवानगी देऊन केवळ इंधन पुरवठा सुरळीत केला नाही, तर भविष्यातील संबंधांचा मार्गही प्रशस्त केला आहे. इंधनाच्या वाढत्या किमती आणि विस्कळीत झालेली पुरवठा साखळी यामुळे जागतिक बाजारपेठ आधीच हादरली होती. अशावेळी भारताने मिळवलेला हा दिलासा देशांतर्गत महागाई रोखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. वास्तविक, इराण हा भारताचा जुना तेलपुरवठादार देश राहिला आहे. इराणचे तेल हे गुणवत्तेच्या दृष्टीने, वाहतुकीच्या दृष्टीने आणि व्यवहाराच्या दृष्टीनेही भारतासाठी फायदेशीर ठरणारे होते; परंतु ट्रम्प यांनी पहिल्या कार्यकाळातच या संबंधांना सुरुंग लावला आणि भारतावर दबाव आणत इराणकडून तेल खरेदी बंद करण्यास भाग पाडले; पण भारताने इराणशी असणारे पारंपरिक संबंध तुटू न देण्याची भूमिका कायम ठेवली. त्याचे फलित म्हणजे आताची तेलवाहू जहाजांना मिळालेली सवलत आहे.

युद्धातून कधीही कायमस्वरूपी तोडगा निघत नाही. उलट राजनैतिक मार्ग प्रभावीपणे वापरले गेले, तर युद्धाच्या भीषण परिस्थितीतूनही शांततेचे आणि सहकार्याचे नवे मार्ग शोधता येतात. भारताची ही 'बॅलेन्सिंग ॲक्ट' किंवा समतोल साधण्याची कला जागतिक राजकारणात भारताचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा एक दुसरा पैलू म्हणजे 'ब्रिक्स' या आंतरराष्ट्रीय संघटनेतील भारताची भूमिका. यावर्षी भारत या गटाचे अध्यक्षपद भूषवत आहे आणि इराणही आता या गटाचा पूर्णवेळ सदस्य आहे. इराणची अशी अपेक्षा आहे की, ब्रिक्सने अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांचा तीव्र निषेध करावा; मात्र ब्रिक्सच्या विस्तारित गटामध्ये सौदी अरेबिया आणि यूएईसारख्या देशांचाही समावेश आहे, ज्यांचे इराणशी असलेले संबंध गुंतागुंतीचे आहेत. अशा स्थितीत भारताला अतिशय सावधगिरीने पावले टाकावी लागत आहेत. तसेच चाबहार बंदराचा प्रश्नही भारतासाठी कळीचा आहे. भारताने या बंदरात मोठी गुंतवणूक केली असून, ते मध्य आशिया आणि रशियापर्यंत पोहोचण्याचे भारताचे प्रवेशद्वार आहे. अमेरिकेने चाबहारवर केलेले हल्ले भारतीय हितांवर झालेला आघात मानला जात आहे. त्यामुळे भारताला आपली सतर्कता अधिक वाढवावी लागली आहे.

अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाशी मैत्री राखतानाच आपल्या इतर मित्रराष्ट्रांशी असलेले संबंध पणाला न लावता देशहित कसे जोपासावे, हे या संपूर्ण प्रकरणातून भारताने दाखवून दिले आहे. भारतातील एलपीजी ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ही कूटनीती महत्त्वाची ठरली आहे.

**भारत-इराण तेलसंबंधांचा इतिहास**

भारत आणि इराणमधील तेलसंबंधांना साडेसात दशकांचा इतिहास आहे. दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांची अधिकृत सुरुवात दि. १५ मार्च १९५० रोजी झाली असली, तरी ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य दशकांपासून या नात्याचा कणा राहिले आहे. एकेकाळी इराण हा भारतासाठी कच्च्या तेलाचा दुसरा सर्वात मोठा पुरवठादार होता आणि भारतीय तेल शुद्धीकरण कारखाने प्रामुख्याने इराणी तेलावर आधारित होते. २००१ मधील 'तेहरान घोषणापत्र' आणि २००३ मधील 'नवी दिल्ली घोषणापत्र' यामुळे या संबंधांना सामरिक स्वरूप प्राप्त झाले होते. २०१२ मध्ये जेव्हा अमेरिकेने इराणवर कडक निर्बंध लादले, तेव्हा भारताने रुपया-रियाल देय यंत्रणा (रूपी-रियाल पेमेंट मेकॅनिझम) विकसित करून तेल खरेदी सुरू ठेवली होती. याद्वारे भारत कच्च्या तेलाचे पैसे भारतीय रुपयांमध्ये देत असे, ज्याचा वापर इराण भारताकडून तांदूळ आणि औषधे खरेदी करण्यासाठी करत असे. भारताने आता इराणची उणीव भरून काढण्यासाठी रशिया, सौदी अरेबिया आणि इराक यांसारख्या देशांकडून तेल आयात वाढवली आहे, तरीही चाबहार बंदर आणि ऊर्जा क्षेत्रातील दीर्घकालीन हितसंबंधांमुळे इराण हा भारतासाठी भविष्यातही महत्त्वाचा भागीदार ठरणार आहे.

**डॉ. योगेश प्र. जाधव**

# संवाद

## शिक्षण पद्धतीचे विदारक वास्तव!

नाशिक येथील दहावीच्या परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या दप्तरांची पडताळणी केल्यावर विद्यार्थ्यांच्या दप्तरात साडी, बांगड्या, प्रेमपत्रे आणि गर्भनिरोधकाची पाकिटे सापडली. अशा घटना महाराष्ट्राच्या परंपरेला धक्का देणाऱ्या आहेत.ज्या वयात हातामध्ये लेखणी आणि मनात ध्येय असायला हवे,त्या वयात ही मुले अनैतिकतेच्या गर्तेत का अडकत आहेत?दप्तरातून केवळ चैनीच्या वस्तूच नव्हे, तर चाकू आणि फायटर सारखी जीवघेणी शस्त्रेही सापडली आहेत. हे चित्र काय दर्शवते? आजची शिक्षण पद्धती केवळ पदव्या देणारी ठरत आहे, परंतु जीवन जगण्याचे 'मूल्यशिक्षण' देण्यात ती पूर्णतः अपयशी ठरली आहे. जर वेळीच आवर घातला नाही, तर शाळांमधून सुसंस्कृत नागरिक नव्हे, तर स्वैराचारी पिढी बाहेर पडेल. चित्रपट,वेब सिरीज आणि 'सोशल मीडियाच्या' माध्यमातून होणारा अश्लीलतेचा भडिमार किशोरवयीन मुलांच्या मनावर विपरीत परिणाम करत आहे. स्वतःला 'प्रगत' समजण्याच्या नादात ही पिढी अधर्माच्या मार्गावर वेगाने जात आहे.मुलांच्या दप्तरात एवढ्या आक्षेपार्ह वस्तू येतातच कशा, याकडे पालकांचे लक्ष का नाही?केवळ शाळा-ट्यूशनची फी भरली म्हणजे पालकांचे कर्तव्य संपत नाही. मुले कोणाशी मैत्री करतात,त्यांच्या दप्तरात काय आहे, त्यांच्या मनावर काय संस्कार होत आहेत,हे पाहणे पालकांचे कर्तव्य आहे. ही मुले उद्याचे नागरिक आहेत; जर त्यांचा पायाच असा डळमळीत असेल,तर राष्ट्राचे भविष्य अंधकारमय असेल. या सर्व समस्यांचे मूळ 'धर्माचरणाचा अभाव' हेच आहे. जर मुलांना लहानपणापासूनच 'धर्माचरण' आणि 'सात्त्विक जीवनशैली'चे संस्कार दिले असते,तर आज ही वेळ आली नसती.पाश्चात्य विकृतीला थोपवण्यासाठी हिंदु मुला-मुलींना 'शौर्य जागरण' आणि 'धर्मशिक्षण' देणे आता अनिवार्य झाले आहे. हिंदु राष्ट्राची उभारणी करायची असेल, तर सर्वात आधी आपल्याला आपली भावी पिढी चारित्र्यसंपन्न आणि धर्मनिष्ठ बनवावी लागेल. नाशिकची ही घटना केवळ एक उदाहरण आहे, वेळीच सावध होऊन हिंदूंनी आपल्या पाल्यांना धर्माकडे वळवले नाही, तर अशा घटनांचे लोण घराघरात पोहोचण्यास वेळ लागणार नाही.

**अपर्णा जगताप**

## आदर्शाचा उत्सव

भारतीय संस्कृतीमध्ये चैत्र शुद्ध नवमी या तिथीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच दिवशी अयोध्येचे राजा दशरथ त्यांची राणी कौशल्या हिच्या पोटी भगवान विष्णूंचा सातवा अवतार असलेल्या 'प्रभू श्रीरामांचा' जन्म झाला. हा दिवस आपण 'श्रीराम नवमी' म्हणून मोठ्या थाटामाटात साजरा करतो. या दिवशी श्रीरामाच्या मूर्तीला सजवून पाळण्यात ठेवले जाते त्यानंतर पाळणा गाऊन आणि गुलाल उधळून जन्मोत्सव साजरा केला जातो. या दिवशी विशेषतः 'सुंठवड्याच्या' (सुंठ आणि साखर यांचे मिश्रण) प्रसादाचे विशेष महत्त्व आहे. श्रीरामाच्या नवरात्रात ठिकठिकाणी रामायणाचे वाचन, रामरक्षा पठण आणि कीर्तन इत्यादींचे आयोजन केले जाते.जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते, तेव्हा तेव्हा ईश्वर दुर्जनांचा संहार आणि भक्ताचे रक्षण करण्यासाठी पृथ्वीवर अवतार घेतो. हे ईश्वराचे वचन आहे.श्रीराम एकवचनी, एक पत्नी होते.श्रीराम आदर्श पुत्र, आदर्श मित्र, आदर्श भाऊ, आदर्श शत्रू , आदर्श राजा होते. आज्ञा पालनाचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे श्रीराम आहेत. म्हणूनच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हटले जाते. श्रीरामांचे चरित्र म्हणजे सद्गुणांची गुरुकिल्ली.'रघुकुल रीत सदा चली आई, प्राण जाए पर वचन न जाई.' दिलेला शब्द पाळणे ही श्रीरामांची सर्वात मोठी शिकवण आहे. वडिलांच्या एका वाचनासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून १४ वर्षे वनवासात आनंदाने पूर्ण केला, हा त्यागाचा सर्वोच्च आदर्श आहे.संकटाच्या काळातही डगमगून न जाता धैर्याने आणि शांत चित्ताने निर्णय घेणे, हे श्रीरामाच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य आहे.श्रीराम नवमी म्हणजे केवळ उपवास किंवा उत्सव नव्हे, तर आपल्या अंतरातील 'राम' जागृत करण्याचा दिवस आहे. जर आपण श्रीरामाच्या गुणांपैकी एक जरी गुण अंगीकारला, तरीही आपले जीवन खऱ्या अर्थाने 'राममय' होईल.

**वर्षा आवादे**

## श्रीरामरक्षा स्तोत्र आध्यात्मिक कवच!

श्रीरामरक्षा स्तोत्र हे बुधकौशिक ऋषींनी रचलेले आहे. हे केवळ स्तोत्र नसून एक दिव्य मंत्र आहे. याची सुरुवात 'श्रीरामरक्षा स्तोत्र मंत्रस्य' या शब्दांनी होते. मंत्र म्हणजे एक ध्वनी, एक अक्षर, एक शब्द अथवा शब्दांचा समूह! ज्यावेळी ठराविक लयीत आणि सुरात मंत्र जपला जातो, त्यावेळी त्या जपातून एक विशिष्ट शक्ती निर्माण होते. याकरिता श्रीरामरक्षा स्तोत्र एक विशिष्ट लयीत म्हणणे आवश्यक आहे. श्रीरामरक्षा स्तोत्राचे श्रद्धेने पठण करणाऱ्या व्यक्तीभोवती सूक्ष्म स्तरावर एक संरक्षक कवच निर्माण होते, जे नकारात्मक शक्तींपासून रक्षण करते. या स्तोत्रात प्रभू श्रीरामांच्या गुणांचे अत्यंत सुंदर वर्णन केलेले आहे. पठण करताना हे गुण आपल्या अंगी यावेत असा भाव जागृत होतो आणि मन अधिक अंतर्मुख बनते.श्रीरामरक्षा स्तोत्राचे नियमित पठण केल्याने शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक बळ प्राप्त होते. नकारात्मक ऊर्जा, भय आणि वाईट प्रवृत्तींवर विजय मिळवण्याची शक्ती मिळते. रामनामाच्या सतत उच्चाराने मन शांत होण्यास सहाय्य होते. मनात आणि घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. घरातील वातावरण पवित्र बनते आणि सुख-समृद्धी वाढते. श्रीरामरक्षा स्तोत्र हे केवळ स्तुतीपर नसून ते एक आध्यात्मिक कवच आहे. आजच्या युद्धजन्य आणि तणावपूर्ण परिस्थितीमुळे मनात भय निर्माण होते. भविष्याची चिंता निर्माण होते. अशावेळी मन स्थिर ठेवून येणाऱ्या परिस्थितीला शांततेने सामोरे जाऊन आनंदी राहण्यासाठी दररोज श्रीरामरक्षा स्तोत्र पठण करायला हवे.

**प्रिया बागडदेव**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सखा

# उद्यापासून भव्य 'यवतमाळ महोत्सव'ला प्रारंभ !

## कृषी महोत्सव, पशु प्रदर्शन, समृद्धी सरस प्रदर्शन, सांस्कृतिक महोत्सव, नव तेजस्विनी प्रदर्शन, शासकीय योजनांचे प्रदर्शन, ग्रंथोत्सवाचे आयोजन

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - राज्य शासनाच्या विविध विभागांच्या जिल्हास्तरीय कार्यलयांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी दि. 27 मार्च ते 31 मार्च या कालावधीत कृषी विज्ञान केंद्र प्रक्षेत्र (वाघापूर) येथे भव्य 'यवतमाळ महोत्सव 2026' चे आयोजन करण्यात आले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होवून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत केले.

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला, उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय आणि नगर परिषद, यवतमाळ यांचे संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन 27 मार्च रोजी पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.

या यवतमाळ महोत्सवात कृषि महोत्सव, पशु प्रदर्शन, समृद्धी सरस प्रदर्शन, सांस्कृतिक महोत्सव, नव तेजस्विनी प्रदर्शन, शासकीय योजनांच्या माहितीचे प्रदर्शन, ग्रंथोत्सवाचा समावेश आहे.

या उद्घाटनीय कार्यक्रमाला आदिवासी विकास मंत्री ना.प्रा. डॉ.अशोक उईके, राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच खा.संजय देशमुख, खा.प्रतिभा धानोरकर,खा.नागेश पाटील आष्टिकर, आ. भावना गवळी, आ. ॲड. किरण सरनाईक, आ. धीरज लिंगाडे, आ. राजु तोडसाम, आ. अनिल उर्फ बाळासाहेब मांगुळकर,आ.संजय देरकर,आ.किसन वानखेडे, यवतमाळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, उपनगराध्यक्ष विलास कुळकर्णी, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता यांच्यासह विविध विभागांचे अमरावती विभागीय अधिकारी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या यवतमाळ महोत्सवात कृषि विभागाला 200 स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. त्यामध्ये विविध घटकांचा समावेश आहे.

यामध्ये 40 शासकीय दालने, 30 कृषि निविष्ठा स्टॉल्स, 30 कृषि तंत्रज्ञान व सिंचन विषयक स्टॉल्स, 40 गृहपयोगी वस्तू स्टॉल्स, 20 धान्य महोत्सव स्टॉल्स आणि 20 खाद्यपदार्थ स्टॉल्सचा समावेश राहणार आहे. महोत्सवासाठी एकूण 8 डोम्स उभारण्यात येत असून त्यांची कार्यविभागणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे. डोम क्र. 2 मध्ये शासकीय दालने, डोम क्र. 3 मध्ये सेमिनार हॉल (उद्घाटन, समारोप, चर्चासत्रे व स्पर्धा), डोम क्र. 4 मध्ये कृषि निविष्ठा, डोम क्र. 5 मध्ये फूड झोन, डोम क्र. 6 मध्ये गृहपयोगी वस्तू, डोम क्र. 7 मध्ये माविम बचत गट व सेंद्रीय शेती/धान्य विक्री यांचा समावेश आहे. तसेच डोम क्र. 1 पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागासाठी आणि डोम क्र. 8 उमेद (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या महोत्सवात काही स्टॉल्स बाहेरील व्यापाऱ्यांना देखील उपलब्ध करून देण्यात येणार असून, स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन मिळणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांनी या यवतमाळ महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले.

या पत्रकार परिषदेनंतर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सर्व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन तयारीची माहिती घेतली व यवतमाळ महोत्सव यशस्वी करण्यासाठी सज्ज राहण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# पत्रकाराला धक्काबुक्की

## एपीआय दाभाडेंविरुद्ध कारवाईची मागणी

### महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन! यवतमाळात पत्रकारांची एकजूट

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ : दारव्हा तालुक्यातील कारंजा येथील भुलाई टोल प्लाझावर २३ मार्च रोजी महाविकास आघाडीच्या आंदोलनावेळी वृत्त संकलनासाठी गेलेल्या पत्रकाराशी पोलिस अधिकाऱ्याने धक्काबुक्की व गैरवर्तन केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित एपीआय पंकज दाभाडे यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ, नागपूर शाखा-यवतमाळ तर्फे जिल्हाधिकारी विकास मीना यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

निवेदनानुसार, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी दारव्हा मार्गावर बॅरिकेड्स लावून वाहतूक काही काळासाठी बंद केली होती. मात्र, माध्यम प्रतिनिधींना ओळख पटवून देऊन टोल प्लाझावर जाण्यास परवानगी देण्यात आली होती. दरम्यान, कोणतीही गंभीर कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती नसताना एपीआय दाभाडे यांनी अचानक आक्रमक भूमिका घेत उपस्थितांना हाकलण्यास सुरुवात केली. यावेळी दै. लोकसूत्रचे कार्यकारी संपादक केशव सवळकर यांनी स्वतःची ओळख सांगून ओळखपत्र दाखविण्याचा प्रयत्न केला असता, दाभाडे यांनी त्यांच्याशी उद्धटपणे वागत धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच अपमानास्पद भाषेचा वापर केल्याचाही उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. घटनास्थळी इतर पोलीस अधिकारी उपस्थित असतानाही केवळ दाभाडे यांनीच आक्रमक वर्तन केल्याचे नमूद करत, या प्रकारामुळे पत्रकारांचा मानहानीकारक अवमान झाला असून पोलीस व माध्यमांतील सुसंवादावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता संघटनेने व्यक्त केली आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षकांच्या सूचनेनुसार एसडीपीओ डॉ. सिद्धेश्वर भोरे व ठाणेदार मुळे यांनी सामोपचाराने तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, संबंधित अधिकाऱ्याच्या वर्तणुकी बाबत कोणतीही खंत दिसून आली नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या घटनेचा निषेध करत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध सेवाशिस्तभंग व गैरवर्तनाच्या कलमान्वये कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. हे निवेदन देताना संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत राऊत, सचिव अमोल ढोणे पीडित केशव सवळकर यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

**जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ कारवाईचे आदेश**

यवतमाळ दारव्हा येथील आंदोलनावेळी पत्रकार केशव सवळकर यांच्याशी झालेल्या धक्का बुक्कीच्या घटनेची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने तात्काळ पावले उचलली आहेत. या प्रकरणी संबंधित एपीआय पंकज दाभाडे यांच्याविरुद्ध चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# वेचक

## गणपूर्ती अभावी विशेष सभा तहकूब! अध्यक्षांचा राजीनामा, पतसंस्थेवर प्रशासक नियुक्त



यवतमाळ - राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्हा पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., यवतमाळ (नोंदणी क्र. १२७) येथील रिक्त संचालक पदे भरण्यासाठी बोलाविण्यात आलेली विशेष सभा गणपूर्तीअभावी तहकूब करण्यात आली. या घडामोडींमुळे संस्थेच्या अध्यक्षांनी पदाचा राजीनामा दिल्याने पतसंस्थेच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण बदल घडला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २०१४ मधील नियम ७४ अंतर्गत पाचपैकी चार रिक्त संचालक पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्याचा प्रस्ताव होता. या पार्श्वभूमीवर आयोजित सभेचे अध्यक्षस्थान अभ्याशी अधिकारी श्रीमती विद्या एस. देउळकर यांनी भूषविणार होत्या. सभेसाठी सात संचालकांची उपस्थिती आवश्यक असताना काही संचालक गैरहजर राहिल्याने गणपूर्ती पूर्ण होऊ शकली नाही. परिणामी, अभ्याशी अधिकाऱ्यांनी सभा तहकूब जाहीर करून पुढील तारखेची सूचना देत परत प्रस्थान केले. दरम्यान, नामनिर्देशनासाठी काही सभासद उपस्थित होते.



## जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात 'कोड उत्सव १.०' हॅकथॉन यशस्वी

यवतमाळ - स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात सेंटर ऑफ एक्सलन्स (AI, ML व डेटा सायन्स) यांच्या वतीने २४ मार्च रोजी राष्ट्रीय स्तरावरील ऑफलाईन "कोड उत्सव १.०" हॅकथॉन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका ज्योतीताई वातीले यांच्या हस्ते झाले. या हॅकथॉनमध्ये राज्यभरातील सुमारे ४७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत कोडिंग, प्रॉब्लेम सॉल्विंग आणि नवकल्पनांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रोजेक्टवर काम करण्याची संधी मिळाल्याने टीमवर्क, वेळेचे व्यवस्थापन आणि सर्जनशीलतेचा विकास झाला. स्पर्धेत प्रथम पारितोषिक 'टिम लुमिनारा' (सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती), द्वितीय 'टिम पॉवर रेंजर्स' (डॉ. पंजाबराव देशमुख पॉलिटेक्निक), तृतीय 'टिम टेक बाइंडर्स' (प्रा. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय) तर चतुर्थ 'टिम हॅकर्स हडल' (जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालय) यांनी पटकावले. विजेत्या संघांना सुमारे १ लाख रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात आली. समारोपप्रसंगी सचिव डॉ. शितल वातीले व प्राचार्य डॉ. विजय भांबेरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत कठोर परिश्रम, चिकाटी व आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमासाठी प्रा. आशिष महल्ले यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले, तर परीक्षक व उद्योग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

# जमाअते इस्लामी हिंद पुसद व जामा मस्जिद ट्रस्टतर्फे ईद मिलन आणि मस्जिद परिचय कार्यक्रम



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - रोजी पुसद येथे रमजान ईद निमित्ताने मस्जिद परिचय व ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये पुसद येथील सर्व जाती, पंत धर्माच्या सामाजिक, राजकीय आणि धार्मिक संघटना व नागरिकांना आमंत्रित करण्यात आले होते.या मध्ये दिगंबर जगताप विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ महाराष्ट्र, लक्ष्मण कांबळे प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधनपर्व उत्सव समिती २०२६ पुसद ॲड. जांभुळकर समता सैनिक दल पुसद, हरगोविंद कदम शहराध्यक्ष मराठा सेवा संघ पुसद,संतोष सुरवाडे सर राज्य प्रशिक्षक भारत मुक्ती मोर्चा गणपतराव गव्हाळे सर आदिवासी परिषद भारत मुक्ती मोर्चा, राजू सोळंके नगरसेवक तसेच समीर गवळी नगरसेवक गावातील आणि गडी वार्डातील विशेषतः आणि शिक्षक वृंद आवर्जून उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात ही हाफिज खलील शम्सी यांनी पवित्र कुरआन पठणाने केली तर प्रास्ताविक शेख नईम सर यांनी केले त्या नंतर या कार्यक्रमाचे मुख्य वक्ते मुजीब देवणीकर मस्जिद परिचय अत्यंत साध्या आणि सोप्या मराठी भाषेत ठेवला त्यात त्यांनी मस्जिद मध्ये आत आल्या नंतर नंतर ते आजान,नमाज,खुतबा या संकल्पना प्रात्यक्षिक रित्या दाखवून स्पष्ट केल्या व नंतर रमजान महिन्याचा उद्देश यावर प्रबोधन केले या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्र संचालन सैय्यद सलमान सरांनी मराठी भाषेत केले कार्यक्रमात आलेल्या आलेल्या बांधवांनी आपल्या प्रतिक्रिया ठेवल्या व नंतर आलेल्या सर्व बांधवांनी गोड शिरखुरम्याचा आस्वाद घेतला.

# प्रा. ज्योती काळबांडे यांना व्हिएतनामध्ये आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - परिसरातील मिलिंद महाविद्यालय मुळावा येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा . ज्योती काळबांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक , शैक्षणिक कार्याबद्दल आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

येथील अ - 25 लक्झरी हॉटेलात आयोजित भव्य सभागृहात जागतीक आंबेडकरी साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजीत सहाव्या विश्व आंबेडकरी साहित्य संमेलनात अध्यक्ष सुप्रसिद्ध नाटककार डॉ. सुनील रामटेके संमेलनाचे उद्घाटक जेष्ठ कथाकार प्राचार्य डॉ नागनाथ पाटील,स्वागताध्यक्ष जागतिक समाजशास्त्रज्ञ डॉ . जगन कराडे, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे, संस्थेचे उपाध्यक्ष तथा संमेलनाचे संयोजक प्रोफेसर डॉ. अनिल काळबांडे, प्राचार्य डॉ. राहुल मस्के, डॉ. राजेश गायकवाड, प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, महामंडळाचे कायदेविषय सल्लागार एडवोकेट भूपेश पाटील, डॉ गुरुस्वामी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन हा पुरस्कार देण्यात आला. प्रा. ज्योती काळबांडे गेल्या 30 वर्षापासून मिलिंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन करतात त्याचबरोबर त्या विविध सामाजिक संघटनेत व शैक्षणिक कार्यात महत्वपूर्ण योगदान देतात त्यांच्या शैक्षणिक कार्यातून अनेक युवक युवतींना समोर जाण्याची प्रेरणा मिळते. त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण होते. विद्यार्थ्यांना अनेक उपक्रमातून त्या सातत्याने प्रयन्त करत असल्याने त्या विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून सुद्धा प्रसिद्ध आहेत . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित महापुरुषांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन सामाजिक वंचित घटकांना न्याय देण्याकरिता हा जागतिक पातळीवरचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने याही अगोदर दुबई, बँकॉक, थायलंड, मलेशिया श्रीलंका या देशात संमेलने घेऊन सामाजिक कार्य करणाऱ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला होता . प्रा . ज्योती काळबांडे यांच्या यशामुळे उमरखेड तथा जिल्ह्यात साठी ही अभिमानाची बाब असल्याने त्यांचे अनेक सामाजिक शैक्षणीक तथा पत्रकार Platform वतीने अभिनंदन करण्यात आले.

# उमरखेड महागाव मतदारसंघातील समस्यांवर आ. किसनराव वानखेडे यांची विधानसभेत लक्षवेधी मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - नियम २९३ प्रस्तावर चर्चा करतांना आ. किसनराव वानखेडे यांनी मतदारसंघातील तातडीचे व अत्यंत महत्त्वाचे मुद्दे मांडून शासनाचे लक्ष वेधले. इसापूर धरण व पैनगंगा नदी संदर्भात : मतदारसंघात इसापूर धरणात मोठ्या प्रमाणात पाणी असून देखील सध्या पैनगंगा नदी पूर्णतः कोरडी पडलेली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. सन १९९१ पासून या नदीद्वारे जनावरे,गुरे,ढोरे वन्यप्राणी व ४० ते ५० गावांना पिण्याच्या पाण्यासाठी नेहमी पाणी पुरवठा होत असे, मात्र, आज रोजी ३० कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्यामुळे पाणी सोडण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. चालू वर्षासाठी कमीत कमी १ कोटी ३० लाख रुपये भरण्याची अट घालूनच पाणी सोडण्याची भूमिका अधिकाऱ्यांनी घेतल्याचे निदर्शनास आले आहे. तरी शासनाने थकीत ३० कोटी रुपयांच्या निधीची तात्काळ उपलब्धता करून देऊन पैनगंगा नदीत नियमित जनावरे, गुरे, ढोरे वन्यप्राणी यांना पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी व कालव्यांद्वारे पाणी सोडण्याचे योग्य नियोजन करण्यात यावे.

कोरटा येथील शासकीय आदिवासी निवासी आश्रम शाळा : मतदारसंघातील बंदीभागात आदिवासी व बंजारा समाज मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहे. या भागातील कोरटा येथे शासकीय आदिवासी निवासी आश्रम शाळा आहे. सदर शाळेत २२० विद्यार्थ्यी व २१० विद्यार्थीनी सुमारे ४३० इतकी आहे.या शाळेत विद्यार्थ्यांसाठी योग्य वस्तीगृहाची सुविधा उपलब्ध नाही. तसेच जेवण्याची योग्य व्यवस्था नाही व आवश्यक त्या प्रमाणात शिक्षकांची उपलब्धता नाही, तरी शासनाने या शाळेसाठी सर्व सोयी युक्त वर्ग खोल्या व वस्तीगृह उभारणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच रिक्त शिक्षक पदांची लवकरात लवकर भरती करण्यात यावी.पर्यटन व धार्मिक स्थळांच्या विकासाबाबत : महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरण २०२४ राबविले जात आहे .माहूर हे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. या अनुषंगाने धनोडा येथे भाविकांसाठी सुरक्षित व सुसज्ज स्नानघाटाची उभारणी करण्यात यावी. तसेच उमरखेड येथे गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो, मात्र विसर्जनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण होते. त्यावर उपाय म्हणून मार्लेगाव जवळील पैनगंगा नदीच्या पुलाजवळ गणपती विसर्जन व भाविक भक्तांच्या सोयीसाठी घाटाची उभारणी करण्यात यावी.

# श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद येथे दीक्षांत समारंभ संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - येथील श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात पुसद येथे आज दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक रात्रकालीन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल मुंढे सर उपस्थित होते. तसेच कार्यकारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांचीही उपस्थिती होती. व्यासपीठावर कार्यालयीन अधीक्षक गोदमले सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थीमंडळाच्या समन्वयक डॉ. जीवने मॅडम यांनी प्रास्ताविक सादर केले. यानंतर श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यानंतर पदवी वितरण सोहळ्यास प्रारंभ झाला. कला विभाग प्रमुख डॉ. वैशाली पांडे यांनी पदवीप्राप्त विद्यार्थिनींची नावे जाहीर करून त्यांना पदवी प्रदान केली. बी.एस्सी. होम सायन्स विभाग चे डॉ. वंदना वानखेडे यांनीही त्यांच्या विभागातील विद्यार्थिनींची नावे जाहीर करून मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान केली. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. कमलकिशोर पंडागळे यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींची नावे घोषित करून त्यांना पदवी प्रदान केली. गृह अर्थशास्त्र विभागाच्या डॉ.जीवने मॅडम यांनी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनीचे नावे घोषित केली तसेच एम ए संस्कृत या विषयातील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनिचे नावे डॉ.वैशाली पांडे मॅडम यांनी घोषित केली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पदवी प्राप्त करण्यात आली. तसेच एम.ए. इतिहास विषयातील विद्यार्थिनींची नावे इतिहास विभाग प्रमुख डॉ. वर्मा यांनी जाहीर करून पदवी प्रदान करण्यात आली. प्रस्ताविक परभाषण कार्यकारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनिल मुडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सरिता चंदनकर यांनी केले, स्वागत गीत प्रा. आकाश ताविडे व विद्यार्थिनीने सादर केले तर आभार प्रदर्शन प्रा. दीपा काळीकर यांनी व्यक्त केले.

# महावितरणच्या मनमानी कारभाराविरोधात नागरिकांचा संताप! अन्यथा तीव्र आंदोलनाचा दिला इशारा!

जनमाध्यम प्रतिनिधी



ढाणकी - महावितरणच्या ढाणकी येथील सहाय्यक अभियंत्यांच्या मनमानी कारभाराविरोधात आणि सक्तीने बसवल्या जाणाऱ्या स्मार्ट मीटरविरोधात आता नागरिक आणि लोकप्रतिनिधीं चांगलेच आक्रमक झाले. सर्व पक्षीयांच्या वतीने थेट महावितरण अभियंता यांना चांगलेच धारेवर धरले. मुजोर सहायक अभियंता यांचा मनमानी कारभार सुरु झाला असून,सर्वच पक्षीयच्यावतीने यासंदर्भात उपकार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन प्रशासकीय कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात महावितरणच्या कारभारावर गंभीर ताशोरे ओढत महावितरण वर आरोप करण्यात आले. महावितरण कडून स्मार्ट मीटरची सक्ती करत ग्राहकांना विविध आमिषे दाखवून किंवा भीती घालून स्मार्ट मीटर बसवण्यास भाग पाडले जात आहे. या सक्तीला नागरिकांचा तीव्र विरोध असून याबद्दल अधिकारी यांना भेटण्यासाठी गेले तर अधिकारी अनुपस्थित राहतात, सहाय्यक अभियंता मुख्यालयी हजर राहत नसल्याने ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी कोणाशी संपर्क साधायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.महावितरणच्या गलथान कारभारामुळे शहरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे.

याचा थेट परिणाम नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेवर होत असून शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

वीज पुरवठ्याबाबत विचारणा केल्यास संबंधित अधिकारी ग्राहकांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देतात आणि घरी जाऊन अपमानास्पद वागणूक देतात, असा आरोप करत सहाय्यक अभियंता कर्तव्यात कसूर करत असतानाही वरिष्ठ अधिकारी त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता त्यांना पाठीशी घालत आहेत, असा संताप नागरिकांनी व्यक्त केला.निवेदन देतेवेळी नगरसेवक संजय सलेवाड, कॉंग्रेसचे बाळू पाटील चंद्रे, जॉन्टी विनकरे,मनसेचे सादिक शेख, ख्वाजा भाई कुरेशी, उ. बा. ठाकरे शिवसेनेचे सूर्यकांत वासमवार,फिरोज भाई, बंटी वाळके, संभाजी गोरटकर, शेख जब्बार, राकॉचे संतोष मंतेवाड , सचिन तोटेवाड, पवन वचेवार, एम. आय एम चे बशीर भाई, अमोल तुपेकर, शिवाजी वैद्य,यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरणचा मनमानी कारभार सुरु असून लाईट अनेकवेळा ड्रीप होत आहे. सहायक अभियंता याना नागरिकांनी विचारणा केल्यास अरेरावीची भाषा करीत आहे. उन्हाळ्याचे दिवस असून तापमाणात खूप वाढ झाली आहे. उखाड्यापासून सुटका मिळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक पंखे, कुलर निरुपयोगी पडत आहेत. लहान लहान चिमुकल्याना व वृद्धाना याचा नाहक त्रास होत आहे. कार्यकारी अभियंता सहायक अभियंता यांची पाठ राखण करीत आहे. यानंतर ढाणकीतील नागरिकांची लाईट संबंधी व सहायक अभियंता यांच्या विषयी तक्रार आल्यास होणाऱ्या नुकसानास सर्वस्वी जबाबदार महावितरण राहील. – **संजय सल्लेवाड नगरसेवक तथा शिवसेना शहराध्यक्ष**

# "कचरा ठेक्यातील निष्काळजीपणाचा बळी..!

## यवतमाळात ट्रॅक्टर ड्रायव्हरचा दुर्दैवी मृत्यू – जबाबदार कोण?"

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - नगरपरिषद यवतमाळच्या कचरा व्यवस्थापनातील हलगर्जीपणा आणि ठेकेदाराच्या 'काम चला' पद्धतीचा आणखी एक बळी गेल्याची धक्कादायक घटना आज सकाळी शहरातील कचरा डम्पिंग यार्ड येथे उघडकीस आली. महेश शेंडे (रा. प्रेरणा नगर, उमरसरा) या ट्रॅक्टर चालकाचा काम करत असतानाच दुर्दैवी मृत्यू झाला असून या घटनेमुळे नगरपरिषदेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सविस्तर माहितीनुसार, शहरातील कचरा वाहतूक करणारे अनेक ट्रॅक्टर अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याची बाब वारंवार समोर येत होती. संबंधित ट्रॅक्टरही मागील दोन दिवसांपासून नादुरुस्त होता. तरीही कोणतीही दुरुस्ती न करता चालकाला कामावर लावण्यात आले होते. आज सकाळी कचरा डेपोमध्ये ट्रॅक्टरचा टायर पंचर झाल्यानंतर महेश शेंडे यांनी स्वतःच जॅक लावून चाक बदलण्याचा प्रयत्न केला. मात्र, जॅक निसटल्याने कचऱ्याने भरलेली ट्रॉली त्यांच्या अंगावर कोसळली. ट्रॉलीतील कचऱ्याखाली दबून त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेने "कंत्राटदारांचा निष्काळजीपणा आणि नगरपरिषदेची ढिलाई" पुन्हा एकदा समोर आली आहे. कोट्यवधी रुपयांचा कचरा व्यवस्थापनाचा ठेका असताना वाहनांची दुरवस्था, सुरक्षा साधनांचा अभाव आणि कामगारांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. मृत महेश शेंडे यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असून कुटुंबाचा एकमेव आधार हरपल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेबद्दल परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नादुरुस्त वाहन रस्त्यावर का चालवले जात होते? कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची? ठेकेदारावर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? नगरपरिषद आरोग्य विभाग व प्रशासन आता तरी जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांसह कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# बिबट्याच्या संचारामुळे वडाळी, मंगलधाम, एसआरपीएफ भागात दहशत-आ.सुलभा खोडके

## सुरक्षात्मक उपाययोजना राबविण्यासाठी वनविभागाला निर्देशित करू-वनमंत्री नाईक

**अमरावती/का.प्र.**

शहरी भागात बिबट्याने संचार केल्याच्या घटना वारंवार समोर येत आहे.शहरालगत असलेल्या वडाळी वनपरिक्षेत्रातही बिबट्या शहरात भटकंती करत असल्याने वडाळी, विद्यापीठ, तपोवन परिसर, मंगलधाम परिसर, एसआरपीएफ कॅम्प,जुना बायपास भागातील नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. बिबट्या पासून मानवी जीवितास धोका पोहोचू नये म्हणून शासनाची काय उपाययोजना आहे?यासंदर्भात वनविभागाला निर्देशित करण्यात आले आहे का ? असा प्रश्न अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार आ.सुलभा खोडके यांनी राज्यविधिमंडळातून उपस्थित केला.

अमरावती शहराच्या लगतच वडाळी वनपरिक्षेत्र व पोहरा जंगल असून या भागात बिबट्याच्या मोठा अधिवास आहे. या वनपरिक्षेत्रात बिबट सह इतरही वन्यजीव हे अन्न -पाणीच्या शोधात शहराकडे भटकंती करत असून त्यांनी रहिवाशी भागातील पाळीव जनावरे फस्त केल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. शहरालगतच्या वडाळी, विद्यापीठ, तपोवन परिसर , मंगलधाम परिसर , एसआरपीएफ कॅम्प , जुना बायपास भागात बिबट्याने शिरकाव केल्याचे सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. शहरालगतच्या परिक्षेत्रातील बिबट्यांना वेळीच मज्जाव न घातल्यास ते शहराच्या मध्यवस्तीपर्यंत पोहोचतील, असे



अनेकदा समोर आले आहे.शहरालगतच्या जंगल भागाला चैनलिंग फेन्सिंग करणे आवश्यक आहे. अशी सुचना सुद्धा आमदारांनी सभागृहासमक्ष केली.

यावर उत्तर देतांना राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहात सांगितले की, महाराष्ट्र शासनाने वन्यजीव संरक्षण कायदा दुरुस्ती विधेयक विधानसभेत पारित केले असून यामध्ये वन्यजीवांच्या अधिवासाचे रक्षण जितके महत्वाचे आहेत, तितकेच मानवी जीवितास त्याचा धोका उद्धवू नये म्हणून प्रभावी खबरदारी व उपाययोजना करण्याचे सुद्धा तरतुदी आहेत. अमरावती शहरी भागात बिबट्याचा शिरकाव होऊ नये म्हणून वनविभागाला ठोस उपायोजना करण्याचे निर्देशित करणार असून सदस्यांच्या सुचने नुसार जिल्हा प्रशासन,लोकप्रतिनिधी , स्थानिक पोलीस यंत्रणा तसेच ग्रामीण प्रशासन या सर्वांना सोबत घेऊन तत्परतेने प्रभावी उपाययोजना करण्यासंदर्भात वन विभागाचा पुढाकार राहणार असल्याचे उत्तर मंत्री गणेश नाईक यांनी दिले.

# बस स्टँड परिसरातील खुनप्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

**अमरावती/का.प्र.**

येथील बस स्टँड परिसरात २०२२ साली घडलेल्या खुनप्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक ५ पी. एस. शिंदे यांच्या न्यायालयाने आज हा निर्णय दिला.

सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा क्र.१९८/२०२२ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ नुसार हा गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणात गंगाधर उर्फ बाळू केशवराव भिरंगे (वय ५० वर्षे,व्यवसाय – मजुरी,रा. अंजनगाव बारी, अमरावती) यांच्यावर बस स्टँड रोडवरील गभने कॉम्प्लेक्स परिसरात घडलेल्या घटनेत निलेश गणेश खाडे (वय ३२ वर्षे) यांच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला होता.या प्रकरणात न्यायालयात एकूण १५ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. तसेच घटनास्थळाचा पंचनामा, रक्ताचे नमुने, शस्त्र व इतर पुरावे सादर करण्यात आले होते.आरोपीच्या वतीने मुख्य न्यायरक्षक ॲड. जितेंद्र जे. देशमुख (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती अंतर्गत लोक अभिरक्षक कार्यालय,अमरावती) यांनी न्यायालयात सविस्तर युक्तिवाद मांडला. त्यांना ॲड. प्रीती मोहता यांनी सहकार्य केले.

न्यायालयात सादर केलेले पुरावे, साक्षीदारांच्या जबान्या आणि दोन्ही बाजूंचे युक्तिवाद विचारात घेतल्यानंतर ॲड. जितेंद्र जे. देशमुख यांनी केलेला भक्कम युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपीविरुद्ध दोष सिद्ध होण्यास पुरेसे ठोस पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद करत आरोपी गंगाधर उर्फ बाळू भिरंगे यांना खुनाच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्याचा आदेश दिला.या निकालानंतर आरोपीच्या कुटुंबीयांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गुजरी बाजारच्या घटनेनंतर प्रशासन आणि व्यापाऱ्यांची बैठक

**अचलपूर/वार्ताहर**

२४ मार्च रोजी परतवाडा शहरातील गुजरी बाजार येथे राज बुक डेपो चे संचालक यांच्या कटला गाडी हटविण्यावरुन झालेल्या वादविवाद मध्ये एका व्यक्तीने लोखंडी रॉड ने प्राणघातक हल्ला केल्याची घटनेने खळबळ उडाली आहे.यानंतर व्यापारी वर्गाने तीव्र निषेध या घटनेचा केला आहे.यानंतर आज अचलपूर नगर परिषद सभागृहात अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष सौ.रुपाली माथने,मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड,परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के,नगरसेवक मनोज नंदवंशी,विजय थावानी,विजय अग्रवाल आणि व्यापाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीती बैठक संपन्न झाली.



या बैठकीत परतवाडा शहरातील सदर बाजार,गुजरी बाजार,आठवडी बाजार येथील अरुंद रस्ते ,अतिक्रमण ,पार्किंग चा अभाव यामुळे दुकानदार व वाहन चालकांचे वाढते वादविवाद आदि विषयावर चर्चा झाली .यावेळी दुकानदारांनी विविध समस्या मांडल्या .यानंतर परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांनी सांगितले की ,गुजरी बाजार येथे लवकरच पोलिस चौकी स्थापित होणार आहे.एकीकडे परतवाडा शहरात बाजार पेठेत गर्दी वाढत आहे .यामुळे पार्किंग साठी जागा ,अतिक्रमण मुक्त मोहीम साठी स्वतंत्र पथक, नो हॉकर्स झोन आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी स्वतंत्र वाहतूक विभागाचे अधिकारी यांच्याशी चर्चा करून पुढील उपाययोजना राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले .यानंतर अचलपूर नगर परिषद मुखायधिकारी धीरज कुमार गोहाड यांनी सांगितले की ,गुजरी बाजार येथे पोलिस चौकी स्थापित होणार आहे.व्यापाऱ्यांचा समस्या बाबत लवकरच अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या दालनात सर्व विभागाची बैठक आयोजित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.परतवाडा पोलिस विभाग व नगर परिषद विभाग संयुक्त आता महिन्यातून काही दिवस अतिक्रमण मुक्त मोहिम राबविणार असल्याचे ही त्यांनी सांगितले .या बैठकीनंतर आता तरी दुकानदारांना सामना करावा लागणाऱ्या समस्या मार्गी लावून दिलासा मिळणार अशी आशा नागरिकांनी व्यक्त केल्या आहे .यावेळी अजय अग्रवाल,आकाश श्रीवास्तव,संतोष खूटेटा ,रुपेश लहाने ,ललित ठाकूर ,सुरेश अटलाणी,प्रफुल बर्वे, छोटू सीरोया आदी व्यापारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत विदर्भातील पहिले ३३ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित

## शेतकरी व वीज ग्राहकांना खात्रीशीर वीज पुरवठ्याची सोय

**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत पुसद तालुक्यातील जाम बाजार येथे विदर्भातील पहिले ३३ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. या उपकेंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा खात्रीशीर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे. यावेळी अधीक्षक अभियंता दीपाली माडेलवार, कार्यकारी अभियंता जनार्धन चव्हाण, शशांक पोंक्षे , उपकार्यकारी अभियंता सुहास मेश्राम,प्रविण गवळी यांची उपस्थिती होती.



शेतकऱ्यांची दिवसा विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्यात येत असून, महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्राभोवती विकेंद्रीत स्वरूपात सौर प्रकल्प उभारून वीज निर्मिती केली जात आहे. तसेच काही भागात नवीन ३३ केव्ही उपकेंद्रांची उभारणीही करण्यात येत आहे.मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अधीक्षक अभियंते प्रविण दरोली, दिपक देवहाते व दीपाली माडेलवार यांच्या पुढाकाराने परिमंडळात या योजनेला गती देण्यात आली आहे. परिमंडळातील सुमारे २ लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांना या योजनेद्वारे दिवसा वीज मिळू लागली आहे.जाम बाजार येथील हे उपकेंद्र १० एमव्हीए क्षमतेचे असून, या उपकेंद्रातून ११ केव्हीचे एकूण ६ फीडर कार्यान्वित करण्यात आले आहेत. यात जाम बाजार, पारवा आणि वानवारला या भागांसाठी प्रत्येकी कृषी व गावठाण असे ३ कृषी व ३ गावठाण फीडरचा समावेश आहे.उपकेंद्रामुळे परिसरातील एकूण सुमारे ५ हजार वीज ग्राहकांना खात्रीशीर व दर्जेदार वीज पुरवठा मिळणार आहे. यात २,४५० शेतकरी, २,२०० घरगुती, २७८ व्यावसायिक आणि ५३ औद्योगिक ग्राहकांचा समावेश आहे.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होऊन शेती कामे सुलभ होणार असून, ग्रामीण भागातील वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेतही लक्षणीय सुधारणा होणार आहे.

# स्व. रावसाहेब इंगोले यांची जयंती साजरी

**अमरावती/का.प्र.**




येथील श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये शहीद दिन व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. रावसाहेब इंगोले यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त कार्यक्रम महाविद्यालयामध्ये संपन्न झाला .अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे तर आय क्यू एसी समन्वयक डॉ. पुष्पलता देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शहीदांच्या डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व स्व. रावसाहेब इंगोले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गावंडे यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या बलिदानाचे स्मरण करताना सांगितले की,'देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या तरुण वयात प्राणाची आहुती देणारे हे क्रांतिकारक खऱ्या अर्थाने देशभक्तीचे जाज्वल्य प्रतीक आहेत असे प्राचार्यांनी याप्रसंगी सांगितलं तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. रावसाहेब इंगोले हे केवळ संस्थेचे अध्यक्ष नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले, शिक्षणप्रेमी व समाजहिताची जाणीव असलेले नेतृत्व होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात संस्थेच्या प्रगतीसाठी घेतलेले निर्णय आजही मार्गदर्शक ठरत आहेत.त्यांनी शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, शिस्त व संस्कार यांना प्राधान्य देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने शैक्षणिक, सामाजिक ,सांस्कृतिक व वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले.असे प्राचार्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा व सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे मार्गदर्शन याप्रसंगी केले.संचालन प्रा. जितेंद्र राऊत यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# राजवैभवाचा त्याग करणारे प्रभू श्रीराम

**श्री**रामचंद्रप्रभू एक आदर्श मर्यादा पुरुषोत्तम, आज्ञापालन करणारे, एकपत्नीव्रत पालन करणारे, शौर्य, शक्ती असतांनाही त्याचा गैरवापर कधीही न करणारे व्यक्तित्व होते. रावणाचे राज्य जिंकूनही त्या राजसत्तेचा तसूभरही लोभ न बाळगता ते राज्य रावणाच्या भावाला बिभिषणाला सोपवणारे एकमेव निस्वार्थी रामच होते.श्रीरामापासून आपण काय घेऊ शकतो? असा प्रश्न जर कुणी आपल्याला विचारला तर त्याचे उत्तर असे राहील की सावत्र आई जरी असली आणि तिने जरी वनवास भोगण्याची आज्ञा दिली तरी तिची आज्ञा शिरसावंद्य मानून, तिच्या आज्ञेचा आदर करुन राजवैभव सोडून रखरखता वनवास भोगणारे श्रीराम हे आज्ञाधारक होते. म्हणून आपण आज्ञाधारक राहून आपल्या जेष्ठांची, आई-वडीलांची आज्ञा नेहमी पाळून सदासर्वकाळ त्यांच्यासमोर नम्र, विनयशील राहावे. दुसरे म्हणजे रामाने कधीही आपली मर्यादा सोडली नाही. आपली मर्यादा पाळण्यासाठी त्यांनी सर्व सुखाचा त्याग केला. परिस्थिती कशीही असो प्रतिकूल असो वा अनुकूल असो मानवांनी आपली मर्यादा सदैव सांभाळावी.

एका करंगळीच्या नखाने सहस्त्रावधी राक्षसांचा निप्पात क्षणार्धात करु शकणारे शौर्यवान, रघुकूल योध्दा श्रीरामाने आपल्या शत्रूवर बेसावध असतांना कधीही वार केला नाही. न्याय व नितीने युध्द केले. न्याय, निती या धर्माचे पालन करणारे क्षात्रतेज असलेले ते राजपुरुष होते. त्यांना भगवान विष्णूंचा सातवा अवतार मानल्या जाते. म्हणून मानवजातीने त्यांच्यापासून न्याय, निती हा धर्म शिकला पाहिजे.श्रीरामप्रभू हे आपल्या सख्या मातेवर जेवढे प्रेम करीत असायचे तेवढेच प्रेम त्यांनी आपल्या सावत्र आई व सावत्र भावांवर केले. यातून त्यांचा समत्व भाव दर्शीत होतो. कौशल्यापूत्र रामाला लक्ष्मण हा सख्खा भाऊ होता तर भरत शत्रुघ्न हे सावत्र भाऊ होते पण रामाने कधीही सख्या व सावत्र भावात भेद केला नाही. सर्वांशी समान भावनेने वागणे हे आपण रामापासूनच शिकू शकतो. ज्यांना आपण महारुद्र म्हणतो असे भगवान शंकरजींचा अकरावा अवतार असलेले, अचाट शक्तीसामर्थ असलेले हनुमानजी यांनी रामाशी एकनिष्ठ राहून राम-रावण युध्दात रामाची साथ देऊन सितामाईचा शोध घेतला. म्हणून जो रामरायाची भक्ती करतो त्याला प्रत्येक संकटात हनुमानजी साथ देतात.



श्रीरामाला भक्तीपुर्वक आवाहन करणारे रामरक्षास्त्रोत्र हे असे शक्तीशाली कवच आहे की, ज्यांनी भक्तीपुर्वक रामरक्षा स्त्रोत्राचे पठन नित्यानेमाने सायंकाळी केल्यास त्याच्या पायापासून शिरापर्यंत सर्व शरीराच्या अवयवाचे रक्षण श्रीरामचंद्रप्रभू करतात. त्याची प्रत्यक्ष अनुभूती अनेक रामभक्तांनी घेतली आहे. रामाचे सामर्थ्य, त्यांची आज्ञापालन वृत्ती, मर्यादा, सहनशीलता, इतरांविषयी स्नेह व प्रेमाची भावना, राजवैभवाची निरासक्ती, विनयशिलता ही त्यांची बलस्थाने आहेत. रामभक्तीचा तेरा अक्षरी मंत्र 'श्रीराम जय राम जय जय राम' असा आहे. हा मंत्र अगदी साधा, सरळ, सुलभ असला तरी या मंत्राचे सामर्थ्य खूप मोठे आहे. हा तारक व संजीवनी मंत्र आहे.

रामाला राजसिंहासन मिळत असतांना केवळ आपल्या मुलाला भरताला राज्य मिळावे म्हणून रामाला चौदा वर्षे वनवासात पाठवणा-या सावत्रमाता कैकयीचा सुध्दा रामाने द्वेष केला नाही. श्रीरामाने कधीही कुणाचा द्वेष केला नाही. राजसिंहासन त्यागून त्यांनी कोणतीही असुया न ठेवता सावत्र माता कैकयीची आज्ञा पाळून आनंदाने चौदा वर्षे वनवास भोगला. न्यायमार्गाने त्यांनी रघुकूल रितीनुसार युध्द केले म्हणून त्यांना रघुकूल योध्दा म्हटल्या जात होते.वचनप्रिय म्हणजे वचनाचे पालन करणारे श्रीराम होते. क्रोधाचा त्याग करुन सहनशील वृत्ती त्यांनी नेहमी बाळगली. श्रीरामाजवळ मनाचे औदार्य होते. त्यांनी मनाचे औदार्य ठेवून आपल्या शत्रूलाही क्षमा केलेली आहे. परस्त्रीला मातेसमान मानणारे ते सत्पुरुष होते. रावण आपला शत्रू असतांनाही रामाने रावणाच्या विद्वत्तेचा सन्मान ठेवून रावणाचा वध केल्यानंतर त्याचा अंतिम संस्कार सन्मानपूर्वकच केला. इतके आदर्श आचरण फक्त श्रीरामाजवळच असू शकते असे म्हणायला हरकत नसावी. आपले जेष्ठ बंधू रामावर अपार प्रेम करणा-या भरताने वनवासाची शिक्षा देणा-या कैकयीविषयी एकही वाईट शब्द बोलू नये अशी ताकीद देणारे स्वच्छ अंत:करणाचे राम होते. म्हणून रामाचे जीवनचरित्र मानवजातीचा उध्दार करणारे आहे. याची जाणीव सर्व रामभक्तांनी ठेवावी. श्रीरामचंद्रांना आदरपुर्वक वंदन करतो.

**अनिल बारसकर,**
अमरावती
९४२२८८१३३७

## संक्षिप्त

### थकीत मालमत्तांवर मनपाची कारवाई



**अमरावती-**महानगरपालिका झोन क्र. ४, बडनेरा अंतर्गत वॉर्ड येथील मालमत्ता क्र. १३५२ बाबत महानगरपालिकेकडून ठोस प्रशासनिक पावले उचलण्यात आली आहेत. महानगरपालिकेच्या माहितीप्रमाणे, सदर मालमत्तेवर थकीत रक्कम असल्याने आणि मालमत्ताधारकांनी प्रशासनाकडे कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे सहा. आयुक्त धनंजय शिंदे यांच्या आदेशान्वये ही मालमत्ता जप्ती नोटीस बजावण्यात आली होती.तथापि, मालमत्ताधारकांनी नोटीसला दुर्लक्ष केल्याने,महानगरपालिकेने पुढील आदेश येईपर्यंत मालमत्ता सील करण्याची कठोर कार्यवाही सुरू केली आहे. या कारवाईत महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून मालमत्ता सील करण्याची प्रक्रिया पूर्ण करत आहेत.थकीत मालमत्ता आणि कर भरु न देणे ही शहराच्या विकासकामांवर तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांवर प्रतिकूल परिणाम करते. म्हणून, महानगरपालिका अशा प्रकरणांमध्ये कठोर भूमिका घेणे अनिवार्य ठरते.या कारवाईनंतर शहरातील इतर थकीत मालमत्तांवर देखील लक्ष ठेवण्यात येणार असून, आवश्यक असल्यास त्या मालमत्तांवरही तत्काळ महानगरपालिकेची कार्यवाही होईल.

### शहीद दिनानिमित्त अभिवादन



**अमरावती-**शहीद दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाला अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाला मो. अफसर भाई, विजय डवरे, प्रफुल्ल मंदा श्रीधर, मनीष गवई, विजय गायकवाड, संदीप यादव, प्रवीण वासनिक, गणेश गहुकर, सुनील रामटेके, प्रा. डॉ. संजय खडसे, आशिष देशमुख, हिवराळे, शुभम दमाहे, दिगंबर मेश्राम, सचिन खोब्रागडे, नितीन गायकी आदी उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महा. अनिस) चे सर्व साथी, संविधान जागरचे साथी व विविध समविचारी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्व.श्रीकृष्ण कळंब स्मृतीप्रित्यथ कविसंमेलन



**अमरावती-**सरसो, मूर्तिजापूर येथे श्री पुंडलीक महाराज यात्रा जन्मोत्सव,निमित्ताने पाचवे शेतकरी साहित्य संमेलनात कवी स्व.श्रीकृष्ण कळंब स्मृतीप्रित्यर्थ कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.अमरावती वरुन वऱ्हाडी कवी आबासाहेब कडू, 'वऱ्हाडी मायबोली' कवी दिवाकर देशमुख, अशोक आवारे,बहिणाबाई चौधरी पुरस्कारासह एकूण ६३ पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध साहित्यिका व कवयित्री सुलभा गोगरकर, निवेदिका आरती नागपूरे, खुशाल गुल्हाने,युवा कादंबरीकार विशाल मोहोड,सुधाकर काळे,गजलकार रवींद्र जवादे, प्रमोद पंत,राजेंद्र भटकर,डॉ स्वाती पोटे इ. सह एकूण ३० कविंनी सेवा अर्पण केली.शेतकरी साहित्य संमेलनात यावर्षी प्रथमच 'वऱ्हाडी मायबोली' कार्यक्रमाचे सूत्रधार दिवाकर देशमुख यांचे संचालने कविसंमेलनाचे यश ठरले.कार्यक्रमाला श्री पुंडलीक महाराज संस्थानचे अध्यक्ष विठ्ठल पातोंड,मुकुंद पातोंड,शारदा पातोंड,सचिव विवेक पातोंड, सुधाकर गौरखेडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.प्रास्ताविक मुकुंद पातोंड यांनी केले.

### डॉ. अतुल ठाकरे कुलगुरूदत्त सुवर्णपदकाने सन्मानित



**चांदूर रेल्वे-** स्थानिक बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे यांना कुलगुरूदत्त सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले आहे.कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य तसेच विशेष अतिथि म्हणून पद्मभुषण पुरस्कार प्राप्त प्रा. गणपती यादव तर प्रमुख अतिथि म्हणून शिक्षणशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ.ललीता चंद्रात्रे(जोशी), विभागप्रमुख डॉ.ऋषिकेश दलाई, प्राध्यापिका डॉ. किर्ती सदार, डॉ.राजश्री मेश्राम व डॉ.अमोल मांडेकर हे उपस्थित होते. या दीक्षांत समारंभात प्राचार्य डॉ. अतुल भुजंगराव ठाकरे यांना मान्यवरांच्या हस्ते शिक्षणशास्त्र या विषयात आचार्य ही पदवी प्रदान करण्यात आली तसेच शिक्षणशास्त्र या विषयात केलेल्या या उत्कृष्ट संशोधन प्रबंधाकरीता त्यांना 'कुलगुरूदत्त सुवर्णपदक' देऊन सन्मानित करण्यात आले.या यशाबद्दल त्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख,उपाध्यक्ष गजानन पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी,शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,संस्थेतील सर्व मुख्याध्यापक,शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

### अंधांच्या बुद्धिबळ स्पर्धेत ६६ स्पर्धकांचा सहभाग

**अमरावती-**शहरातील भारतीय अंधजन विकास व पुनर्वसन संस्थेतर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय अंधांच्या बुद्धिबळ स्पर्धेत एकूण ६६ स्पर्धकांनी भाग घेतला. स्पर्धेत पंचांचे कार्य निनाद सराफ दाम्पत्याने केले. स्पर्धेचा निकाल मध्ये प्रथम दहा क्रमांकाचे मानकरी सोमनाथ जाधव अहिल्यानगर कल्पेश मानवटकर नागपूर पुंडलिक जमले चंद्रपूर निलेश ताम्हणकर पुणे, दवाराचा ढोले नागपूर प्रथमेश बतुलवार पुणे रवी आंबेकर चंद्रपूर राज करगोमे अकोला सुख जाधव पुणे सुदर्शन पाखरे अकोला व उत्तेजनार्थ महिला स्पर्धक ऋतुजा लंगोटे व संस्कार दंडोळे यांना पुरस्कृत करण्यात आले.

# मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम...

आजचे युग विज्ञान, तंत्रज्ञान आणि झपाट्याने बदलणाऱ्या जीवनशैलीचे युग म्हणून ओळखले जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट, अंतराळ संशोधन, जैवतंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि डिजिटल तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत मानवाने अभूतपूर्व प्रगती साधली आहे. या प्रगतीमुळे मानवी जीवन अधिक सोयीस्कर, वेगवान आणि सुलभ झाले आहे. जग आज एका क्लिकवर उपलब्ध झाले आहे. माहितीची देवाणघेवाण, आरोग्यसेवा, शिक्षण, उद्योग आणि प्रशासन या सर्व क्षेत्रांत विज्ञानाने क्रांती घडवून आणली आहे. परंतु या प्रगतीसोबतच काही गंभीर सामाजिक आणि मानसिक समस्या देखील वाढताना दिसतात. तणावपूर्ण जीवनशैली, कौटुंबिक नात्यांमधील दुरावा, नैतिक मूल्यांचे अधःपतन, स्वार्थी वृत्ती आणि सामाजिक असंतुलन या समस्या आधुनिक समाजाला भेडसावत आहेत. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीने दिलेले आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांचे जीवन अत्यंत मार्गदर्शक ठरते. श्रीरामांचे चरित्र केवळ धार्मिक कथांपुरते मर्यादित नसून ते मानवी मूल्ये, नैतिकता, कर्तव्यनिष्ठा, संयम आणि संतुलित जीवनशैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

श्रीरामांना 'मर्यादा पुरुषोत्तम' असे संबोधले जाते, कारण त्यांनी जीवनातील प्रत्येक नातेसंबंधात मर्यादा, शिस्त आणि आदर्श आचरण जपले. ते केवळ एक महान राजा नव्हते, तर एक आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श भाऊ, आदर्श मित्र आणि आदर्श शासक होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कर्तव्यनिष्ठा, सत्यनिष्ठा, त्याग, धैर्य आणि करुणा यांचा सुंदर संगम दिसतो. आधुनिक विज्ञानयुगात माणसाकडे प्रचंड माहिती आणि तांत्रिक सामर्थ्य उपलब्ध असले तरी योग्य मूल्यांची कमतरता अनेकदा जाणवते. आजच्या काळात व्यक्तीच्या हातात तंत्रज्ञान आहे, पण त्याच्या वापरासाठी आवश्यक असलेले नैतिक मार्गदर्शन अनेकदा कमी पडते. प्रभू श्रीरामांचे जीवन आपल्याला सांगते की कोणत्याही युगात मानवी जीवनाची खरी उंची ही नैतिकता, संयम आणि कर्तव्यभावना यांवर अवलंबून असते.

आधुनिक समाजातील सर्वात मोठा बदल म्हणजे जीवनातील वेग. आजचा मनुष्य स्पर्धेच्या शर्यतीत सतत धावत आहे. शिक्षण, करिअर, आर्थिक प्रगती आणि सामाजिक प्रतिष्ठा यांसाठी तो अखंड प्रयत्न करत असतो. या धावपळीत अनेकदा कुटुंब आणि सामाजिक नातेसंबंध यांकडे दुर्लक्ष होते. कुटुंबातील सदस्यांमध्ये संवाद कमी होतो आणि नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो. अशा परिस्थितीत प्रभू श्रीरामांचे कौटुंबिक जीवन अत्यंत प्रेरणादायी ठरते. वडिलांनी दिलेल्या शब्दासाठी त्यांनी राज्यसुखाचा त्याग करून आनंदाने वनवास स्वीकारला. हा प्रसंग केवळ आज्ञाधारकतेचे उदाहरण नसून कर्तव्यनिष्ठा, त्याग आणि कौटुंबिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. आजच्या काळात पालक आणि संतती यांच्यात अनेकदा मतभेद निर्माण होतात; परंतु श्रीरामांचे उदाहरण आपल्याला शिकवते की कुटुंबातील परस्पर आदर, विश्वास आणि समजूतदारपणा यांमुळे समाज अधिक सुदृढ होतो.

आजच्या युगातील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नैतिकतेचा अभाव. विज्ञानाने मानवाला प्रचंड शक्ती दिली आहे. अणुऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, जनुकीय अभियांत्रिकी आणि डिजिटल तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये माणसाने मोठी प्रगती केली आहे. परंतु या शक्तीचा उपयोग कसा करायचा हे ठरवण्यासाठी नैतिक मूल्यांची आवश्यकता असते. जर विज्ञानाचा वापर केवळ स्वार्थासाठी किंवा विनाशासाठी झाल्याने, त्याचे अत्यंत घातक परिणाम आपण बघतच आहे. प्रभू श्रीरामांचे जीवन या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी कोणत्याही परिस्थितीत धर्म, न्याय आणि सत्याचा मार्ग सोडला नाही. रावणासारख्या बलशाली शत्रूशी लढताना देखील त्यांनी न्यायाची मर्यादा ओलांडली नाही. आजच्या काळात विज्ञानाचा उपयोग मानवकल्याणासाठी करण्यासाठी अशीच नैतिकता आणि जबाबदारीची भावना आवश्यक आहे.

समाजव्यवस्थेच्या दृष्टीनेही प्रभू श्रीरामांचे शासन आदर्श मानले जाते. 'रामराज्य' ही संकल्पना भारतीय समाजात न्याय, समता, शांतता आणि लोककल्याण यांचे प्रतीक म्हणून ओळखली जाते. रामराज्यात प्रजा सुखी, सुरक्षित आणि



समाधानी होती असे वर्णन आढळते. शासनकर्ते प्रामाणिक, जबाबदार आणि लोकहितासाठी कार्य करणारे होते. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही शासनकर्त्यांनी पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि लोककल्याण यांना प्राधान्य दिले पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासन अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनू शकते परंतु त्यामागे लोकसेवेची भावना असणे अत्यंत आवश्यक आहे. श्रीरामांचे आदर्श या संदर्भात मार्गदर्शक ठरतात.

आधुनिक जीवनशैलीत मानसिक तणाव ही एक गंभीर समस्या बनली आहे. स्पर्धा, करिअरची धडपड, आर्थिक दबाव, सोशल मीडियाचा प्रभाव आणि सतत बदलणाऱ्या अपेक्षा यांमुळे अनेक लोक मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होत आहेत. अशा वेळी श्रीरामांच्या व्यक्तिमत्त्वातील संतुलन, धैर्य आणि आत्मसंयम विशेष प्रेरणादायी ठरतात. वनवासातील कठीण परिस्थितीतही त्यांनी संयम आणि धैर्य कायम ठेवले. संकटांच्या काळात त्यांनी धीर न सोडता योग्य निर्णय घेतले. त्यांच्या जीवनातून आपल्याला सकारात्मक दृष्टिकोन, आत्मसंयम आणि ध्येयवादी जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. आधुनिक मानसशास्त्रही सांगते की आत्मसंयम, सकारात्मक विचार आणि स्थिर मनोवृत्ती यामुळे मानसिक आरोग्य चांगले राहते.

पर्यावरण आणि निसर्गाशी असलेले नाते हे देखील प्रभू श्रीरामांच्या जीवनातून शिकण्यासारखे आहे. वनवासाच्या काळात त्यांनी निसर्गाशी सुसंवाद साधत जीवन व्यतीत केले. जंगलातील जीवन, प्राणी-पक्ष्यांशी असलेले सहअस्तित्व आणि निसर्गाबद्दलची संवेदनशीलता ही भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत. आज विज्ञानयुगात औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि अतिरेकी उपभोग यांमुळे पर्यावरणावर मोठा ताण पडत आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत. अशा परिस्थितीत निसर्गाशी सुसंवादी जीवन जगण्याची भारतीय परंपरा अत्यंत महत्त्वाची ठरते. श्रीरामांचे जीवन आपल्याला सांगते की विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखणे ही मानवाची जबाबदारी आहे. मानवी नातेसंबंधांच्या दृष्टीनेही प्रभू श्रीरामांचे चरित्र अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी मित्र, सहकारी आणि प्रजेशी विश्वास, आदर आणि सहकार्य यांच्या आधारावर संबंध ठेवले. सुग्रीव, हनुमान आणि विभीषण यांच्याशी असलेले त्यांचे संबंध निष्ठा, विश्वास आणि परस्पर सहाय्यावर आधारित होते. संकटाच्या काळातही त्यांनी आपल्या मित्रांना साथ दिली आणि त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवला. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि स्पर्धेच्या युगातही सहकार्य, परस्पर आदर आणि टीमवर्क हे यशाचे महत्त्वाचे घटक मानले जातात. आधुनिक व्यवस्थापन शास्त्रात ज्या मूल्यांवर भर दिला जातो, त्यांचे तत्त्वज्ञान आपल्याला रामायणातही दिसून येते.

स्त्रीचा सन्मान, तिची सुरक्षितता आणि समानता या विषयांवरही रामायणातील अनेक प्रसंग समाजाला महत्त्वाचा संदेश देतात. सीतेबद्दलचा आदर, तिच्या सन्मानासाठी केलेला संघर्ष आणि स्त्रीच्या संरक्षणाचा संदेश हे समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आधुनिक समाजात स्त्रीशिक्षण, स्त्रीसक्षमीकरण आणि समान हक्क यांवर विशेष भर दिला जात आहे. स्त्रीला सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याचा अधिकार आहे ही जाणीव अधिक बळकट करण्यासाठीही रामायणातील आदर्श प्रेरणादायी ठरू शकतात. शेवटी विज्ञानयुगातील प्रगती माणसाला सुविधा, वेग आणि प्रचंड सामर्थ्य देऊ शकते, परंतु जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी नैतिक मूल्यांची आवश्यकता असते. मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांचे जीवन हे सत्य, कर्तव्यनिष्ठा, संयम, प्रेम, त्याग, न्याय आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण आहे. आधुनिक मानवाने विज्ञानाच्या प्रगतीसोबत श्रीरामांच्या आदर्शांचा स्वीकार केला, तर मानवजातीचे भविष्य अधिक संतुलित, नैतिक आणि सुखी होऊ शकते. त्यामुळे विज्ञानयुगातही प्रभू श्रीरामांचे आदर्श हे केवळ पौराणिक कथा नसून आधुनिक जीवनाला दिशा देणारी चिरंतन मूल्ये आहेत यात शंका नाही.....

**श्रीपाद टेंबे .**
मो.९१५८०८८०४२

## प्रभू श्रीरामचंद्र



श्रीराम हे आराध्य।
असाध्य ते साध्य।।
काय तेथे बाध्य।
जानकीनाथ सत्य।।

श्रीराम हे रामराजा।
मलीन मन वजा।।
दुर्गुणांसी रे सजा।
उजळी ते ज्ञानतेजा।।

श्रीराम राजनितीज्ञ।
शत्रु ते स्थितप्रज्ञ ।।
जयअश्वमेधयज्ञ।
गात संगीतज्ञ ।।

श्रीराम हे दयाळू।
भक्तांसी कनवाळू ।।
असमानी हे सावळू।
हा राज दीनदयाळू ।।

श्रीराम वीर शूर।
राक्षसी वृत्ती दूर ।।
प्रेमळ नदी पूर।
सुस्वर राग सूर ।।

श्रीराम तपःश्चर्या।
सीता एक भार्या।।
एकवचनी सत्यकार्या।
कवीतज्ञ गान आर्या।।

श्रीराम शांत मुर्ती।
वैराग्यपूर्ण वृत्ती।।
निवृत्तीची प्रवृत्ती।
शक्ती भक्ती मुक्ती।।

श्रीराम आज्ञाधारक।
अनाथ भक्तोद्धारक।।
दीनानाथ भवतारक।
अरिष्ट शक्ती मारक।।

श्रीराम एक नाम।
बह्मांड सार ग्राम।।

शिवमंत्र सार राम।
साकेत ज्याचे धाम।।

श्रीराम शत्रुघ्नाग्रज।
श्रीराम लक्ष्मणाग्रज।।

श्रीराम भरत अग्रज।
अनंत बह्मांडाग्रज।।

श्रीराम नाम रसायन।
हनुमान नित्य गायन ।।
उड्डाण सहस्त्र योजन।
अमरमुक्त दशानन ।।

श्रीराम गंगा धार।
अठरापुराणे सार।।
स्वरताल लय आधार।
दर्शना धाम चार ।।

श्रीराम व्रत वैकल्य।
ध्यानमग्नता कैवल्य।।
आचारिता वात्सल्य।
विरुनीजाई मनी शल्य।।

श्रीराम एक बाण।
संकटे धूळधाण ।।
रघुवंश हिच आण।
हे सत्य श्रेष्ठ जाण।।

श्रीराम क्षीरसागर।
क्षमादया आगर।।

मनामनात आदर।
'मनवा'प्रणाम सादर।।


**डॉ. मिलिंद इंदूरकर,**
नागपूर
९५५२६०७६४६

# 'शिरो मे राघवः पातु'

रामरक्षा स्तोत्र म्हणजे मानवी जीवनाला दिशा देणारे आहे. रामरक्षा स्तोत्र रचणाऱ्या बुधकौशिक ऋषींनी श्रीरामाच्या विविध नावांचे स्मरण करून शरीराच्या विविध भागाचे रक्षण व्हावे, अशी प्रार्थना केली आहे. त्यात 'शिरो मे राघवः पातु' म्हणजे 'माझ्या मस्तकाचे रक्षण राघवाने करावे.' अशी प्रार्थना केली आहे. शिराचे म्हणजेच विचारांचे, विवेक बुद्धीचे आणि निर्णयशक्तीचे रक्षण राघवाने करावे, असे आळवले आहे.

रघुवंशाचा गौरव वंशातील राजांची धर्मनिष्ठा आणि प्रजेचे सात्विक जीवन यामुळेही होता. राजा रघु यांच्या दानशीलतेचा एक प्रसिद्ध प्रसंग सांगितला जातो. यज्ञानंतर त्यांनी सर्व धन दान केले होते. त्याच वेळी एका ब्राह्मणाने गुरुदक्षिणेसाठी १४ हजार सुवर्णमुद्रा मागितल्या. राजकोष रिकामा असतानाही राजा रघु त्याला निराश करायला तयार नव्हते. ते देवांच्या कोषाध्यक्षाकडे म्हणजे कुबेर यांच्याकडे जाण्यास निघाले. रघु युद्धासाठी निघाले, हे कळताच कुबेरांनी अयोध्येवर सुवर्णाचा वर्षाव केला.

परंतु या कथेत आणखी एक महत्त्वाचा संदेश आहे. अयोध्येवर सुवर्णाचा वर्षाव झाला, तरी त्या काळातील प्रजा इतकी सात्विक आणि समाधानी होती की प्रत्येकाने आपल्याला जितके आवश्यक आहे तितक्याच सुवर्णमुद्रा घेतल्या आणि



उरलेले तसेच ठेवून दिले. लोभ नव्हता, स्वार्थ नव्हता; कारण समाजाच्या मनामध्ये धर्म आणि समाधान होते. म्हणजेच विवेकबुद्धी जागृत होती.

आजच्या काळात मात्र अनेकदा उलट चित्र दिसते. एखादी सवलत मिळाली किंवा एखादी वस्तू कमी दरात मिळणार आहे, असे कळले की काही लोक गरजेपेक्षा जास्त वस्तू साठवण्याचा प्रयत्न करतात. आत्ताचे उदाहरण म्हणजे गॅस सिलेंडर किंवा इतर आवश्यक वस्तूंच्या बाबतीतही साठेबाजी होताना दिसते.

आज जगात अनेक ठिकाणी युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असताना संसाधनांचा संयमाने वापर करणे, समाजाचा विचार करणे आणि प्रामाणिकपणे वागणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. देशाची शक्ती केवळ शासनावर अवलंबून नसते; ती जागरूक, संयमी आणि जबाबदार नागरिकांवरही अवलंबून असते. म्हणूनच 'शिरो मे राघवः पातु' ही प्रार्थना केवळ रक्षणाची नाही; तर ती आपल्या विचारांना धर्म, संयम आणि विवेकाची दिशा मिळावी, अशी प्रार्थना आहे.

जर समाजात पुन्हा एकदा ही मूल्ये जागृत झाली, तर आजच्या काळातही रामराज्याची अनुभवता येईल. म्हणूनच श्रीरामाला प्रार्थना करूया की तुझ्यासारखे रामराज्य येण्यासाठी आम्हा सगळ्यांची विवेक बुद्धी जागृत ठेव. मी आणि माझे या पुढे जाऊन राष्ट्र, धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाचे विचार आम्हाला दे.

**रेवती भट**

# देव व देश भक्तीचा मिलाफ 'वारकरी

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सवात स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज, अमरावती येथे २० वे नाटक 'वारकरी ' भक्तिमय वातावरणात सादर झाले. पंढरीचा पांडुरंग शिंदे घरात निर्जल एकादशीला जलाभिषेकात भिजत देव व देश भक्तीचा मिलाफ दर्शविणारे नाटक.**



दादा महाराज पंढरीला दिंडी घेऊन जातानाचा सोहळा. बहिण रखमाइचे वाड्यात दिंडीचे परंपरेनुसार होणारे स्वागताची तयारी. वाड्यातील भक्तिमय वातावरणात रखमाई व शेजारीण तसेच दादा महाराज व पत्नी, मावशी, अनुश्री घर गडी अशा सर्वांच्या उत्सव उत्साहात पोलिस सायरनच्या ताफ्यात साहेब आले! साहेब आले!! घर गडी माधवची सूचना, तोच पोलिस अधिकारी खाक्यात होणारी एन्ट्री म्हणजे पोलिस निरीक्षक राणोजी शिंदे.

आप्पा साहेबांचा वाडा, त्यात पंढरीचे वारकरी, म्हणून दरवर्षी दिंडी जाण्याची प्रथाप्रीत्यर्थ दादा महाराजांचे स्वागत, पालखी सोहळा, पादप्रक्षालन सुरू असताना राणोजी शिंदे यांच्या प्रवेशाने सर्व मांगल्य अमांगल्य होत असलेला प्रसंग. राणोजीचा वारीला प्रचंड विरोध, पांडुरंगाचा काळासारखा क्रोध करणारा अधिकारी म्हणून राणोजी शिंदेंची भूमिका, त्यांना सहधिकारी खंडेतोड व महिला अधिकारी माहूरे एस सर!! नो सर!! करीत वारीवर लक्ष ठेवत; वारकऱ्यांच्या ताफा हद्दीबाहेर जाईस्तोवर कर्तव्य कटाक्ष.

निर्जल एकादशीला रस्सेदार मटण खाण्याचा बेत रखमाईवर पति हक्क लादून पोलिस अधिकारी राणोजी शिंदे मुद्दाम करीत असलेले कृत्य. दादा महाराजांचा अपमान देवाचे द्वारी उभा क्षणभरी म्हणत वारी निघते. जगतापचां फोन भारदाव वेगात ट्रकने वारकरी चिरडले. दादा महाराज दिंडीत असल्याने या अपघातात गेल्याची शंका. मावशी मटण बाहेर फेक सांगत भगर आमटीची ताकद वर भाष्य. बोलावा विठ्ठल करावा विठ्ठल गीत. पुढे भूपाळी व ओळी 'तुळशीचे बनी '...रखमा उंबरठा घासते वारीला जाऊ न दिल्याने मनातील हळहळ व दादा महाराज सुरक्षित असल्याचा संदेश मिळतो. मात्र राणोजींचा दरारा मटण खाण्यासाठी येणार म्हणून मावशी शिंदे नरसिंव्ह असल्याने फाडून खाईल अशी भीती. मात्र रखमाई आपल्या आत्मविश्वासाने राणोजीला भगर आमटी, फलाहार देव्हाऱ्याजवळ बसून खाऊ घालते; तेव्हा तिची अस्सखल इंग्लिश मराठमोळ्या नववारीतील महिल्याच्या उच्चभ्रू घराण्याची ओळख रुबाबदार दिसते. ट्रकने केलेल्या अपघाताची बातमी कळताच शिंदे उठून फोन वर



आरोपींना धमकी, खासदाराला लेखी आदेश मागून अधिकार पदाचा प्रामाणिक कर्तव्य दक्ष म्हणून दरारा. हरी पाटलांचे राजकारण वारीनिमित्त दिसते. गोवंशाचे ट्रकसाठी जेवण सोडून जाताना ट्रकचे सुगाव लागत नाही तोवर पाणी घेणार नाही हा प्रण. वकिलवेशात बहिण वसुदा मावशीसाठी पातळ आणून वाड्यातील निम्मे हिस्सा काबीज करण्यासाठी राणोजीकडून सहीसाठी 'सही मौके की तलाश'. रखमाई व वसुधाचे अनुबंध छान, मावशीच्या इस्टेटित सुद्धा हिस्सा सांगत, वारीला रखमाईला जाऊ न दिल्याने वसुधा दादाचे स्वभावबद्दल स्पष्टता. राणोजी बहिणीला वाडा नावे करून देताच सर्व कसे खिन्न व उद्यापासून पोलिस मुख्यालयात आवास म्हणून बहिणीला सह्या करून देतो. बहिण आनंदाने नाचते, रखमाई देव पाण्यात ठेऊन अभिषेक करते. द्वंद प्रसंग वसुधेचा आनंद व रखमाईचा शोक. बहिण भावाचे संबंध अहंकाराची जागा. राणोजी मावशबहीण अनुश्रीला आयपिसची तयारी करायला सांगत. विठ्ठलाचे या घरातून विस्थापन करताना मूर्ती फोडण्याचा प्रयत्नात नाटकाचे मध्यंतर. सर्व वाडा दुमदुमत राणोजीचा क्रोध व्यक्त होते.

**एक टक नाटक**
**समीक्षण**

रखमाई वाडा सोडून जाते. गृहमंत्र्याची होणारी सून युवा कार्यकर्ता वारीचे राजकारण करीत राणोजीचे घरावर मोर्चा आणते, वाडा गेला, रखमाई गेली, निलंबनाचे पत्र अशा प्रवाहात राणोजी खिन्न व विठ्ठलाशी संवाद करताना आप्पा साहेब वडिलांची आठवण. वारीतट्रकने चिरडल्याचे भयानक दृश्य उभे करताना घ्झ्ए चे स्वप्न व वडिल पांडुरंगाने हिरावले. ज्या बापाने चराचरात वास्तवनारा देव सांगितला. त्याची लहानपणापासून भीती त्यामुळे सत्य कबुलीचे संस्कार. विठ्ठलास अभिषेक घालण्यासाठी राणोजी बसतात. निर्जला एकादशीची रात्र पांडुरंग सोबत बोलत घडणारे चमत्कार रखमाई परत, ट्रकचे ड्रायव्हरची पत्नी साक्षीदार, वसुधा मामला तयार करण्यासाठी भावाचे मदतीला, सर्व काही आपसूक घडत विठ्ठल भक्तीचे प्राधान्य नाटकात झळकते. पुन्हा पुरवत स्थिती वारी सुखरूप, विठ्ठल पूजेचा पहिला मान पोलिस अधिकारी राणोजी शिंदे यांना सरकारदरबातून आदेशान्वये प्राप्त. पंढरीला वर्दी त्यागून वारकरी वेशात पांढरीची दिंडी पालखीचे जल्लोषात नाना महाराजाचे वाड्याद्वारी दर्शन देणारे नाटक म्हणजे देव व देश भक्तीचा मिलाफ. नाटकाचा क्लायमॅक्स भक्तीची कर्तव्यावर मात, वडिलोपार्जित परंपरेत समरस होऊन आनंदाचे क्षण अनुभवात येणारी 'वारकरी'परंपरा. उणेवावर उंगलीनिर्देशन-नीटनेटके नेपथ्य अॅड.प्रशांत देशपांडे यांनी साकारताना प्लास्टिक फुलांची सजावट, एक चोवीस तासात घडलेल्या घडामोडीत कुठेच कोमेजली नाही. अर्थात वाडा व तत्कालीन काळ बघता फुले मुबलक. प्रॉपर्टीत रांगोळीला प्लास्टिक डब्याचा वापर, विवाहित रखुमाईचे पाय जोडव्यावाचून, राणोजी केसांवरून हात फिरवताना (विठ्ठल संवादात एकाग्र असताना) कुठला पॅच भरत होते? शिवाय फोनवर (कधीच बेल, व्हायब्रेशन न झालेल्या) पाय आपटून खासदारला सुद्धा सलामी देणारा अधिकारी. संवादाची फेक फारच वेगवान असल्याने मावळ व भावनिक जागा हलक्याशा घसरल्याने सहकलावंताचे संवाद डीम होत घरात रणांगण. नाना महाराजमध्ये विठ्ठल प्रत्यक्ष बघण्याची वाट दर्शक पाहत होते. प्रकाश योजनेत गायत्री गुडधे योग्य, प्रथमेश पूर्भे हे जिवंतसंगीत देत वारकरी थाट भरू शकला नाही, वारकरी टाळटाळून चपटा टाळ. मृदंग नादातील भजने तबल्यावर डोलली नाही. पार्श्वध्वनि तेवढे प्रसंग उमटवीत होते. दिंडीने चौथी भिंत फोडून प्रायोगिक व एपिक थिएटर ची चुणूक.

उत्तम नाटक म्हणून लेखक व दिग्दर्शक दस्तुरखूद्द डॉ. चंद्रकांत शिंदे यांनी राणोजी शिंदे साकारत, रिया गीते रखुमाई, मावशी रुचिता खेडकर, दादा महाराज डॉ. मनीष गायकवाड, वाहिनी किर्ती बहादूरे, वसुधा निर्मिती गणवीर, अनुश्री शेटे, नानामहाराज समीर पंत ताईसाहेब तेजल काळमेघ, सहायक पोलिस निरीक्षक कौशल खंडेतोड, समृद्धी माहूरे, अशा एकूण तेवीस कलावंत सोबत घेऊन कामगार कल्याण केंद्र अकोटने हौशी नाट्य स्पर्धेत दर्शकांना पर्वणी दिली. एक टक नाटक बघताना प्रेक्षकांना जागोजागी दाद व प्रतिसाद मिळवून देणारे प्रत्येक वारकरी केल्याची प्रचिती दीर्घांक वेळेत अनुभवली.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# अकोला मनपासाठी ६०१ कोटींच्या स्वहिस्स्यासाठी राज्याकडे मदतीची मागणी

## अमृत २.० व सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनांतील कामांना गती देण्याचा प्रयत्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

*केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानासह राज्यातील सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांसाठी अकोला महानगरपालिकेला भरावयाच्या ३० टक्के स्वहिस्स्याची रक्कम राज्य शासनाने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.*



अकोला महानगरपालिकेअंतर्गत मलनिस्सारण योजना (टप्पा-१) साठी ६२९ कोटींचा प्रकल्प मंजूर असून त्यात मनपाचा हिस्सा १८८.७० कोटी रुपये आहे. तसेच वाढीव पाणीपुरवठा योजना (टप्पा-१) साठी २२१ कोटींचा प्रकल्प मंजूर असून त्यात मनपाचा हिस्सा ६६.३० कोटी रुपये आहे. याशिवाय वाढीव पाणीपुरवठा योजना (टप्पा-२) (५५१ कोटी) व मलनिस्सारण योजनेअंतर्गत रस्ते दुरुस्ती व पुनर्बांधणी (टप्पा-२) (६५५ कोटी) या प्रस्तावित योजनांना मंजुरी आवश्यक आहे.

या सर्व योजनांसाठी महानगरपालिकेला एकूण सुमारे ६०१.८० कोटी रुपयांचा स्वहिस्सा भरावा लागणार आहे. मात्र, मनपाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने ही रक्कम भरणे शक्य नसल्याचे सावरकर यांनी नमूद केले आहे. त्यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने हा स्वहिस्सा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी त्यांनी विनंती केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांबद्दल खासदार अनुप धोत्रे व आमदार रणधीर सावरकर यांचे महापौर शारदा खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल व उपमहापौर अमोल गोगे यांनी आभार मानले आहेत.

# प्राचीन श्रीराम मंदिरात आज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■



अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कुंभारी गावातील अतिशय प्राचीन व जागृत श्रीराम मंदिरात यंदा रामनवमीचा उत्सव अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे. २६ मार्च २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार आहे. गावाच्या आस्था आणि श्रद्धेचे केंद्र असलेल्या या मंदिरात रामनवमीच्या पावन दिवशी सकाळी १२ वाजता भगवान श्रीराम, लक्ष्मण आणि माता सीता यांच्या मूर्तींचे विधीवत पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर सामूहिक आरती होऊन भक्तांना आध्यात्मिक आनंदाचा दिव्य अनुभव घेता येणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. रामनवमीच्या निमित्ताने मंदिराची आकर्षक व देखणी सजावट करण्यात आली असून, दिव्यांच्या रोषणाईत नटलेले मंदिर भक्तांना अक्षरशः भावविश्वात घेऊन जाणारे ठरत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही परिसरातील तसेच दूरवरून भाविक मोठ्या संख्येने येथे दर्शनासाठी येत असून, भक्ती, श्रद्धा आणि एकात्मतेचे सुंदर चित्र या ठिकाणी पाहायला मिळत आहे. 'रामनवमी हा केवळ सण नसून श्रद्धा, संस्कार आणि एकतेचा उत्सव आहे. या पावन प्रसंगी प्रत्येकाने श्रीरामाच्या आदर्शांचा अंगीकार करून जीवन समृद्ध करावे,' अशी भावनिक साद श्री रामनवमी उत्सव समिती व कुंभारी गावकरी मंडळी यांनी घातली आहे.

# संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यास मंजुरी

## एप्रिल ते जून दरम्यान अडीचशे गावांसाठी २९९ उपाययोजना

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. एप्रिल ते जून दरम्यान अडीचशे गावांसाठी २९९ उपाययोजनांचा समावेश असून, कामे वेळेत पूर्ण व्हावीत. कुठेही टंचाई उद्भवणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत.

टंचाई आराखड्यात जानेवारी ते मार्च, तसेच एप्रिल ते जून दरम्यान सर्व कामे मिळून २६२ गावांसाठी ३१४ विविध उपाययोजना व त्यासाठी चार कोटी २७ लक्ष ४० हजार रू. च्या संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे.

जानेवारी ते मार्चदरम्यान १२ गावांसाठी १५ उपाययोजनांचा समावेश करण्यात आला. आराखड्यात अकोला तालुक्यातील १६, बार्शीटाकळी तालुक्यातील ६७, बाळापूर तालुक्यातील २३, पातूर तालुक्यातील ५६, मूर्तिजापूर तालुक्यातील ३९, अकोट तालुक्यातील ३३ व तेल्हारा तालुक्यातील २८ अशा एकूण २६२ गावांचा समावेश आहे. विहिर अधिग्रहणाची १२७, विहीर खोलीकरण, गाळ काढणे ९, नळयोजना विशेष दुरूस्ती १०, विंधनविहीर विशेष दुरूस्ती ९२, नवीन विंधन विहीर ४६, कूपनिका २६, रिचार्ज शाफ्ट, नाला खोलीकरण ४ अशी एकूण ३१४ कामे आहेत.

नळयोजना विशेष दुरूस्तीच्या कामांमध्ये अकोला तालुक्यातील यावलखेड, चाचोंडी, आगर, गांधीग्राम, रोहणा, पातूर तालुक्यातील बाभुळगाव, भंडारज बु., बाळापूर तालुक्यातील अंत्री मलकापूर, वझेगाव, मूर्तिजापूर तालुक्यातील माना येथील नळयोजनेचा समावेश आहे. नळयोजना विशेष दुरूस्तीसाठी १ कोटी ५६ लक्ष ८१ हजार ४३८ रू. निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

# कोषागारे ३१ मार्चला सुरू राहतील

■ प्रतिनिधी | अकोला ■

आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने सार्वजनिक सुट्टी असली तरीही भारतीय स्टेट बँक, कोषागार कार्यालय व उपकोषागार कार्यालये मंगळवारी (३१ मार्च) सुरू ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत.

आर्थिक वर्षातील ३१ मार्च हा शेवटचा दिवस आहे. त्यादिवशी महावीरजयंतीची सार्वजनिक सुट्टी आहे. मार्चअखेरीस शासनाचा निधी अखर्चित राहू नये व शासनाच्या जमा-खर्चाचे आर्थिक व्यवहार सुरळीत व त्याचरोजी पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय स्टेट बँक, कोषागार कार्यालय, उपकोषागार कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**Change In Name**

I have Change
My Name From
**PUJA GUNVANT BHORE**
-To-
**POOJA CHETAN KAKAD**
Address - Renuka Nagar
Borgaon Manju Tq
Dist.-Akola 444102

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३९५/२०२६ प्रोसेस नं.३९७५/२०२६
चौ.ता. २७/०४/२०२६ दिनांक : २०/०३/२०२६

**अर्जदार :** १. संजय शांतीलाल मंत्री २. प्रतिक संजय मंत्री ३. शिवम संजय मंत्री सर्व रा. गीता नगर, लेन नं. २, गोल्ड जीम जवळ, बायपास रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ज्योती संजय मंत्री
**पत्ता :-** रा. गीता नगर, लेन नं. २, गोल्ड जीम जवळ, बायपास रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्योती संजय मंत्री यांचे दि. ०३ / ०१ / २०२६ रोजी गीता नगर, बायपास रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# सामाजिक न्याय योजनांच्या छायाचित्र प्रदर्शनाचा शुभारंभ



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा माहिती कार्यालयातर्फे सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाच्या सहकार्याने सामाजिक न्याय योजनांचे प्रदर्शनाचा शुभारंभ येथील उपविभागीय कार्यालय (तहसील) येथे आज झाला. शासनाकडून अनुसूचित जातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी गोपाळ वाघमारे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, तहसीलदार कुणाल झाल्टे, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार आदी यावेळी उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची नागरिकांना थेट माहिती व मार्गदर्शन मिळत असल्याने प्रदर्शन उपयुक्त आहे. अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी केले. सामाजिक न्याय योजनांची माहिती एकाच छताखाली मिळत असल्याने नागरिकांसाठी माहितीपूर्ण प्रदर्शन आहे, असे प्रतिपादन श्री. वाघमारे यांनी केले. श्री. पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

छायाचित्र प्रदर्शनामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती छायाचित्रे, माहिती फलक व दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात आली आहेत. अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांसाठी शिक्षण, स्वयंरोजगार, निवास व आर्थिक सहाय्य योजनांविषयी मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात येत आहे. हे प्रदर्शन दि. २७ मार्चपर्यंत सर्वांसाठी खुले असून, अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांनी छायाचित्र प्रदर्शनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**ADIBA AKBAR ALI**
-- TO --
**ADIBA ALI AKBAR HUSAIN ALI**
My Residential Address
is - Opposite
Radhakishan Talkies
Rajiv Gandhi Nagar
Toshniwal Layout Akola
MH 444001.

**Change In Name**

I Have Change My Name
in My Passport No is
(N9620897) From
**DAWOOD KHAN**
-- TO --
**DAWOOD KHAN NOORUL LATEEF KHAN**
My Residential Address
is - Lal Bangla Baidpura
Akola MH 444001.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर सुचना**

दि.२५.३.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार हे सौ. शोभा रमेशचंद्र गट्टाणी यांचे कडून त्यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे अकोला ता. जि. अकोला येथील नझूल शीट नं २६-ए, नझूल प्लॉट प्लॉट नं ९ पैकी क्षेत्रफळ २२३२ चौ फुट (२०७.७४ चौ मी.) एवढी खुली जागा व ११३२ चौ फुट (१०५.२९ चौ मी.) ज्यावरील ७४.३४ चौ मी चे गोडाऊन बांधकामासह, ज्यास एकत्रित चतुःसीमा: पुर्वेस : नया जिन रोड, पश्चीमेस: साजिद खान व जनता टाईल्स यांची मिळकत, उत्तरेस: रास्ता, दक्षीणेस: मोहम्मद जाफर व शशिभाई मोरारजी यांची मिळकत, अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मो : ९८२३०९१३७७

**जाहीर सुचना**

दि.२५.३.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, मे. विठ्ठलअपर्ण अग्रोटेक यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे शिवणी ता. जि अकोला येथील एम. आय. डी. सी. प्लॉट नं यू-१० क्षेत्रफळ ८००० चौ मी. बाबतचा दि १३.७.२०२५ दस्त क्र. १७३३ हा भाडेपट्टा करारनामा हरवला/अनावधानाने गहाळ झाला आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर पो स्टे, येथे रीपोर्ट दीला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मो : ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४६८/२०२६ प्रोसेस नं.४१२७/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ दिनांक : २४/०३/२०२६

**अर्जदार :** १. मनकर्णा भगवान गोपनारायण २. राहूल भगवान गोपनारायण ३. मिलिंद भगवान गोपनारायण क्र. १ ते ३ रा. घुसर, ता. जि. अकोला. ४. शोभा शिवसागर शिरसाट रा. वार्ड क्र. २, हिंगणी बु. (दहिहांडा), ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भगवान हिरामन गोपनारायण
**पत्ता :-** रा. घुसर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भगवान हिरामन गोपनारायण यांचे दि. ०२/०५/२०२२ रोजी राहते घरी घुसर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४४१/२०२६ प्रोसेस नं.३६३७/२०२६
चौ.ता. २७/०४/२०२६ दिनांक : १६/०३/२०२६

**अर्जदार :** १. नुरूस्साहर शकील अहमद खान २. सराह शकील अहमद खान ३. मसिरा शकील अहमद खान सर्व रा. मेहबुब मंजिल, सारा अपार्टमेंटच्या मागे, मोमीनपुरा, कलाल की चॉल, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शकील अहमद खान गुलाम मेमबुब खान
**पत्ता :-** रा. मेहबुब मंजिल, सारा अपार्टमेंटच्या मागे, मोमीनपुरा, कलाल की चॉल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शकील अहमद खान गुलाम मेमबुब खान यांचे दि. २७/०१/२०२६ रोजी राहते घरी मेहबुब मंजिल, सारा अपार्टमेंटच्या मागे, मोमीनपुरा, कलाल की चॉल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९३/२०२६ प्रोसेस नं.१७६१/२०२६
चौ.ता. ०१/०४/२०२६ दिनांक : ०९/०२/२०२६

**अर्जदार :** १. मंगेश नारायण पाचपोर रा. वर्धमान नगर, रिंग रोड, बी ४ यु कंम्प्युटर जवळ, कौलखेड, अकोला ता. जि. अकोला २) सौ. निलिमा मनिष वाकोडे, रा. ११ बी, रजनी वाटिका, दिपाली नगर, मलकापूर, अकोला ता. जि. अकोला ३) सौ. रुपाली उमेश महल्ले रा. आलेगाव, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कल्पना नारायण पाचपोर
**पत्ता :-** रा. अभंग नगरी, वर्धमान नगर, कौलखेड, अकोला ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कल्पना नारायण पाचपोर यांचे दि. १६/०५/२०२२ रोजी अभंग नगरी, वर्धमान नगर, कौलखेड, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४७३/२०२६ प्रोसेस नं.४१२२/२०२६
चौ.ता. २९/०४/२०२६ दिनांक : २४/०३/२०२६

**अर्जदार :** १. अंतकलाबाई अजाबराव गवई रा. व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला. २. जिवनकला मोहन रूपनारायण रा. शिवणी, अकोला, ता. जि. अकोला. ३. सुवर्णकला कैलाश बागडे रा. बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. ४. रत्नकला विजय सदार रा. रेणुका नगर, डाबकी रोड, ता. जि. अकोला. ५. मुकुंदा शालीग्राम जगताप ६. पंकज शालीग्राम जगताप अर्जदार क. ५ व ६ रा. शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शालीग्राम बाबुसा जगताप
**पत्ता :-** रा. शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शालीग्राम बाबुसा जगताप यांचे दि. १३/०२/२०२६ रोजी शिवणी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४११/२०२६ प्रोसेस नं.३९७७/२०२६
चौ.ता. २७/०४/२०२६ दिनांक : २०/०३/२०२६

**अर्जदार :** १. लीला प्रकाश लाखपुरकर रा. गट क. ४५८, प्लॉट क्र. ७४ बी, संत ज्ञानेश्वर नगर कॉलनी क. १, गंधर्व नगरी, मोशी, पुणे. ता. जि. पुणे. २. रवि प्रकाश लाखपुरकर ३. किरण प्रकाश लाखपुरकर ४. रोशनी प्रकाश लाखपुरकर क. २ ते ४ व्दारा जि.टी. सरोज, रा. शुभम सुपर मार्केट जवळ, शिव गणेश नगर, धावडी वस्ती, भोसरी, पुणे. ता. जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रकाश नारायण लाखपुरकर
**पत्ता :-** रा. गट क्र. ४५८, प्लॉट क्र. ७४ बी, संत ज्ञानेश्वर नगर कॉलनी क्र. १, गंधर्व नगरी, मोशी, पुणे. ता. जि. पुणे.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश नारायण लाखपुरकर यांचे दि. १३/१२/२०१७ रोजी डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४३०/२०२६ प्रोसेस नं.३७०१/२०२६
चौ.ता. २८/०४/२०२६ दिनांक : १७/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सुमेधा सुधाकर देशपांडे रा. श्रीराम, समाज मंदिर हॉल च्या मागे, खेडकर नगर, अकोला, ता. जि. अकोला. २. सुजित सुधाकर देशपांडे रा. एफ-२०१, वेंबली इस्टेट, रोझवुड सिटी, सेक्टर ४९-५०, गुरूगाव, इस्लामपुर ९७. गुरूगाव साउथ सिटी ली, गुरगाव, हरयाणा, ३. सुबोध सुधाकर देशपांडे रा. फ्लॅट नं. ९०२, ए विंग, स्वस्तिक एएलपीएस सीएचएस. ब्रम्हांड पाटलीपाडा रोड, ऑर्किड इंटरनॅशनल शाळेसमोर, ठाणे वेस्ट, जि. ठाणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुधाकर गोपालराव देशपांडे
**पत्ता :-** रा. श्रीराम, समाज मंदिर हॉलचे बाजुला, खेडकर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुधाकर गोपालराव देशपांडे यांचे दि. २४/१०/२०२४ रोजी जि गुरूग्राम राज्य हरियाणा येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सुचना**

दि.२५.३.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, श्री केशवराव भगवानराव इप्पर,

यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे शिवणी ता. जि अकोला येथील सर्वे क्र ८२ मधील, मंजूर लेआऊट प्लॉट क्र २२, क्षेत्रफळ २७९ चौ मी. बाबतचे दि १७.६.१९८८, दस्त क्र. ३०२३ हे मुळ खरेदीखत हरवला/अनावधानाने गाळ झाला आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मो : ९८२३०९१३७७

**जाहीर सुचना**

दि.२५.३.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार हे श्री केशवराव भगवानराव इप्पर, यांचे कडून त्यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे शिवनी ता. जि. अकोला, येथील सर्वे क्र ८२ मधील, मंजूर लेआऊट प्लॉट क्र २२, क्षेत्रफळ २७९ चौ मी., ज्यास चतु:सीमा: पुर्वेस : सर्व क्र ८२ मधील जमीन, पश्चीमेस: प्लॉट क्र २१, उत्तरेस: ९ मीटर रोड, दक्षीणेस: सर्व क्र ८० मधील जमीन, अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही ही संबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मो : ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४२८/२०२६ प्रोसेस नं.३५३१/२०२६
चौ.ता. २३/०४/२०२६ दिनांक : १२/०३/२०२६

**अर्जदार :** १. दिनकर मनोहर दिपके २. प्रवीण दिनकर दिपके ३. माधुरी दिनकर दिपके लग्नानंतरचे नाव - माधुरी पंकज लेंदे सर्व रा. गल्ली नं. ३, गुरूदेव मार्ग, मारोती मंदिराजवळ, वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आशा दिनकर दिपके
**पत्ता :-** रा. गल्ली नं. ३, गुरूदेव मार्ग, मारोती मंदिराजवळ, वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आशा दिनकर दिपके यांचे दि. १४/१२/२०२५ रोजी गुरूदेव नगर, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# साखर कारखान्यांच्या आर्थिक सहाय्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत

**मुंबई/ जनमाध्यम**
राज्यातील साखर उद्योग हा महत्त्वाचा उद्योग असून त्याच्या आर्थिक सहाय्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर मुख्य सचिवांनी तातडीने समिती गठीत केली आहे. गठित समितीला स्वयंस्पष्ट अहवाल त्वरीत सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवनात साखर उद्योगाच्या प्रश्नांसंदर्भात आयाजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना निर्देशित केले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य सचिव राजेश कुमार, राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष प्रताप ओहोळ, सर्वश्री आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. विनय कोरे, राजेश टोपे, विक्रम काळे, अभिमन्यू पवार, अभिषेक पाटील, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनासकर, साखर संघाचे संचालक जयप्रकाश दांडेगावकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील साखर कारखान्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेता येत्या गाळप हंगामाची व्यापक प्रमाणात सुरवात होण्याच्या दृष्टीने साखर कारखान्यांना शक्य ते आर्थिक सहाय्य करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात यावा. यासाठी मुख्य सचिवांनी



### समितीकडून अहवाल घेणार - मुख्यमंत्री

राज्यस्तरीय समितीचे गठन करावे, त्यामध्ये सहकार, कृषी, वित्त विभागाचे सचिव, साखर आयुक्त, उद्योग सचिव आणि राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक यांचा समावेश करावा. या समितीने तातडीने साखर कारखान्यांना येणाऱ्या अडचणी, समस्यांचे स्वरुप, त्याच्या निवारणाचे उपाय, पर्यायी व्यवस्था या अनुषंगाने सखोल अभ्यास करुन अहवाल सादर करावा. त्याच्या माध्यमातून साखर उद्योगासाठीचे पॅकेज राज्य शासनास करता येईल. तसेच मोठ्या गुळ व खांडसारी प्रकल्पांकरिता राज्य शासनाची नियमन प्रणाली असणे आवश्यक आहे. यासाठीची नियमावली तयार करावी त्याचा मसुदा येत्या पंधरा दिवसात सादर करावा. साखर कारखान्यांच्या अडचणी दूर करुन साखर उद्योगाच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सकारात्मक भूमिकेत आहे.

त्यासोबतच केंद्र शासनाकडून साखर उद्योगाला आवश्यक ते सहाकार्य, सवलती मिळण्याच्या दृष्टीने साखर कारखाना संघाच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळासोबत तातडीने केंद्र शासनासोबत बैठकीची वेळ घेऊन चर्चा करण्यात येईल. राज्य शासनासोबतच केंद्राकडून ही साखर कारखान्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सहाय्य मिळवण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्न करेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, ऊर्जा विभाग अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, वित्त विभाग प्रधान सचिव सौरभ विजय, सहकार आयुक्त दिपक तावरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विनामूल्य अल्पमुदतीच्या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा-** जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विनामुल्य अल्पमुदतीच्या विविध अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यता आले आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांनी प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये भेट देऊन प्रवेश निश्चित करावा व एमएसबीएसव्हीईटी कडून प्रमाणपत्र प्राप्त करावे. सदरच प्रशिक्षण विनामुल्य असुन रोजगार व स्वयरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी लाभदायक आहे. समुद्रपुर व सेलू येथील शासकीय औधोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये डिजीटल मित्रा अभ्यासक्रम, आष्टी येथे प्लंबर जनरल अभ्यासक्रम, वर्धा येथे लाईट मोटर व्हेईकल ड्रायव्हर व डिजीटल मित्रा अभ्यासक्रम, आर्वी येथे सेल्फ एम्प्लॉईड टेलर व लाईट मोटर व्हेईकल ड्रायव्हर, हिंगणघाट येथे डिजीटल मित्रा व सेल्फ एम्प्लॉईड टेलर, कारंजा येथे सोलर पीव्ही इन्स्टॉलेशन व देवळी येथे लाईट मोटर व्हेईकल ड्रायव्हर व डिजीटल मित्रा अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

### अल्पवयीनाकडून नशिल्या पदार्थांची विक्री

**हिंगणघाट -** पोलिसांनी गांजा विक्री करताना १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गांजा, मोबाईल व रोख रक्कम असा २४ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संत चोखोबा वॉर्डातील टाकाग्राउंड परिसरात गांजाची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. कारवाईदरम्यान संशयिताला रंगेहात पकडण्यात आले. तपासात या अल्पवयीनाला गांजा पुरवणारा राकेश उर्फ भुऱ्या जनबंधू असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### विषारी औषध प्राशनाने इसमाचा मृत्यू

**वर्धा –** पिंपळगाव (भोसले) येथे विषारी औषध प्राशन केल्याने एका इसमाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. खुशाल सुधाकर नेहारे (वय ४३, रा. पिंपळगाव (भोसले), ता. आर्वी) असे मृताचे नाव आहे. माहितीनुसार, खुशाल नेहारे यांनी २ मार्च रोजी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले होते. त्यांची प्रकृती गंभीर झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. काही दिवस उपचार सुरू असतानाही त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. अखेर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर **N9621959** वरील माझे **MOIUDDIN FIROZBHAI NAGANI** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **MOHIN MO FIROZ NAGANI** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
-:पत्ता:-
फाजलाणी लेआऊट
आर्णी, यवतमाळ ४४५१०३

# दारू माफियांचा संत तुकाराम वार्डात हैदोस

## महिलांवर अश्लील टिप्पण्या, पोलिसांच्या निष्क्रियतेवर संताप



**वर्धा/ जनमाध्यम**
संत तुकाराम वार्ड परिसरात अवैध दारू विक्रेत्यांचा उच्छाद इतका वाढला आहे की, सामान्य नागरिकांचे जगणेच असुरक्षित झाले आहे. परिसरात खुलेआम दारू विक्री सुरू असून संबंधित विक्रेते दादागिरी करत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दारू पिण्यासाठी येणाऱ्या टोळक्यांमुळे वृद्ध, महिला, शालेय विद्यार्थी आणि विशेषतः तरुणींना रोज त्रास सहन करावा लागत आहे. महिलांवर अश्लील भाषेत टिप्पणी करणे, गलिच्छ वर्तन करणे असे प्रकार सर्रास घडत असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकारामुळे संत तुकाराम वार्डातील सामाजिक वातावरण ढासळले असून पालकांमध्येही प्रचंड चिंता व्यक्त होत आहे. नागरिकांनी वारंवार पोलिसांकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पोलिसांचा वचकच उरला नाही का असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. अखेर संतापाच्या भरात नागरिकांनी एकत्र येत रामनगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजय भुसारी यांना लेखी निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली. या निवेदनावर मीना कोरे, विद्या पांडे, मंगला भोयर, रिंकू पांडे, दीपा पांडे, रेखा किनकर, शारदा ठोंबरे, वनिता गावंडे, सोनू वाटकर, राकेश दंडारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, अवैध दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई करून परिसरात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करावी, अन्यथा नागरिकांचा संताप आणखी भडकण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# अफवांचा बाजार तापला

**वर्धा / जनमाध्यम**
महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवांनी जोर धरताच दुसऱ्याही दिवशी बुधवार सकाळपासून अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगाच रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

साठा मुबलक असल्याचे प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी वारंवार सांगूनही नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे.

**युनियन अध्यक्षांचे स्पष्टीकरण ; तुटवडा नाही**

रिपब्लिकन ट्रक टँकर ड्रायव्हर क्लीनर युनियन, महाराष्ट्रचे अध्यक्ष मोहम्मद शकील शेख यांनी स्पष्ट केले की, राज्यातील कोणत्याही डिपोमध्ये पेट्रोल व डिझेलची कमतरता नाही. HPCL, BPCL, IOCL, नायरा व रिलायन्स सारख्या कंपन्यांसोबत पुरवठा सुरळीत सुरू असून, टँकर चालक व ट्रान्सपोर्टर नियमित पणे काम करत आहेत.

**गर्दी टाळा; प्रशासनाचे आवाहन**

टँकर ड्रायव्हर क्लीनर युनियन, पेट्रोल पंप संचालक,




### दुसऱ्याही दिवशी पेट्रोल पंपांवर रांगाच रांगा
### साठा मुबलक असतानाही नागरिकांची गर्दी

पोलीस प्रशासन तसेच पुरवठा अधिकाऱ्यांकडून नागरिकांना वारंवार आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नका आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करू नका.

साठा मुबलक असल्याने घाबरण्याचे कोणतेही कारण नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

**अफवांमुळे निर्माण झाली भीड**

प्रत्यक्षात कुठेही तुटवडा नसतानाही अफवांच्या जोरावर नागरिक मोठ्या प्रमाणावर पेट्रोल पंपांकडे धाव घेत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीसह नागरिकांना स्वतःलाच त्रास सहन करावा लागत आहे.

**संयम बाळगण्याचे आवाहन**

संबंधित यंत्रणांनी नागरिकांना संयम राखण्याचे आणि केवळ गरज असल्यासच इंधन भरण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा ही अनावश्यक गर्दी परिस्थिती अधिक गंभीर करू शकते, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी **SHAHEENA TALAT ABDUL MAJID SIDDIQUEE** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **TALAT IRFAN SHEIKH** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
-:पत्ता:-
पटेल चौक एम जी रोड वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर **K8195961** वरील माझे **RONY JAMES** असे नाव होते. माझ्या आधार व मतदान कार्ड वरील **RONY JAMES KAKKANATTU** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
-:पत्ता:-
सावंगी मेघे वर्धा ४४२००१

# वर्धा व पुलगाव येथे रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राईव्ह

**वर्धा/ जनमाध्यम**
अल्पमुदत प्रशिक्षण आयटीआय स्टेप अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या इच्छुक बेरोजगार उमेदवारांकरीता तसेच जिल्ह्यातील १२ वी, आयटीआय, पदवीधर व डिप्लोमाधारक उमेदवारांकरीता पुलगाव व वर्धा येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचा उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वर्धा येथे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व पांडुरंग सदाशिव खानखोजे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पांडूरंग सदाशिव खानखोजे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे २७ मार्च रोजी व पुलगाव येथे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व हरदयाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने हरदयाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुलगाव येथे ३० मार्च रोजी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात नामांकीत कंपन्याच्यावतीने प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. इच्छुकां नी मुळ शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाण पत्रांसह मेळाव्यास उपस्थित राहावे, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी कळविले आहे.

# गो-स्लो आंदोलनानंतर सी-डेट फॅक्टरी तात्पुरती बंद करण्याचा निर्णय

**तळेगाव (शा.प.)/ जनमाध्यम**
येथील CDET फॅक्टरीत प्रहार युनियनशी संबंधित काही कामगारांनी केलेल्या गो-स्लो आंदोलनानंतर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे व्यवस्थापनाने १७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता लॉकआउट जाहीर केल्याची माहिती कंपनीच्या निवेदनातून देण्यात आली आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, ५ ते १३ मार्च दरम्यान काही कामगारांनी उत्पादनाच्या कामात जाणूनबुजून संथ गती ठेवून गो-स्लो आंदोलन केले. यापूर्वी २०२५ मध्ये व्यवस्थापन व कामगार यांच्यात वेतन सेटलमेंट करार झाला असून तो पुढील तीन वर्षांसाठी लागू आहे. मात्र, हा करार अस्तित्वात असतानाही प्रहार युनियनने नव्या आर्थिक व इतर मागण्या मांडल्या, ज्या कंपनीसाठी अमलात आणणे शक्य नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, १४ मार्च रोजी पहिल्या शिफ्टपासून संबंधित कामगारांनी उत्पादन विभागात प्रवेश करून काम बंद केले व धरणे आंदोलन सुरू केली. त्यांनी व्यवस्थापनाच्या सूचनांचे पालन करण्यास नकार देत अत्यावश्यक सेवा देखील थांबवल्या. तसेच, शिफ्ट संपल्यानंतरही फॅक्टरी परिसर सोडण्यास नकार देत आंदोलन सुरूच ठेवले, असे कंपनीने म्हटले आहे. या घटनांमुळे फॅक्टरी परिसरात असुरक्षित व तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस दलाला पाचारण करावे लागल्याचेही निवेदनात नमूद आहे. स्फोटक साहित्याशी संबंधित फॅक्टरी असल्यामुळे कामगार व परिसराची सुरक्षा लक्षात घेऊन व्यवस्थापनाने तात्पुरता बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सद्यस्थितीत निर्माण झालेला वाद कायदेशीर व सकारात्मक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न कामगार आणि व्यवस्थापन यांच्या बैठकीच्या माध्यमातून सुरू असल्याचे कंपनीने सांगितले आहे.



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ११८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# विदर्भस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात



**वर्धा/ जनमाध्यम**
जिल्हा क्रीडा संकुल, सिव्हिल लाईन्स येथे आयोजित विदर्भस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात पार पडली. विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

स्पर्धेच्या उद्घाटनाला सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष अटल बिहारी पांडे, उपाध्यक्ष डॉ. प्रवीण धाकटे, प्रदीप बजाज, गिरीश बरखेडे, सचिव ओम तिवारी, सहसचिव अमोल काळोकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. स्पर्धेतील अंडर १९ गटात रिया कोठारी (अकोला) हिने विजेतेपद मिळवले, तर पार्थ पवार (पुसद) उपविजेता ठरला. महिला खुल्या गटातही रिया कोठारी हिने विजेतेपद पटकावले. पुरुष खुल्या गटात जयेश कुलकर्णी (नागपूर) विजेता ठरला, तर रजत तोरास्कर (नागपूर) उपविजेता ठरला. ३९+गटात मनीष बत्रा (भंडारा), ४९+गटात समीर चाल्कुरे (नागपूर), ५९+ गटात जितेंद्र ताओरी (नागपूर) आणि ६४+ गटात एल. बी. राणा (नागपूर) यांनी विजेतेपद मिळवले. ३९+ दुहेरी गटात मनीष बत्रा व संदीप पुरंदरे यांनी विजय मिळवला. स्पर्धेचे आयोजन सचिव ओम तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडले. पंच, स्वयंसेवक व आयोजकांच्या सहकार्यामुळे स्पर्धा यशस्वी ठरली. या स्पर्धेमुळे खेळाडूंना चांगले व्यासपीठ मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# रस्ता की रणांगण

## विरुळ-आंजी मार्गाची दयनीय अवस्था; नागरिक संतप्त

**विरुळ (आकाजी)/ जनमाध्यम**
विरुळ ते आंजी या मार्गाची अवस्था सध्या अक्षरशः रणांगणासारखी झाली असून नागरिकांचे हाल अपार झाले आहेत.

या रस्त्याचे काम मागील काही दिवसांपासून संथगतीने सुरू असले तरी विरुळ ते विरुळ बसस्टॉपपर्यंत थोडेफार डांबरीकरण करून काम अर्धवट सोडण्यात आले आहे. परिणामी रस्त्यावर मोठमोठी गिट्टी उघडी पडून प्रवास धोकादायक बनला आहे.

या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, दुचाकीस्वार तसेच जनावरे ये-जा करतात.

मात्र उखडलेल्या गिट्टीमुळे चालणेही कठीण झाले असून अनेक किरकोळ अपघात घडल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

एखादे वाहन गेल्यानंतर उडणाऱ्या धुळीमुळे काही क्षणांसाठी समोरचे काहीच दिसत नाही, अशी परिस्थिती निर्माण होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खोलगट भाग असल्याने वाहन घसरून खाली जाण्याची भीती सतत जाणवते.

विशेष म्हणजे काम सुरू असताना देखील रस्त्यावर पाणी मारले जात नसल्याने धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

यामुळे आजूबाजूच्या शेतीपिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

वारंवार सूचना करूनही संबंधितांकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून योग्य डांबरीकरण करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आज मध्यरात्री हनुमान सवारी; चारशे वर्षांची अखंड परंपरा, हजारो भाविकांची उपस्थिती

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**
विदर्भातील धार्मिक परंपरांचा अद्वितीय वारसा जपणाऱ्या टाकरखेडा संभू येथील श्रीराम मठात यंदाही रामनवमी निमित्ताने मध्यरात्री निघणारी हनुमान सवारी शोभायात्रा भाविकांचे विशेष आकर्षण ठरणार आहे.२६ मार्च रोजी मध्यरात्रीनंतर २ वाजताच्या सुमारास ही पारंपरिक सवारी निघणार असून, हजारो भाविक रात्रभर जागून या दैवी सोहळ्याचे साक्षीदार होणार आहेत.रामनवमीच्या दिवशी दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव साजरा झाल्यानंतर 'विडा' विधी पूर्ण होतो आणि त्यानंतर मध्यरात्री हनुमान सवारीची तयारी सुरू होते. विशेष म्हणजे देशभरात रामनवमीचा उत्सव दिवसा साजरा होत असताना टाकरखेडा संभूमध्ये मात्र हा सोहळा मध्यरात्री साजरा होतो, हीच या उत्सवाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे.



### श्रीराम मठाचा पौराणिक इतिहास

श्रीराम मठाची स्थापना शंभू माळी या महंतांनी केल्याची आख्यायिका आहे. त्यांच्या स्वप्नात प्रभू श्रीराम व लक्ष्मण प्रकट होऊन 'आम्हाला बाहेर काढून प्रसाद द्या' अशी आज्ञा दिल्यानंतर त्यांनी मठाची स्थापना केली. तेव्हापासून येथे श्रीराम नवमी महोत्सवाची परंपरा सुरू झाली असून ती आजही अखंड सुरू आहे.मठातील 'गादी'ला विशेष महत्त्व असून, अनेक भक्तांनी तिचे चमत्कार अनुभवले असल्याच्या कथा प्रचलित आहेत. तसेच, या मठात आजपर्यंत १४ महंतांची समाधी असून, ब्रह्मचर्य व्रत ही महंतपदाची प्रमुख अट आहे. १९९७ मध्ये शिवभारती महाराजांच्या निधनानंतर सध्या मठाचा कारभार ट्रस्टमार्फत चालविला जात आहे.

### अनोखी ओळख जपणारा उत्सव

टाकरखेडा संभू येथील हा मध्यरात्री साजरा होणारा रामनवमी उत्सव केवळ धार्मिक नाही, तर परंपरा, निष्ठा आणि सामूहिक सहभागाचा अद्वितीय संगम आहे. विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रातही अशा प्रकारे मध्यरात्री पारंपरिक सवारी निघणारा हा विरळा सोहळा मानला जातो.

**संतोष शेंडे,**टाकरखेडा शंभू

## संक्षिप्त



### जवाहर नवोदय परीक्षेत श्रेया वानखडेचे उल्लेखनीय यश

**येवदा-**येथील काशीबाई अग्रवाल विद्यालय व कै.भा.य. उपाख्यभाऊसाहेब देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय हे ग्रामीण भागातील नामांकित व दर्जेदार शिक्षण देणारी संस्था असून काशीबाई अग्रवाल विद्यालयातील श्रेया राहुल वानखडे हिने १३ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा २०२५-२६ मध्ये भरघोस यश संपादन केले.या परीक्षेमध्ये तिने १०० पैकी ८५ गुण व १५२ वी रँक प्राप्त केली यामुळे पहील्याच फेरीत तिची निवड जवाहर नवोदय विद्यालय अमरावती येथे वर्ग ६ साठी झाली या भरीव यशाबद्दल येवदा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुसुधन ठाकूर,सचिव हर्षराज देशमुख, कोषाध्यक्ष प्रदीप भाऊ देशमुख, सर्व संचालक मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक पी.एन देशमुख, उपमुख्याध्यापक अतहर,पर्यवेक्षक प्रा. किशोर थोटे,प्रभारी शिक्षक सुनिल तायडे वर्गशिक्षक विनोद राठोड तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे कौतुक करत विद्यालयामार्फत पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार करण्यात आला. श्रेया ने आपल्या यशाचे श्रेय आपले आईवडील,आजी-आजोबा, काका व विद्यालयातील मार्गदर्शक शिक्षक,संस्थेला दिले आहे. श्रेया ने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातुन अभिनंदन व कौतूक होत आहे.

### विश्रामगृहातच होणार सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे

**अंजनगाव बारी-**नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सा.बा.विभागाशी संबंधित तक्रार, निवेदने, अर्ज, स्वीकृती प्रक्रिया आणि स्थानिक नागरिकांसाठी आवश्यक कागदपत्रांसंदर्भातील आरक्षण मिळण्याची सोय आता विश्रामगृहातच उपलब्ध होणार आहे. आतापर्यंत नागरिकांना २५ किमी अंतरावर बडनेरा येथे जावे लागत होते. अनेकांना यामुळे त्रास, वेळेची नासाडी तसेच प्रवासाचा खर्च सहन करावा लागत होता. या गैरसोईची दखल घेत उत्तम न. ब्राह्मणवाडे, विभागीय अध्यक्ष (अमरावती विभाग), युवा ग्रामीण पत्रकार संघ यांनी मागील काही महिन्यांपासून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. अखेर सा.बा. विभागाकडून आदेश निर्गमित करून नांदगाव खंडेश्वर येथील विश्रामगृहात तात्पुरती आरक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील सर्व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण भागातील शेकडो लोकांचा वेळ व खर्च वाचणार आहे. संबंधित विभागाची अधिकृत आदेश पत्रे जारी झाली आहे.

# ४३ विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटची संधी

## विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीची घवघवीत कामगिरी

**अमरावती/का.प्र.**
स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्हमध्ये तब्बल ४३ विद्यार्थ्यांची निवड होऊन संस्थेने प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे संस्थेच्या गुणवत्ता आधारित शिक्षणपद्धतीला आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मोठी दाद मिळत आहे.

माहितीनुसार, Eagle Hi-Tech Corporation Ltd., छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने भरती प्रक्रिया पार पडली. विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अंतर्गत येणाऱ्या आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी विविध पदांसाठी ही विशेष भरती मोहीम आयोजित करण्यात आली होती.ही संपूर्ण भरती प्रक्रिया विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे येथे पार पडली. विद्यार्थ्यांची नोंदणी, लेखी परीक्षा, गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखती अशा विविध टप्प्यांतून निवड प्रक्रिया राबविण्यात आली. मोठ्या संख्येने आर डी आय के महाविद्यालय, बडनेरा, राजाभाऊ देहमुख महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर, महिला आर्टस् आणि कॉमर्स महाविद्यालय, चांदुर रेल्वे, इंदिरा बाई मेघे महाविद्यालय, अमरावती आणि समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा च्या विद्यार्थ्यांनी या ड्राइव्हमध्ये सहभाग नोंदविला होता. अंतिम टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करत ४३ विद्यार्थ्यांनी नोकरीची संधी मिळवली, ज्यामुळे संस्थेच्या प्लेसमेंट रेकॉर्डमध्ये आणखी भर पडली आहे.संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ग्रामीण आणि अर्धनगरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच करिअरच्या भक्कम संधी मिळत असून, या यशामुळे संस्थेची ओळख प्लेसमेंटच्या बाबतीत अधिक मजबूत झाली आहे.



या यशाबद्दल विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीचे सन्मानीय अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष एड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, सन्मानीय सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. पूनम चौधरी, प्रा. विनय गोहाड,पंकज देशमुख व प्रा. गजानन काळे व तसेच डॉ. जी. आर. बमनोटे प्राचार्य, प्रा. राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा व डॉ निकु खालसा डीन प्लेसमेंट यांनी समाधान व्यक्त करत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी भविष्यातही अशा प्रकारच्या कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्याचा संस्थेचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

# स्वामी विवेकानंदांचा राष्ट्रधर्म, म्हणजे कर्मकांड नाही-डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन

**अमरावती/का.प्र.**
स्वामी विवेकानंद यांना जो धर्म अपेक्षित आहे, तो पूजापाठ अथवा कर्मकांड नाही, तर राष्ट्र हाच त्यांच्या विचाराचा धर्म होय. ज्या धर्माचा आधार स्वामी विवेकानंद यांनी घेतला तो धर्म म्हणजे कर्म, कर्तव्य होय, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी केले. संत गाडगे बाबा विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वामी विवेकानंदांच्या विचारातून व्यक्तिमत्व विकास' कार्यशाळेचे उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. एन.आर. पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. बिसेन म्हणाले, जागृत असलेल्या समाजाचा विकास होत असतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आले आहेत, त्यामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर होतील. आपल्या सभोवताल होणा-या घटनांमुळे स्वत:लाच प्रश्न करता आले पाहिजेत. कितीही संकटे आलीत, तरी सामोरे जा, संघर्ष करा, त्यात यश निश्चितच मिळेल हे त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या एका उदाहरणाव्दारे पटवून दिले. अमेरिकेतील शिकागो येथील धर्मपरिषदेसंदर्भातही स्वामी विवेकानंद यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांनी माहिती दिली.समरसता निर्माण करण्यासाठी जातीच्या भिंती तोडा, स्वामी विवेकानंद यांना राष्ट्र हाच एक जात व धर्म होता, असेही डॉ. बिसेन म्हणाले प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, संत विचारातून समाज सुदृढ होईल. स्वामी विवेकानंद यांनाही अनेक संकटे झेलावी लागलीत. त्यामुळे संकटे पेलता आली पाहिजेत, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी दिला.अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. नितीन कोळी म्हणाले, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आपण जर मागे राहिलो, तर पुढेही आपण टिकू शकणार नाही. मात्र तंत्रज्ञानाचा जेवढा उपयोग आहे, त्याचा दुरुपयोग आपणच टाळला पाहिजे.असेही डॉ. कोळी म्हणाले.संत



गाडगे बाबा, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका डॉ. राजीव बोरकर यांनी मांडली. याप्रसंगी स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, ग्रंथभेट व रोख पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. उद्घाटनीय समारंभाला विद्यापीठातील अधिकारी, रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# अफवांमुळे जुळया शहरात पेट्रोल पंपांवर रांगा

## पुरवठा सुरळीत, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे डिलर्सचे आवाहन


**अचलपूर/वार्ताहर**
आखाती देशांमधील युद्धामुळे इंधन तुटवड्याच्या अफवांमुळे २५ मार्च अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरांमध्ये पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्या. नेहमी ५० किंवा १०० रुपयांचे पेट्रोल भरणारे नागरिक टाकी पूर्ण भरून घेत असल्याने काही पंपांवरील साठा लवकर संपला. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, स्थानिक प्रशासनाने तसेच महाराष्ट्र आणि विदर्भ पेट्रो डिलर्स असोसिएशनने इंधन पुरवठा सुरळीत असल्याचे स्पष्ट केले आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र पेट्रोलियम डीलर असोसिएशनचे अध्यक्ष अमित गुप्ता यांनी सांगितले की,सर्व पेट्रोल पंपांवर पुरवठा सुरू आहे. लोकांनी घाबरून जास्त इंधन भरू नये. काही ठिकाणी टैंकर



पोहोचायला उशीर झाला असेल, पण त्यामुळे पॅनिक निर्माण होऊ नये, त्यांनी पेट्रोलियम डीलर आणि डेपो सतत संपर्कात असल्याचेही नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत कोरोनासारख्या परिस्थितीसाठी तयार राहण्याची गरज असल्याचे म्हटले होते. काही लोकांनी या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावून गर्दी केल्याचे दिसून आले. आखाती देशांमधील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने काही खासगी पेट्रोल पंपांवर मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी स्थिती निर्माण झाली होती.

# अकरावा महारूद्र हनुमान व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भागवत सप्ताह

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
अकरावा महारूद्र हनुमान मंदिर व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हनुमान जन्मोत्सवा- निमित्त भव्य संगीतमय भागवत सप्ताह, कीर्तन महोत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दरवर्षी प्रमाणे ग्रामस्थ व भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा धार्मिक सोहळा २६ मार्च २०२६ रोजी सुरू झाला असून २ एप्रिल २०२६ रोजी समारोप होणार आहे. उद्घाटन गुरुवारी दुपारी १२ वाजता कलश स्थापना विधी मोठ्या भक्तीभावाने होणार असुन यावेळी सुप्रसिद्ध प्रवचनकार



प्रियंका भोसले (राजगड, जि.पुणे, झि. टॉकीज फ्रेम) यांच्या सुमधुर वाणीतून श्रोत मंत्रमुग्ध होणार आहे. दररोज दुपारी भागवत कथा व सायंकाळी हरिपाठामुळे मंदिर परिसरात दिवसभर आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार आहे.तसेच कीर्तन महोत्सवात अनेक नामवंत कीर्तनकारांनी उपस्थित राहून संतपरंपरा, भक्ती, इतिहास व संस्कृतीचा वेध घेणारी कीर्तने सादर केली जाणार आहेत.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अकरावा महारूद्र हनुमान मंदिर मित्र मंडळ, अंजनगाव बारी यांच्या वतीने करण्यात आले असून भाविकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रमदान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.महोत्सवाची सुरुवात दि. २७ मार्च रोजी ह.भ.प. संस्कार महाराज अळसपुरे (बाल कीर्तनकार) आळंदीकर यांच्या प्रेरक कीर्तनाने होणार असून. दि. ३० मार्च रोजी ह.भ.प. ओम महाराज किंदरले आळंदिकर,दि. २८ मार्च रोजी खंजरी भजन मंडळाने भक्तिरसपूर्ण भजनी कार्यक्रम सादर होणार आहे. दि.३१ मार्च रोजी ह.भ.प. रूपेश महाराज परिमल, अडगाव बु.(अमरावती) यांच्या संत वाङ्मय, नामस्मरण आणि अध्यात्मविषयक विचार मांडून भाविकांना प्रेरित करणार आहे.रविवार, दि.२९ मार्च रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज गुल्हाणे (अमरावती) यांच्या प्रभावी कीर्तनाने महोत्सवाला वेगळीच दिशा मिळाणार आहे.दि.१ एप्रिल रोजी ह.भ.प. हर्षल महाराज महोत्सवाचा समारोप दि. ३ एप्रिल रोजी येथील रामगीर महाराज देवस्थान मठाधिपती ह.भ.प शंकरगीरी महाराज यांच्या काल्याच्या हरिकिर्तनाने होणार आहे. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# दर्यापूरातील श्रीराम जन्मोत्सव : भक्ती, कला आणि एकात्मतेचा अविस्मरणीय सोहळा

दर्यापूर नगरीत वसलेले पुरातन आणि ऐतिहासिक श्रीराम मंदिर हे केवळ एक देवस्थान नसून, अनेक पिढ्यांच्या श्रद्धा, संस्कार आणि अखंड भक्तीचे जिवंत प्रतीक आहे. या पवित्र स्थळी साजरा होणारा श्रीराम जन्मोत्सव म्हणजे दर्यापूरकरांसाठी एक भावनिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्वणीच ठरते.

मंदिरात प्रवेश करताच समोर उभे असलेले प्रभू श्रीराम, माता सीता आणि भगवान लक्ष्मण, तसेच त्यांच्या चरणी नतमस्तक उभे असलेले भक्त हनुमान यांचे दर्शन मनाला विलक्षण शांतता प्रदान करते. त्या क्षणी बाहेरचा गोंगाट, ताणतणाव आणि दैनंदिन धावपळ सगळं विसरायला होतं, आणि मन पूर्णपणे रामभक्तीत तल्लीन होतं.उत्सवाच्या काळात मंदिर परिसर पूर्णतः भक्तिमय होऊन जातो. कीर्तन, भजन, हरिपाठ, गायन आणि पारंपरिक नृत्य यांच्या माध्यमातून श्रीरामांच्या आदर्श जीवनाचा संदेश प्रत्येकाच्या मनापर्यंत प्रभावीपणे पोहोचतो.या उत्सवानिमित्त विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार श्री रामनाथ रामचंद्र अय्यर बुवा (पुणे) यांचे जाहीर कीर्तन आयोजन. त्यांच्या प्रभावी कीर्तनातून भक्ती, ज्ञान आणि संस्कारांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळतो, ज्यामुळे संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय आणि प्रेरणादायी बनते

या सर्व कार्यक्रमांचे उत्कृष्ट आणि शिस्तबद्ध नियोजन विश्वस्त मंडळ यांच्या सहकार्याने करण्यात येते.हारी गणोरकर, अ‍ॅड. अशोक उर्फ दादासाहेब गणोरकर,धनंजय गणोरकर,रवींद्र गणोरकर आणि शिरीष गणोरकर हे विश्वस्त म्हणून जबाबदारी सांभाळत या परंपरेला दृढपणे पुढे नेत आहेत. तसेच या उत्सवाच्या यशस्वीतेमागे आडवोकेट प्रकाश गणोरकर, किशोर गणोरकर, श्रीपाद गणोरकर,मनीष गणोरकर, आप्पा गणोरकर, आशिष गणोरकर, माधव गणोरकर, गिरीश गणोरकर, निलेश गणोरकर, हभप राहुल गणोरकर, प्रसन्न गणोरकर, डॉ. ओंकार गणोरकर, रोहित गणोरकर, अ‍ॅड. प्रशांत गणोरकर, [illegible]दार गणोरकर,कौस्तुभ गणोरकर, वेदांत गणोरकर तसेच गीतेश गणोरकर आणि संपूर्ण गणोरकर परिवार यांचे अथक परिश्रम आणि समर्पण मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. महिला आणि पुरुषांचा सहभाग, शिस्तबद्ध आयोजन आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद हीच खरी ओळख आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात एकात्मता, संस्कार आणि सकारात्मकतेची मजबूत पायाभरणी होते. माझ्यासाठी श्रीराम जन्मोत्सव हा केवळ एक सण नसून, तो श्रद्धा, सेवा आणि संस्कृतीचा जिवंत अनुभव आहे. दर्यापूरमधील हे पुरातन मंदिर आणि येथे होणारा हा उत्सव मनात कायमस्वरूपी स्थान निर्माण करून जातो.



**आदित्य देशमुख** (अधिवक्ता)
रुख्मिणी नगर, अमरावती
मो. ९८५००९०१६८

# प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर मंत्रालयात शिष्टमंडळाची धडक

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने आज मनोजभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मंत्रालयात जलसंपदा मंत्री ना. गिरीषजी महाजन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री ना. इंद्रनीलजी नाईक तसेच राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

यावेळी शिष्टमंडळाने महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या, पुनर्वसनातील अडचणी तसेच शासकीय धोरणांतील त्रुटी याकडे लक्ष वेधले. १३ डिसेंबर २०२५ व १० मार्च २०२६ रोजी काढण्यात आलेल्या मोर्चांचा संदर्भ देत तसेच १६ एप्रिल २०२५ रोजी अमरावती येथे माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची मागणी करण्यात आली.या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रश्नांवर अधिवेशन संपताच तातडीने बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन मंत्र्यांनी शिष्टमंडळाला दिले. यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.या शिष्टमंडळात संघटनेचे सचिव गौतम खंडारे, सहसचिव अजय भोयर, केंद्रीय संघटक राजु लोणकर तसेच सदस्य प्रशांतभाऊ राऊत यांचा समावेश होता.प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांकडे सरकार गांभीर्याने पाहणार का, आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# पोलीस कुटुंबाच्या आनंदावर काळाचा घाला

# भरधाव रुग्णवाहिकेच्या धडकेत ८ वर्षीय मुलीचा मृत्यू

**-पीआय राहुल वानखडे यांच्या कारला धडक**

**-देवगाव चौफुलीवरील घटना**

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** शाळेत पहिला क्रमांक आल्याचा आनंद साजरा करून घरी परतणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याच्या कुटुंबावर काळाने भीषण घाला घातला आहे. देवगाव चौफुलीवर एका भरधाव रुग्णवाहिकेने कारला दिलेल्या जोरदार धडकेत तळेगाव दशासर येथील पोलीस उपनिरीक्षकांच्या ८ वर्षीय चिमुकलीचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात पोलीस



अधिकारी आणि त्यांची पत्नी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर यवतमाळ येथे उपचार



सुरू आहेत. मद्यधुंद चालकाने रिकामी रुग्णवाहिका भरधाव वेगाने चालवल्यामुळे हा अपघात



घडल्याची प्राथमिक माहिती असून, ही संपूर्ण थरारक घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

अधिक माहितीनुसार, तळेगाव दशासर चे पोलीस उपनिरीक्षक राहुल वानखडे हे आपल्या पत्नी व ८ वर्षीय मुलीसह तळेगाव दशासर येथे खासगी चारचाकी वाहन क्र. एम एच ३० ए झेड २९१० ने जात होते. दरम्यान देवगाव चौफुलीवर धामणगाव वरून यवतमाळ कडे भरधाव वेगाने जाणाऱ्या अँब्युलन्स वाहन क्र. एम एच २९ टी. ५८५७ ने त्यांच्या कार ला जोरदार धडक दिली. ☞(पान २ वर)

# लक्ष्मी गॅस एजन्सीला कुलूप

## संतप्त ग्राहक धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर

**-प्रशासनाचे दावे ठरले फोल**

**-सिलेंडरसाठी ग्राहकांची धावपळ**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात गॅसचा तुटवडा नसल्याचा दावा जिल्हा पुरवठा विभागाने केला होता मात्र प्रशासनाचा हा दावा फोल ठरला आहे. रुक्मिणी नगर येथील लक्ष्मी गॅस एजन्सीच्या संचालकाने मंगळवार पासून कार्यालयाला कुलूप लावून पोबारा केल्याने संतप्त ग्राहकांनी आज बुधवार २५ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धाव घेतली. या प्रकारामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या नियोजनावर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

माहितीनुसार, लक्ष्मी गॅस एजन्सीच्या ग्राहकांना गॅस वितरणाचे मेसेज आले होते. त्यानुसार बुधवारी सकाळी १० वाजेपासून शेकडो ग्राहक एजन्सीवर पोहोचले. मात्र, मंगळवार दुपार पासूनच एजन्सीचे शटर बंद करून मॅनेजर फरार झाल्याचे दिसून आले. हक्काचा गॅस मिळत नसल्याने आणि अधिकारी दाद देत नसल्याने ग्राहकांचा पारा चढला. यामुळे संतप्त नागरिकांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून प्रशासनाकडे ☞(पान २ वर)

# थकीत मालमत्ता करांवर मनपाची कारवाई

# दोन मालमत्ता सील, एकाकडून अंशतः वसुली

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका झोन क्रमांक ४ (बडनेरा) अंतर्गत थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी आज व्यापक आणि कडक कारवाई राबविण्यात आली. सातत्याने सूचना व नोटिसा देऊनही कर न भरलेल्या मालमत्ताधारकांवर मनपाने थेट जप्ती व सीलिंगची कारवाई करत थकीतदारांना स्पष्ट इशारा दिला आहे. सहायक आयुक्त धनंजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.



या कारवाईदरम्यान वॉर्ड क्रमांक 4 मधील मालमत्ता क्रमांक १५५१ वर रु. २,१०,२८७/- इतका मालमत्ता कर थकीत असल्याचे निदर्शनास आले. संबंधित मालमत्ताधारकास वारंवार नोटिसा देण्यात आल्या होत्या, मात्र कर भरण्यास टाळाटाळ केल्यामुळे अखेर मनपाने संबंधित मालमत्ता सील करण्याची कठोर कारवाई केली.

तसेच, वॉर्ड क्रमांक 1 मधील मालमत्ता क्रमांक २९७१ वर तब्बल रु. २,५२,९००/- इतका कर थकीत होता. संबंधित धारकाकडून कोणतीही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे ही मालमत्ताही मनपाने सील केली. सलग दोन मोठ्या ☞(पान २ वर)

# गुन्हे शाखेत काम करण्यास पीआय चव्हाण अपात्र-आ.संजय खोडके

**-पोलीस महासंचालकांच्या मार्गदर्शक सुचनांचा दाखला**

## कामकाजात बदल करण्याची गरज,कारवाईची अधिवेशनात मागणी

**मुंबई/प्रतिनिधीः-** राज्यात पोलीस विभागाची कामगिरी सुधारत असून गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी गृहविभागाचे चांगल्या पद्धतीने काम सुरु आहे. त्यादृष्टीने अमरावती शहर पोलीस विभाग हा आयुक्तालय दर्जाचे असूनही येथील वरिष्ठ पोलीस अधिकारी हे एम.डी. ड्रग्स विरोधी व अंमली पदार्थ विक्री संदर्भात कारवाई करण्याबाबत हतबल दिसून येत आहे. एकट्या गुन्हे शाखेला कारवाई करण्याचे अधिकार दिले असल्याने याबाबत शंका उपस्थित होत आहे. गुन्हे शाखेचे पीआय संदीप चव्हाण हे गुन्हे शाखेत पीआय म्हणून काम करण्यासाठी पोलीस महासंचालकांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोणत्याही पात्रतेत बसत नसून ते तात्पुरते



पीआय असल्याने त्यांच्या कामकाजावर साशंका उपस्थित करून आ.संजय खोडके यांनी अमरावतीच्या गुन्हे शाखेचे पीआय चव्हाण यांच्यावर कारवाई करण्याची मागणी विधान परिषदेतून केली आहे.

आज बुधवार दिनांक २५ मार्च रोजी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधान परिषदेमध्ये ☞(पान २ वर)

# नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीची आत्महत्या

## संत कबीर नगर परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** आई सोबत आत्याच्या घरी राहून नर्सिंगचे शिक्षण घेणा-या एका अल्पवयीन मुलीने आपल्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सलोनी विजय मोहोड (वय १७) असे आत्महत्या करणाऱ्या अल्पवयीन मुलीचे नाव आहे. आठ महिन्यापूर्वी तिच्या मोठ्या बहिणीने ही आत्महत्या केली होती. मोठ्या बहिणीच्या आत्महत्येच्या दुखातून सलोनी सावरली नव्हती. अशात तिने सुद्धा आत्महत्या केली. माहितीनुसार तरुणीचे वडील विजय मोहोड यांचे निधन झाले आहे. आठ महिन्यापूर्वी तिच्या मोठ्या बहिणीने ही आत्महत्या केली होती. यामुळे सलोनी तिच्या आई सोबत संत कबीर नगर मध्ये राहणाऱ्या आत्याच्या घरी रहात होती. मंगळवारी सकाळी ११ वाजता सलोनीचे मामा बाहेर गेले होते. आत्या घरचे काम करत होती. ☞(पान २ वर)

# किरण पातुरकर यांचे स्वयंरोजगार निर्मिती चे कार्य प्रशंसनीय

**-विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल**

अमरावती/प्रतिनिधीः- किरण पातुरकर यांचे स्वयंरोजगार निर्मिती चे कार्य प्रशंसनीय आहे असे प्रतिपादन अमरावती विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांनी केले.

स्वयंसिद्ध उद्योजकता विकास अभियान मल्टीपर्पज फाउंडेशन द्वारा संचालित स्वयंसिद्ध उद्योजकता विकास अभियाना द्वारे महिलांनी स्वतःच्या पायावर आर्थिक दृष्टया उभे राहावे म्हणून ईरानी कप धूप बत्ती प्रशिक्षण बंसल कोचिंग सेंटर मध्ये आयोजित केले होते. त्या प्रसंगी



उदघाटन पर भाषणात, विभागीय आयुक्त डॉ श्वेता सिंघल बोलत होत्या. त्यांनी स्वयंसिद्ध उद्योजकता विकास अभियान तसेच किरण पातुरकर आणि त्यांच्या ☞(पान २ वर)

# चांदूर बाजारात शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचे उत्साहात स्वागत

## आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांची बियाणे व लाडू तुला

चांदूर बाजार/प्रतिनिधीः- राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचे चांदूर बाजार तालुक्यात जल्लोषात स्वागत करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून कर्जमाफीसाठी सुरू असलेल्या संघर्षाला यश मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कर्जमाफी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेल्या शेतकऱ्यांचा विशेष



सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी आंदोलकांची बियाणे आणि लाडू तुला करून त्यांचा गौरव करण्यात आला. बियाण्यांच्या तुलनेतून शेतीचे आणि शेतकऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, तर लाडू तुला करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. ☞(पान २ वर)

# पतीच्या निधनानंतर पत्नीनेही सोडले प्राण

**-जन्मभराची सोबत अन मृत्यूतही साथ**

## गवई दांपत्याची अंत्ययात्रा निघाली एकत्रच

अमरावती/प्रतिनिधीः- 'सुखात आणि दुःखात एकमेकांची साथ देऊ' असे लग्नावेळी घेतलेले वचन हाथखेडा येथील एका वृद्ध दांपत्याने मृत्यूच्या दारातही पाळले. गेल्या ५० वर्षांपासून संसाराचा गाडा सोबत ओढणाऱ्या पती-पत्नीने अवघ्या काही तासांच्या अंतराने जगाचा निरोप घेतला. विश्वासराव नथ्थुजी गवई (वय ७५) आणि त्यांच्या पत्नी येनूबाई विश्वासराव गवई (वय ७०) या दांपत्यावर एकाच वेळी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण गावावर



शोककळा पसरली असून, त्यांच्या 'साता जन्माच्या' नात्याची चर्चा परिसरात होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विश्वासराव ☞(पान २ वर)

# मोबाईल हिसकावणारा फरार आरोपी जेरबंद

**-गाडगेनगर डी.बी. पथकाची कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** दोन वर्षांपूर्वी तरुणीचा मोबाईल हिसकावून पसार झालेल्या आरोपीला अखेर गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने अटक करण्यात यश मिळवले आहे. गुप्त माहितीच्या आधारे



सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जुलै २०२३ रोजी आरती रविंद्र भगत (वय ☞(पान २ वर)




# गोकुलम गौरक्षणमध्ये पशुचिकित्सा व शल्यक्रिया शिबिर रविवारी



**अमरावती/प्रतिनिधीः-** गोकुलम गौरक्षण संस्था व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने भगवान महावीर जयंती निमित्य रविवार २९ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत गोकुलम संस्था नांदुरा येथे निशुल्क पशु चिकित्सा व

**भगवान महावीर जयंतीनिमित्त आयोजन**

शल्यक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आज बुधवार २५ मार्च रोजी पत्रकार परिषदेमध्ये डॉ. हेमंत मुरके यांनी दिली.

त्यांनी सांगितले की शिबिरामध्ये गाय, बैल, म्हैस, घोडा,कुत्रा, मांजर व इतर सर्व प्रकारचे प्राणी, पशुपक्षी यांच्यावर निशुल्क ☞(पान २ वर)

